CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २५ एप्रिल २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक १६७ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


**आजचा सामना**

चेन्नई सुपरकिंग्ज वि. सनरायजर्स हैद्राबाद

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : चिदंबरम् स्टेडियम, चेन्नई

## विचारपुष्प



समाज परिवर्तन व्यक्तीच्या बदलण्याने होईल. शाखांच्या कार्यक्रमांतून हिंदू समाजात समरसता, अनुशासन आणि चरित्र निर्माण होते. स्वयंसेवकांद्वारे संचालित हजारो महाविद्यालये, सर्व क्षेत्रांमध्ये लाखो सेवाकार्ये उत्तम रीतीने काम करीत आहे. याचमुळे संघाप्रति संपूर्ण समाजाचा विश्वास वृद्धिंगत होत आहे. आपल्या शाखा आणि स्वयंसेवकांची संख्या वाढावी हीच वर्तमानाची गरज आहे.

- **प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या,** चतुर्थ सरसंघचालक

# हल्लेखोरांना 'कल्पनातीत' शिक्षा!

## पंतप्रधानांची गर्जना

## हा देशाच्या आत्म्यावर हल्ला, पाताळातही शोधू

**मधुबनी, २४ एप्रिल**

काश्मीरातील पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांवर हल्ला करणारे अतिरेकी आणि त्यांचे समर्थक व सूत्रधार भूतलावर कुठेही असले तरी त्यांना शोधून काढू आणि त्यांनी कल्पनाही केली नसेल अशी कठोर शिक्षा देऊ, अशी गर्जना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. बिहारमध्ये जनसभेला संबोधित करताना पंतप्रधानांनी दहशतवादावर कठोर शब्दांत प्रहार केला.

बिहारमधील मधुबनी येथे राष्ट्रीय पंचायती राज दिनानिमित्त गुरूवारी आयोजित कार्यक्रमात पहलगाम येथील बैसरण येथे मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यावर बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, देशाच्या शत्रूंनी केवळ निष्पाप पर्यटकांवर नव्हे, तर भारताच्या आत्म्यावरच हल्ला करण्याचे धाडस केले. दहशतवाद्यांच्या हाती उरलेली थोडीफार जमीनसुद्धा आता हिरावून घेण्याची वेळ आली आहे. आज बिहारच्या भूमीवरून मी संपूर्ण जगाला सांगतो की, भारत प्रत्येक दहशतवाद्याला आणि त्यांच्या समर्थकांची ओळख पटवेल, त्यांना शोधून काढेल आणि



शिक्षा देईल. दहशतवादी आणि त्यांचा समर्थकांचा नायनाय केल्याशिवाय शांत बसणार असा शब्द मी तुम्हाला देतो. आपण त्यांचा पृथ्वीच्या टोकापर्यंत आणि त्यांचा अंत होईपर्यंत पाठलाग करू. भ्याड हल्ल्यामुळे भारताचा आत्मा कधीही तुटणार नाही. हल्ल्यात ज्यांनी प्राण गमावले त्यांच्यासोबत निश्चितच न्याय होईल. संपूर्ण देश या निर्धारात एकदिलाने उभा आहे. जे कोणी मानवतेवर विश्वास ठेवतात ते सर्व आपल्यासोबत आहेत. या कठीण काळात आमच्यासोबत उभे राहिलेल्या विविध देशांच्या नागरिकांचे आणि नेत्यांचे मी आभार मानतो *(वृत्तसंस्था)*

### कारगिलपासून कन्याकुमारीपर्यंत संताप

दहशतवाद्यांनी निष्पाप नागरिकांना ज्या क्रूरतेने मारले त्याबद्दल कारगिलपासून कन्याकुमारीपर्यंत संताप आहे. १४० कोटी भारतीय दु:खी आहे, दहशतवाद्याचा आणि त्यांना आश्रय देणाऱ्यांचा नायनाट करावा हीच सर्वांची इच्छा आहे. संपूर्ण राष्ट्र पीडित कुटुंबीयांच्या दु:खात सहभागी आहे. हल्ल्यात कोणी आपला मुलगा गमावला, कोणी आपला भाऊ गमावला, कोणी आपला जोडीदार गमावला. दहशतवादाला सडेतोड प्रत्युत्तर दिले जाईल असे मोदी यावेळी म्हणाले.

### मौन पाळून मृतांना श्रद्धांजली

कार्यक्रमाला संबोधित करताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रथम पहलगाम दहशतवादी हल्ल्यत मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहिली. एवढेच नाही तर त्यांनी रॅलीत उपस्थित असलेल्या हजारो लोकांना मौन पाळण्यास आणि मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहण्यास सांगितले. मोदी म्हणाले, माझे भाषण सुरू करण्यापूर्वी, मी तुम्हाला विनंती करतो की तुम्ही जिथे असाल तिथे बसा हल्ल्यात प्राण गमावलेल्या कुटुंबांना श्रद्धांजली वाहण्यासाठी एक क्षण मौन पाळा.

# भारताच्या कारवाईने पाकचा जळफळाट

**शाहबाज शरीफ म्हणाले, सिंधू जल कराराला स्थगिती हे युद्धच**

### पाकच्या एनएससीने घेतलेले निर्णय

- वाघा सीमा तत्काळ बंद करण्याचा आदेश देण्याचा निर्णय
- भारतीय दूतावासातील संरक्षण, लष्करी, नौदल, हवाई सल्लागारांची संख्या ३० पर्यंत कमी करणार
- भारतीय विमान कंपन्यांना हवाई क्षेत्र बंद करण्याचे जाहीर
- सार्वभौमत्वाला आणि सुरक्षेसंदर्भातील धोक्याला सर्व क्षेत्रांत ताकदीने प्रत्युत्तर देणार

### आमची सेना सज्ज



सिंधू जल करार स्थगितीचा निर्णय भारताने घाईघाईत घेतला असून त्यांना या जल युद्धाचे परिणाम भोगावे लागतील. आम्ही कायदेशीररित्या, राजकीयदृष्ट्या आणि जागतिक स्तरावर अधिकाराचे पूर्ण ताकदीनिशी रक्षण करू. देशाच्या सुरक्षेसाठी आमची सेना सज्ज आहे.

- **ख्वाजा आसिफ,** संरक्षण मंत्री

**इस्लामाबाद, २४ एप्रिल**

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू जल करार स्थगित करण्याचा निर्णय घेतल्यानंतर पाकिस्तानचा जळफळाट झाला आहे. सिंधू जल कराराला स्थगिती देणे आणि पाणी रोखणे हे युद्धच असल्याचा जावई शोध पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी लावला. या निर्णयाविरोधात कायदेशीर आव्हान देण्याचा इशाराही त्यांनी दिला.

दहशतवादी हल्ल्यात २६ लोकांचा बळी गेल्यानंतर भारताने सिंधू जल करार रद्द करण्यासोबत पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी अनेक निर्णय घेतले. भारताच्या निर्णयांचे मूल्यांकन करण्यासाठी पाकिस्तानच्या राष्ट्रीय सुरक्षा समिती अर्थात् एनएससीची गुरुवारी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या अध्यक्षतेत बैठक पार पडली. यात



पाकच्या तिन्ही दलाचे प्रमुख, लष्करी अधिकारी आणि महत्त्वाचे मंत्री उपस्थित होते. बैठकीनंतर पंतप्रधान शरीफ यांच्या कार्यालयाने निवेदन जाहीर करून सिंधू जल कराराला दिलेली स्थगिती ही जलयुद्धाची कृती आहे. सिंधू जल करारानुसार पाकिस्तानात वाहणाऱ्या पाण्याचा प्रवाह रोखणे किंवा वळविण्याचा प्रयत्न करणे हे युद्धाला चिथावणी देणे आहे. १९६० मध्ये जागतिक बँकेच्या मध्यस्थीने झालेल्या करारानुसार प्रत्येक थेंबावर आमचा हक्क असून आम्ही तो कायदेशीरीत्या मिळविणार असल्याचे असल्याचे नमूद केले. परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी पहलगाम हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग असल्याचा आरोप फेटाळत म्हटले की, भारताकडे हल्ल्यासंदर्भात पुरावा असेल, तर तो सादर करावा. ही केवळ एक राजकीय खेळी आहे आणि भारत आपल्या अपयशासाठी पाकिस्तानला दोष देत आहे, आम्ही त्यांच्या दबावासमोर झुकणार नाही, देशाच्या संरक्षणासाठी सज्ज आहे.

दरम्यान, संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी आधीच पाकिस्तान दहशतवादी कारवायांनी त्रस्त असल्याने भारताने पुन्हा सर्जिकल स्ट्राईक करू नये, असे म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*

# पेट्रोल भरताना दुचाकीला लागली आग

**वाशीम, २४ एप्रिल**

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जुना रिसोड नाका या दरम्यान असलेल्या शर्मा पेट्रोल पंपावर पेट्रोल भरताना दुचाकीने अचानक पेट घेतला. तेथील कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत तेथील अग्निशमन यंत्राद्वारे आग विझविली. त्यामुळे पुढील अनर्थ टळला.

जुना रिसोड नाका परिसरातील शर्मा पेट्रोल पंपावर दुचाकीत पेट्रोल टाकण्यासाठी एक दुचाकीधारक आला. कर्मचारी दुचाकीत पेट्रोल टाकत असताना दुचाकीच्या इंजिनने अचानक पेट घेतला. त्यामुळे पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यासह इतर वाहनचालकांमध्ये एकच धावपळ सुरू झाली.

काही कर्मचाऱ्यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्या ठिकाणी असलेल्या अग्निशमन यंत्राद्वारे दुचाकीला लागलेली आग आटोक्यात आणली. त्यामुळे उपस्थित सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला. दुचाकीची आग आटोक्यात आली नसती अन् दुचाकीच्या पेट्रोल टाकीचा भडका उडाला असता, तर पेट्रोल पंप आगीच्या भक्ष्यस्थानी पडून आजूबाजूच्या दुकानांना व घरांना क्षती पोहचली असती. *(तभा वृत्तसेवा)*



## महत्त्वाचे

### नफा वसुलीने गडगडला बाजार

**मुंबई :** सलग सात दिवसांच्या तेजीला ब्रेक लागत गुरुवारी देशांतर्गत बाजारात मंदीचा प्रभाव दिसून आला.



निर्देशांक ३१४ अंकांच्या घसरणीसह ७९,८०० वर बंद झाला तर निफ्टी ८४ अंकांनी खाली येत २४,२४४ वर बंद झाला. सर्वात मोठी घसरण एफएमसीजी निर्देशांकात झाली. एचयूएल, भारती एअरटेल, आयशर मोटर्स, आयसीआयसीआय बँक आणि एटर्नल हे शेअर्स सर्वाधिक तोट्यात होते. या मंदीतही इंडसइंड बँक, अल्ट्राटेक सिमेंट, ग्रासिम, डॉ. रेड्डी आणि सिप्ला यांचे शेअर्स तेजीत राहिले. ऑटो आणि बँकिंग क्षेत्रात विक्री दिसून आली.

### सोलापूर-गोवा २६ मे पासून विमान सेवा सुरू करणार

**सोलापूर :** फ्लाय ९१ या प्रवासी विमान वाहतूक करणाऱ्या कंपनीकडून सोलापूर विमानतळ येथून दिनांक २६ मे २०२५ रोजी पासून सोलापूर ते गोवा प्रवासी विमान सेवा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली आहे.

### महापालिका झोनच्या तक्रारीसाठी ऑनलाइन लिंक

**सोलापूर :** महानगरपालिका विभागीय कार्यालय क्रमांक १ व २ च्या नागरिकांना महापालिकेला तक्रार सादर करण्यासाठी ऑनलाईन स्वरुपात प्रायोगिक तत्वावर खालील लिंक उपलब्ध केलेली आहे. नागरिकांनी आपली तक्रार दिलेल्या लिंक वर करावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे. नागरिकांनी आपल्या तक्रारी https://complaint.solapurcorporation.org या लिंकवर नोंदवाव्यात, असे सुचित करण्यात आले आहे.



सर्वपक्षीय बैठकीपूर्वी गृहमंत्री अमित शाह आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन पहलगाम घटनेची माहिती दिली

# पाकविरोधातील कारवाईला सर्व पक्षांचा एकमुखी पाठिंबा

**सर्वपक्षीय बैठकीतील निर्णय**

**सुरक्षेत चूक झाल्याची कबुली**

**नवी दिल्ली, २४ एप्रिल**

जम्मू काश्मिरातील पहलगाम येथे मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आज राजधानी दिल्लीत सर्वपक्षीय बैठक झाली. पाकिस्तानला कायमस्वरुपी धडा शिकवण्यासाठी केंद्र सरकार जी कारवाई करेल, त्याला या बैठकीत उपस्थित सर्व पक्षांनी एकमुखी पाठिंबा दिला. सर्व विरोधी पक्ष या मुद्यावर सरकारच्या पाठिशी भक्कमपणे उभे असल्याचा निर्वाळाही सर्वपक्षीय नेत्यांनी दिला.

संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सर्वपक्षीय बैठकीला गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह विविध पक्षांचे नेते उपस्थित होते

बैठकीच्या सुरुवातीला दहशतवाद्याच्या भ्याड हल्ल्यात बळी पडलेल्या नि:ष्पाप पर्यटकांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली. गृहमंत्री अमित शाह यांनी पहलगाम येथील दुर्दैवी घटनेची माहिती बैठकीत दिली. सरकारने तातडीने केलेल्या उपाययोजनांचा आढावाही त्यांनी बैठकीत सादर केला. गुरुवारी झालेल्या राष्ट्रीय सुरक्षा परिषदेच्या बैठकीत पाकिस्तानवर कठोर कारवाई करण्याबाबत काही निर्णय घेण्यात आले.

बैठकीला उपस्थित सर्व पक्षांच्या नेत्यांनी या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला. जम्मू काश्मिरात तातडीने शांतता प्रस्थापित करण्याची आवश्यकता उपस्थित नेत्यांनी व्यक्त केली. बैठकीला तृणमूल काँग्रेसचे सुदीप बंदोपाध्याय, समाजवादी पक्षाचे रामगोपाल यादव, आपचे संजयसिंह, राजदचे प्रेमचंद गुप्ता, तेलगू देसमचे कृष्णदेव रायलू यांच्यासह विविध पक्षांचे नेते उपस्थित होते.

या सर्वपक्षीय बैठकीच्या आधी संरक्षण मंत्री राजनाथसिंह, गृहमंत्री अमित शाह, परराष्ट्रव्यवहार मंत्री ए. जयशंकर यांची एक बैठक झाली. तत्पूर्वी अमित शाह तसेच जयशंकर यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांची भेट घेत त्यांना या घटनेची माहिती दिली.

**चूक झाल्याची कबुली**

देशातील विविध गुप्तचर संस्थांना या हल्ल्याची माहिती का मिळू शकली नाही, अशी विचारणा करत सर्वपक्षीय नेत्यांनी घटनास्थळी सीआरपीएफ तसेच अन्य सुरक्षा दल का नव्हते, अशी विचारणा केली. सुरक्षा व्यवस्थेत काही प्रमाणात चूक झाल्याची कबुली गृहमंत्री अमित शाह यांनी दिली. सर्वकाही ठिक असते, तर आज आम्हाला ही बैठकच बोलवावी लागली नसती, बैठक बोलवावी लागली, याचाच अर्थ सुरक्षा व्यवस्थेत काही तरी गडबड झाली. असे ते म्हणाले. *(तभा वृत्तसेवा)*

### विविध देशांच्या राजदूतांची बोलावली बैठक

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने आज दुपारी विविध देशांच्या राजदुतांची एक बैठक बोलावली, त्यात पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याची माहिती देण्यात आली. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी सर्व देशाच्या राजदूतांना या घटनेच्या सर्व पैलुंची माहिती दिली. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी उद्या शुक्रवारी दहशतवादी हल्ला झालेल्या पहलगमा येथील बैसरन या घटनास्थळाला भेट देणार आहे.

# अमेरिकेसोबतचा व्यापारी करार अंतिम टप्प्यात

**वॉशिंग्टन, २४ एप्रिल**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या परस्पर शुल्कामुळे निर्माण झालेल्या जागतिक संकटाच्या पृष्ठभूमीवर बहुतांश देशांनी व्यापारी करार करण्यासाठी अमेरिकेसोबत चर्चा सुरू केली. अमेरिकेसोबत होणारा भारताचा द्विपक्षीय व्यापारी करार अंतिम टप्प्यात असून लवकरच यावर शिक्कामोर्तब होणार आहे आणि परस्पर शुल्क धोरणातून बाहेर पडणारा भारत जगातील पहिला देश ठरणार असल्याची टिप्पणी अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसंट यांनी केली.

भारतातून अमेरिकेत करण्यात येणाऱ्या निर्यातीवर सध्या १० टक्के व्यापारी शुल्क आकारले जाते, तर २६ टक्के व्यापारी शुल्कासाठी ९० दिवसांची स्थगिती देण्यात आली. दिलेल्या मुदतीपर्यंत अमेरिकेसोबत व्यापारी करार करण्यासंदर्भात वाटाघाटी ह करणाऱ्या देशांवर २६ टक्के शुल्क आकारले जाणार आहे. ही मुदत ८ जुलै रोज संपत आहे. *(वृत्तसंस्था)*

**डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरण**

# मनिषाला वळसंगकरच्या स्टाफने वाहिली शिव्यांची लाखोली

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

एस. पी. इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरो सायन्सेसचे संस्थापक तथा प्रसिध्द मेंदू विकारतज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या मनिषा माने-मुसळे हिला गुरुवारी रामवाडी परिसरातील वळसंगकर हॉस्पीटल येथे नेण्यात आले होते. मात्र चिडलेल्या रुग्णालयातील स्टाफने तिचे शिव्यांची लाखोली वाहत स्वागत केले. पोलीस प्रशासनाने वेळीच लोकांना आवरले अन्यथा तिला चपलांचा हार घालण्यात येणार होता.

बुधवारी मुसळेच्या पोलीस कोठडीत दोन दिवसांची वाढ करण्याचा आदेश न्यायालयाने दिला होता. हॉस्पीटलमधील सुमारे २७ कर्मचा-यांनी तिच्या विरोधात हॉस्पीटल प्रशासनाकडे तक्रार दिली होती. त्याअनुषंगाने चौकशी करण्यासाठी गुरुवारी पोलीस प्रशासनाने तिला हॉस्पीटलमध्ये सायंकाळी सव्वासातच्या सुमारास मनिषाला घेऊन हॉस्पीटलमध्ये पोलीस दाखल झाले. बघता-बघता हॉस्पीटलमधील स्टाफला ही बातमी समजली. सगळेजण काम सोडून रुग्णालयाच्या आंतील व्हरांड्यात एकत्र जमा झाले. पोलीस मुसळेला घेऊन हॉस्पीटलमध्ये दाखल होताच, हॉस्पीटलमधील स्टाफ तिच्या दिशेने धावत जाण्याचा प्रयत्न करत होता. त्यावेळी पोलिसांनी त्यांना त्यांच्या कामात अडथळा करू नका असे सांगितले. तसेच डॉ. अश्विन वळसंगकर यांनी स्टाफला शांत राहण्याचे आवाहन केल्याने संतापलेल्या स्टाफने मनातील रागाला शांत केले. अन्यथा मनिषाला स्टाफकडून चांगलाच प्रसाद मिळाला असता. पोलीस निरीक्षक अजित लकडे, पोसई शिंदे यांच्यासह पोलिस यावेळी होते.

**पोलिसांनी संगणक केले जप्त**

मनिषा हॉस्पीटलमध्ये काम करत असताना गैरव्यवहार झाल आहे का? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी पोलिसांनी गुरुवारी मनिषाला हॉस्पीटलमध्ये नेले होते. त्याठिकाणी ती काम करत असलेले संगणक पोलिसांनी जप्त केले आहेत.

# इस्रोचा स्पाय सॅटेलाईट ठेवणार पाकिस्तानवर नजर

**प्रक्षेपणासाठी हालचाली वेगवान**

**नवी दिल्ली, २४ एप्रिल**

जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताच्या सीमांचे संरक्षण करण्यासाठी आणि सातत्याने नजर ठेवण्यासाठी भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) एका विशेष स्पाय सॅटेलाईट (उपग्रह) च्या प्रक्षेपणासाठी वेगाने काम करत आहे.

लवकरच एक विशेष ''रडार इमेजिंग उपग्रह'' प्रक्षेपित करण्यास सज्ज आहे. हा उपग्रह दिवसा व रात्री, तसेच ढगाळ हवामानातही चित्रण करू शकतो. त्यामुळे कोणत्याही हवामानात, कोणत्याही वेळेला, भारताच्या सीमेवर घडणाऱ्या घडामोडींवर नजर ठेवणे शक्य होणार आहे.





हा उपग्रह ''स्पाय सॅटेलाइट'' (गुप्तचर उपग्रह) म्हणून ओळखला जातो. कारण त्याच्यापासून लपणे फार कठीण आहे. हा आकाशातील एक अचूक निरीक्षक आहे.

केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी सांगितले की, इस्रो लवकरच पीएसएलव्ही-सी६१ मोहीम अंतर्गत अत्याधुनिक ईओएस-०९ उपग्रहाचे प्रक्षेपण करणार आहे. सी-बँड सिंथेटिक अपर्चर रडारने सुसज्ज असलेला ईओएस-०९ उपग्रह कोणत्याही हवामानात, दिवसा अथवा रात्री, पृथ्वीच्या पृष्ठभागाचे हाय-रिझोल्यूशन चित्र घेण्यास सक्षम आहे.

**मेक इन इंडिया उपग्रह**

हा रडार इमेजिंग उपग्रह पूर्णत: भारतीय शास्त्रज्ञांनी विकसित केला आहे आणि तो भारताच्या आंतराळात कार्यरत असलेल्या ५० हून अधिक उपग्रहांच्या ताफ्यात सामील होणार आहे. भारताचा आधीपासून कार्यरत असलेला कार्टोसॅट-३ उपग्रह कमी पृथ्वी कक्षेतून अर्धा मीटरपेक्षा कमी रिझोल्यूशनमध्ये चित्रे पाठवू शकतो. मात्र, तो उपग्रह रात्री चित्रण करू शकत नाही, ज्यामुळे शत्रू आपली साधने हालवू शकतो. पण, नवीन ईओएस-०९ उपग्रह अंध होत नाही, आणि त्यामुळे शत्रू काय लपवत आहे हे सतत शोधून काढू शकतो.

भारताच्या अंतराळ संशोधन संस्थेने १९७५ पासून आतापर्यंत एकूण १२९ भारतीय उपग्रह आणि ३४२ परदेशी उपग्रह प्रक्षेपित केले आहेत. म्हणजेच एकूण ४१७ उपग्रह इस्रोने आत्तापर्यंत प्रक्षेपित केले आहेत. त्यापैकी २१ उपग्रह संचार, ८ उपग्रह नेव्हिगेशन, २१ उपग्रह पृथ्वी निरीक्षण आणि ३ उपग्रह विज्ञान या क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत. *(वृत्तसंस्था)*



www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### २०० मीटर शर्यतीत अनिमेशचा राष्ट्रीय विक्रम

**कोची** : ओडिशाचा युवा धावपटू अनिमेश कुजूरने राष्ट्रीय फेडरेशन सिनियर ॲथ्लेटिक्स स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्याने पुरुषांचा २०० मीटर शर्यतीत २०.४० सेकंद अशी प्रभावी वेळ नोंदवत सुवर्णपदक जिंकले. २१ वर्षीय अनिमेशने यापूर्वी १०० मीटरमध्ये रौप्यपदक जिंकले होते. त्याने आश्चर्यकारक कामगिरी करत २०२२ मध्ये स्थापित केलेल्या अमलन बोरगोहेनच्या २०.५२ सेकंदांच्या मागील विक्रमाला मोडीत काढले. आत्मविश्वास आणि लयीत धावत, कुजूरने स्वतः बोरगोहेनच्या मजबूत मैदानावर आघाडी घेतली, ज्याने २०.८० सेकंदांच्या वेळेसह दुसरे स्थान पटकावले. कुजूर २०.१६ सेकंदांच्या जागतिक अजिंक्यपद पात्रता मानकापेक्षा कमी पडला असला तरी- भारतीय धावपटूंसाठी अत्यंत कठीण मानला जाणारा हा बेंचमार्क - त्याचा प्रयत्न ॲथ्लेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाने (एएफआय) निश्चित केलेल्या २०.५३ सेकंदांच्या आशियाई अजिंक्यपद पात्रता वेळेला मागे टाकण्यासाठी पुरेसा होता. पुरुषांच्या तिहेरी उडीत, प्रवीण चित्रवेलने १७.३७ मीटरच्या स्वतःच्या राष्ट्रीय विक्रमाची बरोबरी करून आणखी एक तेजस्वी क्षण निर्माण केला.

# चेन्नई, हैदराबाद यांच्यात अस्तित्वाची लढत

◆ **चेन्नई, २४ एप्रिल**


अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शुक्रवारी येथे चेन्नई सुपर किंग्ज (सीएसके) आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. दोन्ही संघांना आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी हा सामना जिंकणे आवश्यक आहे.

दोन्ही संघांनी हंगामात वादळी कामगिरी केली आहे, आठ सामन्यांतून केवळ चार गुण मिळवले आहेत आणि आता त्यांच्या पात्रतेच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी उर्वरित सर्व सामने जिंकावे लागतील. सध्या दहा संघांच्या आयपीएल गुणतालिकेत चेन्नई अगदी तळाच्या स्थानी आहे, तर हैदराबाद चार गुणांसह नवव्या स्थानावर आहे.

घरच्या खेळपट्टीचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी ओळखले जाणारे पाच वेळचे विजेते सीएसके एम. ए. चिदम्बरम्च्या खेळपट्टीचे चांगल्या प्रकारे मूल्यांकन करू न शकल्यामुळे अडचणीत सापडले आहे.

मुख्य प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांनीही चेन्नईच्या मैदानाबद्दल निराशा व्यक्त केली आहे, कारण





सीएसकेच्या नेहमीच्या फिरकी गोलंदाजांपेक्षा वेगवान गोलंदाजांना जास्त संधी मिळाली आहे. चार प्रयत्नांतून केवळ एकाच विजयासह सीएसकेचा फॉर्मही चांगला राहिलेला नाही. सीएसकेकडे फलंदाजी विभागात तडाखेबंद फलंदाजीची कमतरता आहे आणि कर्णधार ऋतुराज गायकवाड दुखापतीमुळे अनुपस्थित असल्याने संघाची परिस्थिती आणखी बिकट झाली आहे.

महेंद्र सिंह धोनी पूर्णवेळ कर्णधार म्हणून परतला आहे. त्याच्या गुडघ्यामुळे हालचाल मर्यादित होत असली तरी, माजी भारतीय कर्णधाराचे नेतृत्व अमूल्य आहे. त्याची डेथ-ओव्हर्स फलंदाजी, फील्ड प्लेसमेंट व गोलंदाजी आक्रमण पुन्हा दर्जेदार करण्याची क्षमता सीएसकेच्या पुनरुज्जीवनात महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

१७ वर्षीय आयुष म्हात्रेने मुंबई इंडियन्सविरुद्ध फलंदाजीने आशादायक पदार्पण केले. फ्रॅन्चायझीने त्यांचा पॉवर-हिटिंग विभाग मजबूत करण्यासाठी दक्षिण आफ्रिकेच्या डेवाल्ड ब्रेव्हिसलाही संघात घेतले आहे.

दरम्यान, सनरायझर्स हैदराबादनेही तितक्याच अनियमित मोहिमेचा सामना केला आहे. त्यांची अति-आक्रमक, कोणत्याही किंमतीत आक्रमण करण्याची रणनीती अपयशी ठरली. गत हंगामात अतिशय महत्त्वाची असलेली ट्रॅव्हिस हेड व अभिषेक शर्मा ही स्फोटक सलामी जोडी या वर्षी त्याच उंचीवर पोहोचण्यात अपयशी ठरली आहे. अभिषेक शर्माच्या हुशारीने पंजाब किंग्जविरुद्ध विजय मिळवला, परंतु हेडला अद्याप खऱ्या अर्थाने आपला ठसा उमटवता आलेला नाही.

त्यांच्या पहिल्या दोन फलंदाजांवर जास्त अवलंबून राहिल्यामुळे मधल्या फळीचा कमकुवतपणा उघडकीस आला आहे. ही मधली फळी दबाव सहन करण्यास संघर्ष करत आहे, हे मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सात गड्यांनी झालेल्या पराभवानंतर मुख्य प्रशिक्षक डॅनियल व्हेटोरी यांनीही मान्य केले.

जेव्हा हेड आणि अभिषेक यशस्वी होत नाहीत, तेव्हा ती इतर फलंदाजांची जबाबदारी असते. कदाचित या हंगामात आपल्याकडे तीच गोष्ट नव्हती, असे व्हेटोरी म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

### आजचा सामना

**चेन्नई सुपर किंग्ज वि. सनरायझर्स हैदराबाद**
**स्थळ** : एम. ए. चिदम्बरम् स्टेडियम, चेन्नई
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# रोहित मुंबईच्या जेतेपदाच्या प्रयत्नांत महत्त्वाची भूमिका बजावेल : ट्रेंट बोल्ट

◆ **हैदराबाद, २४ एप्रिल**

रोहित शर्मा हा जागतिक दर्जाचा खेळाडू असून तो मुंबई इंडियन्सला विक्रमी सहाव्या आयपीएल जेतेपद जिंकून देण्याच्या संघाच्या प्रयत्नात महत्त्वाची भूमिका बजावेल असा विश्वास मुंबई इंडियन्सचा वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्टने व्यक्त केला आहे. रोहितने अलीकडेच सलग दोन अर्धशतके झळकावून आपण पुन्हा फॉर्ममध्ये आपल्याचे दाखवून दिले आहे.

न्यूझीलंडचा डावखुरा वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्टने सनरायझर्स हैदराबादच्या अव्वल फलंदाजीच्या फळीला उद्ध्वस्त करण्यात मोलाची भूमिका बजावली होती. त्याने २६ धावांत ४ बळी टिपण्याची कामगिरी केली आणि मुंबई इंडियन्सचा सलग चौथा विजय सुनिश्चित केला.

सनरायझर्स हैदराबाद ८ बाद १४३ धावांवर रोखल्यानंतर रोहित शर्माच्या ४५ चेंडूंतील ७० धावांच्या बळावर मुंबई इंडियन्सने केवळ १५.४ षटकांत लक्ष्याचा यशस्वी





पाठलाग केला. या जोरदार विजयामुळे त्यांचा नेट रन रेट वाढलाच नाही तर गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावरही पोहोचला.

मला वाटते संपूर्ण मुंबई इंडियन्स संघात काही जागतिक दर्जाचे खेळाडू आहेत व रोहितला त्या संदर्भात कोणत्याही ओळखीची गरज नाही, असे बोल्ट सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत म्हणाला.

रोहित अलिकडच्या काळात उत्तम कामगिरी करत आहे व योग्य वेळी तो छान खेळत आहे. त्यामुळे तो हंगामाच्या उर्वरित काळात आमच्यासाठी मोठी भूमिका बजावणार आहे. मला वाटते की तुम्हाला कोणत्याही भूमिकेसाठी तयार राहण्याची गरज आहे, असे तो म्हणाला.

बोल्टने कर्णधार हार्दिक पांड्याचे त्याच्या नेतृत्वशैलीचे कौतुक केले. हार्दिक हा एक उत्साही क्रिकेटपटू आहे, अर्थातच खूप कुशल आहे. तो एक उत्तम नेता आहे. मला वाटते तो आघाडीवरून नेतृत्व करतो, असे तो म्हणाला. राजस्थान रॉयल्समधून मुंबई इंडियन्समध्ये आल्यानंतर नवीन भूमिकेत सहजतेने जुळवून घेणाऱ्या बोल्टने आयपीएलसारख्या दीर्घ स्पर्धेत अनुकूलतेचे महत्त्व अधोरेखित केले.

''राजस्थानमध्ये मी सामन्याच्या कोणत्याही टप्प्यावर गोलंदाजी करण्यास तयार होतो. मी १० आयपीएल हंगाम खेळलो, पण नेहमीच सारखीच पद्धत नव्हती, असे तो म्हणाला.

मुंबई इंडियन्सने त्यांच्या पहिल्या पाच सामन्यांमध्ये केवळ एक विजय मिळवला होता आणि आता त्यांच्याकडे सलग चार आहेत, त्यामुळे ते प्लेऑफमध्ये पोहोचण्यासाठी मजबूत स्थितीत आहे, असे तो म्हणाला. ◂(वृत्तसंस्था)

# राज्य स्पर्धेत विनर्स फाऊंडेशन स्केटिंग क्लबला ४९ पदके

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

विमान नगर पुणे येथे झालेल्या राज्य स्केंटिग स्पर्धेत २८ खेळाडूंपैकी २६ खेळाडूंनी ४९ पदकांची कमाई केली.

राज्य रोलर ॲथलेटिक्स असोसिएशन आयोजित मिनी स्टेट चॅम्पिअनशिप स्केटिंग स्पर्धेत २००, ४०० व ६०० मीटर रिंक रेसमध्ये त्यांनी ही कामगिरी केले. या खेळाडूंना सम्यक मोहोळकर व सागर राठोड सरांचे मार्गदर्शन लाभले.

**कामगिरी केलेले खेळाडू :** संयुक्ता पोतदार (२ सुवर्ण), वेदांत कोठारी (२ कांस्य), ऋषिता माळवदकर (२ रौप्य), विराज आरकाल (२ सुवर्ण), सक्षम हुच्चे (२ कांस्य), देवांश सरवदे (२ सुवर्ण), याहया शेख (२ कांस्य), शर्विल माळवदकर (२ रौप्य), वेदांत फुलारी (१ कांस्य), प्रणव पलनाटी (२ कांस्य), निशा सरवदे (२ सुवर्ण), स्वानंदी काळे (१ सुवर्ण व १ रौप्य), भ्रमरा गालपल्ली (२ कांस्य), लास्या शेरला (२ सुवर्ण),असित कांबळे (२ सुवर्ण), आदित्य तेल्लूर (२ कांस्य), निर्भय कोरे (२ कांस्य), स्वराली काळे (१ रौप्य व १ कांस्य), सारंग मठपती (२ कांस्य), उत्तरा पोतदार (२ कांस्य), अक्षता बिरोली (२ सुवर्ण), वर्षा मुलगे (२ सुवर्ण), विनायक हुच्चे (२ कांस्य), तन्मय तगडेकर (२ कांस्य), सोहम गाडे (१ कांस्य), आर्यन माळी (१ कांस्य).





## करमाळ्याचा धर्नुधर चिखले याची निवड

**करमाळा दि.२४ एप्रिल**

करमाळा येथील विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचा धर्नुधर शिवम राजेंद्र चिखले यांची भागलपुर बिहार येथे ४ ते ७ मे दरम्यान ह ७व्या खेलो इंडिया गेम्ससाठी निवड झाली आहे. शालेय राष्ट्रीय धर्नुविद्या स्पर्धेतील कामगिरीवरून त्याची निवड झाली. १७ वर्षे वयोगट मुले रिकर्व्ह या प्रकारात त्याने महाराष्ट्राकडून सुवर्णपदक पटकाविले होते. त्यास क्रीडा प्रशिक्षक प्रा.रामकुमार काळे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे विद्या विकास मंडळ सचिव विलासरावजी घुमरे, अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ.अनिल साळुंखे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक यांनी अभिनंदन केले.





# बीड व पंढरपूरचे शानदार विजय

## एनजीसीए करंडक १४ वर्षांखालील क्रिकेट

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

एनजीसीए करंडक १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत केसोना बीड संघाने एनजीसीए ब संघावर १२५ धावांनी विजय मिळविला.

निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमीने आयोजिलेली ही स्पर्धा डोणगाव रसत्यावरील पुष्प अकादमीच्या मैदानावर सुरू आहे. या स्पर्धेतील गुरुवारी झालेल्या दुसऱ्या सामन्यात के.वी.सी.पंढरपूरने गॅरी क्रस्टन संघावर २२ धावांनी मात केली. अवधूत हुच्चेने गोलंदाजाचे व ओम साईने (६६ धावा) सामनावीरचे पारितोषिक पटकाविले.

**संक्षिप्त धावफलक : केसोना बीड :** ३० षटकात ९ बाद १७१ (हर्षल पठाण ४१, श्रेयश कुलकर्णी २४, अर्णव जगदाळे ३-२७, पृथ्वीराज मुंडे, गौरव गादेकर व स्वरूप हातली प्रत्येकी एक बळी) वि. वि. **एनजीसीए ब :** १०.५ षटकात सर्व बाद ४६ धावा (ईमोन कुमार ९, उदयपुरी ४-१०, प्रसाद २-२०, समर्थ २-१)

**के.वी.पी., पंढरपूर :** ३० षटकात २ बाद १८१ (रेहान शेख ५७, वेदांत ५२, यशराज लटके ३५, तन्मय वाघमोडे १-३२, अर्जुन चटके १-१९) वि.वि. **गॅरी क्रस्टन क्रिकेट ॲकॅडमी :** २९. ५ षटकात सर्व बाद १५९ (ओम साई कोळी ६६, राज २५, तनिष्का गुर्रम १६, अवधूत हुच्चे ४-३०, शंभो धनवे २-२३)

# अकलूजला डॉ. आंबेडकर चषक क्रिकेट स्पर्धा २८ एप्रिलपासून

## १४ संघांचा सहभाग : आयपीएल स्पर्धेच्या धर्तीवर होणार सामने

**अकलूज, दि. २४ एप्रिल-**

परमपूज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त आयपीएल स्पर्धेच्या धर्तीवर अकलूज येथे डॉ. बी. आर. आंबेडकर चषक २०२५ या माळशिरस तालुका प्रिमियर लिग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन २८ एप्रिल ते ४ मे या कालावधीत विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुलात केले आहे.

या प्रथम वर्षीच्या स्पर्धेत तालुक्यातील १४ नामवंत संघांचा सहभाग असून क्रिकेटप्रेमींना उच्च दर्जाचे सामने पाहण्याची पर्वणी मिळणार आहे. स्पर्धेचे आयोजक डॉ. बी. आर. आंबेडकर चषक कमिटी असून त्यांनी या स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन केले आहे. ही स्पर्धा तालुकास्तरावर एक नवा आयाम ठरणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्तम क्रिकेटचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### दुचाकी गाडीसह लाखाचे पारितोषिक

या स्पर्धेतील विजेत्यास एक दुचाकी गाडीसह १ लाख १३४ रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात येईल. द्वितीय क्रमांक ६० हजार १३४, तृतीय व चतुर्थ क्रमांकास प्रत्येकी ३० हजार १३४ रुपये देण्यात येणार आहे. विजेता संघास आकर्षक किट बॅग देण्यात येणार आहे.

# साऊथ सोलापूर आपटे ग्रुपची मास्टर अकादमीवर मात

## रेल्वेची ७८ वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा

### अमीर शेख सामनावीर

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्युटच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल क्रिकेट स्पर्धेतील अ गटाच्या सामन्यात साऊथ सोलापूर आपटे ग्रुप ब संघाने मास्टर क्रिकेट अकादमीवर ३९ धावांनी मात केली.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेतील गुरुवारी झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना साऊथ सोलापूरने सर्व बाद २०९ धावा केल्या. विजयी २१० धावांचे लक्ष्य मास्टर क्रिकेट अकादमीस पेलवले नाही. त्यांचा डाव १७० धावात आटोपला. अष्टपैलू खेळी करणारा अमीर शेख ( ६ बळी व ४४ धावा) सामन्याचा मानकरी ठरला. त्यास राजा पटेल यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत. पंच म्हणून दयानंद नवले व नितीन गायकवाड तर गुणलेखक म्हणून सचिन गायकवाड यांनी काम पाहिले.

### संक्षिप्त धावफलक

**साऊथ सोलापूर आपटे ग्रूप (ब):** ३९.२ षटकांत सर्व बाद २०९ ( चेतन माढेकर ४६, आमिर शेख ४४, प्रेम कनले ३३ धावा, नवीन चिंता २ बळी, सर्वेश शीरुडे, ऋषिकेश चाटला, राज कोंढा, श्रेयस येमुल, राजेश येमुल व नितीकेश कंधी प्रत्येकी १ बळी)वि.वि. **मास्टर क्रिकेट अकॅडमी :** ३१.२ षटकांत सर्व बाद १७० (राजेश येमुल ४७, आर्यन काळे नाबाद ३९, श्रेयस येमुल १९ धावा, आमिर शेख ६, सूहान मकानदार ३ बळी)

**आजचा सामना : मॉडेल क्रिकेट अकॅडमी विरुद्ध पुष्प जिमखाना क्रिकेट अकॅडमी.**







# हरीश पटेल व मनीष लिंबोळे राज्य किक बॉक्सिंग पंच परीक्षा उत्तीर्ण


**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

राज्य किक बॉक्सिंग पंच परीक्षेत किक बॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन स्मार्ट सिटी सोलापूरचे सचिव हरीश पटेल व मनीष लिंबोळे हे उत्तीर्ण झाले. त्यांचे अध्यक्ष आप्पासाहेब महादेव चिंचकर व निशिकांत कोटा यांनी कौतुक व अभिनंदन केले. किक बॉक्सिंग असोसिएशन महाराष्ट्र यांच्या वतीने राज्य पंच प्रशिक्षण शिबीर पुणे येथे नुकतेच झाले. यात पटेल व लिंबोळे यांनी यश मिळविले. यात राज्यातील १२५ पंचांनी सहभाग घेतला होता. या शिबीरात महाराष्ट्राचे वरिष्ठ उपाध्यक्ष सूर्यप्रकाश मुंडपात यांचे मार्गदर्शन लाभले. आंतरराष्ट्रीय रेफ्री शिवानी राजहंस, प्रशांत कांबळे, मकरंद जोशी यांनी सर्व पंचांना किक बॉक्सिंग खेळाचे सर्व इव्हेंटच्या नियमांचे मार्गदर्शन केले.

## बारसकरची खेलो इंडियासाठी निवड

**मोहोळ, दि. २४ एप्रिल-**

भारत सरकारच्या क्रीडा मंत्रालयाच्या वतीने आयोजित केलेल्या खेलो इंडिया युथ गेम्स स्पर्धेसाठी मोहोळ येथील तनुजा बारसकर हीची मार्शल आर्ट प्रकारात निवड झाली. बोधगया, बिहार येथे या स्पर्धा ११ ते १३ मे दरम्यान होणार असून तत्पूर्वी महाराष्ट्राच्या टीमसह अधिकचा सराव बालेवाडी पुणे येथे होणार आहे. तनुजा ही सध्या दहावीच्या वर्गात शिक्षण घेत असून, मोहोळ येथील क्रांतिवीर भगतसिंग स्पोर्ट्स अकॅडमीमध्ये दशरथ काळे यांच्या मार्गदर्शनाखाली मार्शल आर्ट्सचे प्रशिक्षण घेत आहे. तनुजा ही मोहोळ मधून खेलो इंडिया ला जाणारी पहिलीच खेळाडू ठरली आहे.



# क्रीडा भारतीच्या पुरुषांच्या राज्य कबड्डी स्पर्धा आजपासून सोलापुरात

## राज्यातील १४ व सोलापूर जिल्ह्यातील ६ संघाचा समावेश, विजेत्यास एक लाखाचे पारितोषिक

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

येथील शिंदे चौकातील शिवस्मारकच्या मैदानावर २५ ते २७ एप्रिल दरम्यान डॉ. हेगडेवार करंडक पुरुष गटाची राज्यस्तरीय निमंत्रित कबड्डी स्पर्धा आयोजित केली असल्याची माहिती येथील क्रीडा भारतीचे सचिव राजेश कळमणकर यांनी दिली.

यासंबंधी आधिक माहिती सांगताना ते म्हणाले, क्रीडा भारती या स्पर्धा २०१२ पासून भरवित आहे. या स्पर्धेतील प्रथम चार संघाना रोख पारितोषिक, करंडक, पदक व सन्मानपत्र देण्यात येणार आहे. विजेत्यास एक लाखाचे पारितोषिक देण्यात येणार आहे. यात राज्यातील नामंवत १४ संघ व सोलापूर जिल्ह्यातील ६ अशा २० संघाना निमंत्रित केले आहे. ही स्पर्धा मॅटवर होत असून यासाठी दोन मैदाने तयार करण्यात आली आहेत. या स्पर्धा विद्युतझोतात सायंकाळी ६ ते १० यावेळात होतील. या स्पर्धेत भाग घेतलेल्या संघाची निवास व्यवस्था सरस्वती कन्या प्रशालेच्या वतीने व भोजन व्यवस्था छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळाच्या वतीने केली आहे.या स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २५) सायंकाळी ६ वाजता पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते होईल यावेळी आमदार विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख व अक्कलकोट भारतीचे अध्यक्ष अमोलराजे भोसले हे उपस्थित राहणार आहेत.

या पत्रकार परिषदेस क्रीडाभारतीचे अध्यक्ष डॉ. विलास हरपाळे, शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापुरे, भारतीय मजूदर संघाचे नरहरी मुळे, क्रीडा भारतीचे प्रांतमंत्री ज्ञानेश्वर मॅकल, सहमंत्री अरुण उपाध्ये, जिल्हा कबड्डी संघटनेचे उपाध्यक्ष मरगू जाधव, एल.एस. जाधव आदी उपस्थित होते.

### अशी मिळणार पारितोषिके व त्यांचे पुरस्कर्ते

प्रथम : एक लाख (महिला होमिओपॅथिक महाविद्यालय).
द्वितीय : ५० हजार (पदव्युत्तर महाविद्यालय, डॉ. विलास हरपाळे)
तृतीय : २० हजार (विद्या इंग्लिश स्कूल)
चतुर्थ : १० हजार (गोळवलकर गुरुजी).

### स्पर्धेतील सहभागी संघ

**राज्यातील संघ :** ओम साई क्रीडा मंडळ (सांगली), साई सेवा मंडळ (छत्रपती संभाजीनगर), स्वराज्य क्रीडा मंडळ (भूम), जय हनुमान क्रीडा मंडळ (रेनापूर), जयहिंद क्रीडा मंडळ (श्रीरामपूर), शिवम क्रीडा मंडळ (पैठण), भैरवनाथ क्रीडा संघ भोसरी (पुणे), ओम साई संघ चिखली (पुणे), प्रकाश तात्या बालवडकर स्पोर्टस् फाउंडेशन (पुणे), नवजीवन कबड्डी संघ (पुणे), अमर भारत क्रीडा मंडळ जे.जे. हॉस्पीटल (मुंबई), क्रीडा भारती संघ चिंचवडगार (पिंपरी चिंचवड), राकेश भाऊ घुले (पुणे), साई खेळाडू (परभणी).

**सोलापूर :** स्वराज्य स्पोर्टस् क्लब, शंभूराजे कुमठे, श्रीकृष्ण स्पोर्टस्, विघ्नहर्ता स्पोर्टस्, अंजुमन क्रीडा, श्रीराम स्पोर्टस्.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.















## अग्रलेख...

# पाकी पापाला 'पाणी'दार प्रत्युत्तर!

मानवतेच्या भावनेला भौगोलिक सीमांचे कुंपण नसते, तसे पाशवी क्रौर्यालादेखील भौगोलिक सीमांची बंधने नसतात. मानवतेच्या भावनेचे आंतरराष्ट्रीय नाते जपण्यासाठी भारताने शेजारी राष्ट्रांसोबतचे अनेक भेद बाजूला ठेवून न्याय्य मानवी हक्कांची कदर केली, त्यामुळेच सिंधू नदीच्या पाणीवाटपातील हिस्सा पाकिस्तान गेल्या साडेसहा दशकांपासून सुखैनेव उपभोगत असून, त्या देशातील लाखो लोकांच्या जगण्याची साधने संपन्न झाली आहेत. पण जेव्हा जिवावर बेतते तेव्हाच जगण्याचे खरे मोल समजते. जीव घेणाऱ्या पाशवी मानसिकतेलाही जगण्याचे मोल उमगावे यासाठी त्यांच्या जगण्याच्या साधनांचीच कोंडी केली तर कदाचित त्यांनाही जगण्याचे मोल समजून येईल आणि 'नाक दाबल्यास तोंड आपोआप उघडते' या न्यायाने अशा प्रवृत्ती दाती तृण धरून गुडघे टेकत जगण्याची भीक मागू लागतील, असेही केव्हा तरी व्हायलाच हवे असते. कारण जगणे हा जन्माला आलेल्या प्रत्येकाचा नैसर्गिक हक्क आहे आणि जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील कोणताही कायदा कोणत्याही रीतीने या हक्कावर गदा आणू शकत नाही ही बाब जगभरातील मानवी संस्कृतीने समंजसपणे स्वीकारलेली आहे. असे असताना, काही विकृत मानसिकतेच्या जमाती मात्र, जगण्याचा हक्क हिरावून घेण्यासाठीच हपापलेल्या असतात आणि आपल्या कट्टरतावादी आततायीपणातून निरपराधांवरच हल्ले करून त्यांचे जीवन संपविण्याचा विकृत राक्षसी आनंद मिळवितात तेव्हा अशा प्रवृत्तींचे नाक ठेचण्यासाठी जशास तसे हाच न्याय लावावा लागतो. असे प्रत्युत्तर देण्यासाठी प्रचंड धाडस लागते आणि जेव्हा संपूर्ण समाज एकमुखाने अशा धाडसास पाठबळ देण्यासाठी सारे भौतिक भेद विसरून एकत्र होतो, तेव्हा या संघटित शक्तीच्या विश्वासावर असे धाडस दाखविण्याची उमेदही बळावते. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटनाचा आनंद उपभोगण्यासाठी दाखल झालेल्या हिंदूंना धर्माची ओळख पटविण्यासाठी दहशत दाखवून अखेर काही पर्यटकांस गोळ्या घालून त्यांची निर्मम हत्या करणाऱ्या दहशतवाद्यांना पाकिस्तानची सर्वतोपरी फूस आहे आणि तेथेच या हत्याकांडाचा कट शिजवून त्यांना प्रशिक्षित करून पाठविण्यात आले, याबाबत शंका नसल्याची खात्री पटल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने आणि या अमानवी मानसिकतेतून झालेल्या हत्याकांडाचे गांभीर्य जाणणाऱ्या राजकीय पक्षांनी सहमतीने कारवाईचे काही निर्णय घेतले आणि जीव घेणाऱ्या प्रवृत्तींना जगण्याचे महत्त्व समजावण्यासाठी जगण्याच्या मार्गावरच बांध घालण्याची भूमिकाही घेतली. साडेपाच दशकांपूर्वी झालेल्या सिंधू नदी पाणीवाटप करारास पूर्णविराम देण्याचा आणि पाकिस्तानची पाणीकोंडी करण्याचा निर्णय घेऊन भारताने दाखविलेल्या या नीतीचे स्वागत करावयास हवे.

देशाला मिळालेल्या स्वातंत्र्याच्या समाधानाला त्या वेळेपासूनच फाळणीची वेदना होती आणि त्यात भर म्हणून भारतापासून अलग झाल्यानंतरही भारतविरुद्ध विखार ओकणाऱ्या पाकिस्तानने सातत्याने भारतावर अस्थिरता लादण्याचा असमंजस प्रयत्न चालविला आहे. भारताचे नंदनवन आणि पृथ्वीवरला स्वर्ग समजल्या जाणाऱ्या काश्मीरच्या खोऱ्याला गेल्या अनेक दशकांपासून लागलेल्या दहशतवादाच्या ग्रहणामुळे हे सौंदर्य काळवंडले आहे आणि ते तसेच राहावे यासाठी शेजारच्या पाकिस्तानातून सातत्याने राहूकेतूची भूमिका बजावली जात आहे. या राज्यात अस्थिरता माजविणे, धर्माच्या नावाखाली येथील सामान्य जनतेस चिथावणी देऊन देशविरोधी कारवायांसाठी फूस लावणे आणि हिंसाचाराचे सावट कायम दाटलेले राहावे यासाठी प्रशिक्षण दिलेल्या माथेफिरूंना खोऱ्यात धाडून त्यांच्याकरवी हिंसाचार घडविणे यात पाकिस्तानने कोणतीही कसर ठेवलेली नाही. मुंबईवरील अतिरेकी हल्ला, देशाच्या वेगवेगळ्या प्रांतांमध्ये बॉम्बस्फोट घडवून शेकडो निष्पाप बळी घेत दहशत माजविण्याचे कट आणि काश्मीरच्या खोऱ्यातील जनतेला वेठीस धरून नंदनवनाचे वाळवंट करण्याचे प्रयत्न यात पाकिस्तान आणि त्या देशाच्या सरकारपुरस्कृत यंत्रणांनी सातत्याने पुढाकार घेतल्याने दहशतवादाचे भूत भारताच्या मानगुटीवर कायमचे बसले आणि तो कायमचा निपटून टाकण्याच्या ईर्ष्येने मोदी सरकारने धाडसी पावले उचलली. दहशतवाद आणि त्यासाठी सुरू असलेला हिंसाचार ही एकट्या भारताची समस्या नाही, तर जगातील अनेक देश अशा कारवायांनी ग्रस्त आहेत आणि त्याची पाळेमुळे थेट किंवा अप्रत्यक्षपणे पाकिस्तानातच रुजलेली आहेत, हे जगाला पटवून देण्यात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अथक मोहिमांना आता यश येताना दिसू लागले असून या समस्येविरोधात एकत्रितपणे लढण्याची मानसिकता जागतिक स्तरावर निर्माण होत असल्याचे पाहून नैराश्य आलेल्या धर्मांध कट्टरतावाद्यांचा उरलासुरला विवेकदेखील आता हरपत गेला आहे. धार्मिक विद्वेषाच्या विखारी विकृतीची त्यात भर पडल्याने हा कट्टरतावाद आता थेट सामान्य नागरिकांच्या जिवावर उठला आहे. त्यामुळेच, आता ही केवळ आंतरराष्ट्रीय समस्या राहिलेली नसून राष्ट्रीय सुरक्षिततेशी संबंधित अशी सामान्यांच्या जगण्याच्या हक्कालाच आव्हान देणारी समस्या ठरल्याने, शून्य सहिष्णुता आणि शून्य सहनशीलता हे धोरण भारताने स्वीकारले आहे. गेल्या काही वर्षांत, विशेषतः जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे राज्यघटनेतील कलम ३७० निष्प्रभ करण्याचा कठोर निर्णय घेऊन या प्रदेशावरील भारताचा निर्विवाद हक्क जगासमोर अधोरेखित करण्याच्या मोदी सरकारच्या कृतीनंतर शून्य सहनशीलतेचे धोरण भारताने अनेकदा कृतीतूनही दाखवून दिले आहे. पाकिस्तानी वंशाचा नागरिक आणि भारतातील सामान्य नागरिकांच्या जगण्याचा हक्क हिरावून घेण्याचा विकृत कट आखणाऱ्या टोळीचा सूत्रधार असलेला तहव्वूर राणा यास भारतात आणून त्याच्या पापाचे माप त्याच्या गळ्यात घालण्याची भारत सरकारची कृती ही त्या धोरणाच्या यशाचा ठोस पुरावा ठरल्याने, नैराश्यग्रस्त पाकिस्तानकडून नव्या आततायीपणाचा विखार ओकला गेला आणि पहलगाममधील निष्पाप पर्यटकांवर सूड उगविण्यासाठी दहशतवाद्यांना प्रशिक्षण देऊन भारताच्या सीमापार पाठविण्याचा पाकपुरस्कृत कट आखला गेला, हे आता पुरेसे स्पष्ट झाले आहे. आता या पापाला क्षमा नाही, हे भारताने केवळ ठणकावलेले नाही, तर सिंधू पाणीवाटप करार मोडीत काढून त्याची अंमलबजावणीही सुरू केली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सुरक्षाविषयक समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. सुमारे १२ लाख किलोमीटर एवढ्या क्षेत्रात संचार करणाऱ्या सिंधू नदीचे ४७ टक्के क्षेत्र पाकिस्तानात असल्याने सिंधू नदीचे पाणी पाकिस्तानला मिळत राहिले पाहिजे यासाठी १९४७ मध्ये झालेल्या कराराची मुदत एक वर्षात संपल्यानंतर या क्षेत्रातील १७ लाख एकर शेतजमिनीस त्याचा फटका बसल्याचा अनुभव पाकिस्तानने एकदा घेतला आहे. त्यामुळे पुढे जवळपास दशकभर चाललेल्या वाटाघाटींतून १९६० साली सिंधू पाणीवाटप करार अस्तित्वात आला आणि तेव्हापासून भारताने हा करार प्रामाणिकपणे पाळला. भारतावर होणारे दहशतवादी हल्ले आणि अस्थिरता माजविण्याच्या प्रयत्नांतील पाकिस्तानचा सहभाग पाहता, हा करार रद्द करण्याची मागणी सातत्याने होत असतानाही भारताने मानवतावादी दृष्टिकोन दाखविला आणि कराराचे पालन सुरू ठेवले. पहलगाम हल्ल्यानंतर आता मात्र या करारास स्थगिती देऊन भारताने पाकिस्तानची कोंडी केली आहे. आता पाकिस्तानला गंभीर पाणीसमस्या भेडसावू लागेल. पाण्याविना तडफडताना त्यांना पाण्याचे, म्हणजे जीवनाचे महत्त्व समजेल आणि जगण्याचे मोलदेखील उमगेल. केवळ शेतीलाच नव्हे, तर अर्थव्यवस्थेलाही त्याचा फटका बसल्यास, टंचाई, महागाई आणि उपासमारीच्या संकटाचे चटके जेव्हा बसू लागतात, तेव्हा जगण्याचे महत्त्व समजून येते. भारताच्या या कृतीने पाकिस्तानला शहाणपण आले, तर ठीकच, अन्यथा, पहलगामच्या कृतीमुळे पापाचा घडा भरला आणि आता अखेरची वेळ आली, हे समजावण्यासाठी भारताची सिद्धता सुरू झाली आहे. पाकिस्तानचे पाणी रोखल्यावर मानवतावाद्यांच्या उरात कळ उमटू शकेल, मानवाधिकारांच्या जाणिवाही जाग्या होऊ शकतील, पण जीवघेण्या कारवायांत बळी पडणाऱ्यांना न्याय देण्यासाठी हाच न्याय लावावा लागेल. भारत सरकारची ही कृती यासाठीच समर्थनीय ठरते.

## प्रासंगिक

# सार्वत्रिक समान मोफत आरोग्यसेवा हवी

**श्यामकांत पात्रीकर**

पुण्याच्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात एका गरोदर महिलेला दाखल करून न घेतल्याने प्रसूती दरम्यान तिचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे प्रकरण सध्या राज्यात गाजत आहे. मंगेशकर रुग्णालय धर्मादाय म्हणजेच दानशूर आणि सेवाभावी संकल्पनेतून उभारले गेले आहे. त्यामुळे धर्मादाय रुग्णालयांनी रुग्णांना मोफत किंवा किफायतशीर आणि सेवावृत्तीने सेवा देणे अपेक्षित आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, आरोग्याकडे कोणाचेही लक्ष नाही आणि त्यामुळे आरोग्यसेवेचे धिंडवडे निघाले आहेत. कायद्यामध्ये तरतुदी असताना, रुग्णांना योग्य ते उपचार मिळतात किंवा नाही हे पाहण्यासाठी विधानमंडळ स्तरापासून जिल्हाधिकारी स्तरापर्यंत समित्या तयार करून त्यांच्यावर नियमितपणे आढावा घेण्याची जबाबदारी असताना त्याची अंमलबजावणी होत नसेल, तर अशा कायद्यांना अर्थ राहत नाही. लोकप्रतिनिधींनी जे कायदे केले आहेत, त्यांची त्यांच्या मतदारसंघात अंमलबजावणी होते किंवा नाही हे पाहायला काय हरकत आहे? वास्तविक संबंधित रुग्णालयांवर कारवाई होईलही. पण, कोणी चुकीचे वागल्यानंतर त्यावर कारवाई करणे तितकेच पुरसे नाही. मुळातच कायदे अंमलबजावणी यंत्रणा आणि पर्यवेक्षकीय समित्या यांनी कायमस्वरूपी सतर्क असावे यासाठी त्यांच्यावर जबाबदारी टाकण्यात आली आहे. समाजाने आणि शासनाने एक लक्षात घेतले पाहिजे की, याबाबतीत सचिव आरोग्य विभाग, सचिव विधि व न्याय विभाग, सचिव नगर विकास विभाग वरिष्ठ अधिकारी महापालिका आयुक्त असे प्रकार थांबविण्यासाठी काय कार्यवाही करीत होते. जोपर्यंत दिलेली जबाबदारी योग्य तऱ्हेने पार पाडली नाही म्हणून कुचराई करणाऱ्यावर कारवाई होणार नाही, तोपर्यंत असे प्रकार यापुढेही चालू राहतील. त्यामुळे केवळ रुग्णालयावर कारवाई व्हावी, त्याचबरोबर संबंधित ज्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी आहे त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले म्हणून त्या अधिकाऱ्यांवरही कारवाई केल्यास भविष्यात असे प्रकार टाळता येणे शक्य होईल.

**शासकीय आरोग्यसेवेचे पुनरुज्जीवन :** युनिव्हर्सल हेल्थ केअर म्हणजे सार्वत्रिक समान मोफत आरोग्य सेवा. शासनाने सर्वांना मोफत आरोग्यसेवा देणे हा प्रत्येक नागरिकांच्या आर्थिक स्तरापलीकडे त्याचा अधिकार आहे, हे विसरून चालणार नाही. जवळपास ८० टक्के आरोग्यसेवा खाजगी रुग्णालये व धर्मादाय रुग्णालये देत आहेत, तर जेमतेम २० टक्के रुग्णसेवा ही पूर्णपणे शासकीयसेवेच्या अधीन आहे आणि माध्यमातून देण्यात येत आहे. सर्व जनतेच्या आरोग्यसेवेचे सार्वत्रिक समान मोफत आरोग्यसेवा निश्चित उत्तर शोधायचे असल्यास मोडकळीला आलेल्या शासकीय सेवेचे पुनरुज्जीवन करणे, आवश्यक झालेले आहे. आज अस्तित्वात असलेली शासकीय आरोग्यसेवा २००१ च्या जनगणनेनुसार असून, त्यात अनेक त्रुटी आहेत. सर्वांना समान मोफत आरोग्यसेवेची सुरुवात हे खरे तर माता व बाल आरोग्यापासून केली तरी ते एक मोठे पाऊल ठरेल. त्यानंतर इतर सर्व भागांमध्ये हे प्रारूप राबविता येईल. सार्वत्रिक आरोग्य सेवेचा मूळ गाभा केवळ मोफत सेवा नव्हे, तर सर्व आर्थिक स्तरांना समान दर्जाची सेवा देणे हा आहे. आज गर्भश्रीमंत, उच्च मध्यमवर्ग, मध्यमवर्ग व निम्नस्तरातील वर्ग त्यांना जी परवडेल त्या दर्जाची सेवा घेतात. या सर्व वर्गांना समान दर्जाच्या सेवा मिळणे अपेक्षित आहे. आज महाराष्ट्रातील नागरिकाचा आरोग्यसेवेवर खिशातून होणारा खर्च ६० टक्के एवढा आहे. हा खर्च सार्वत्रिक आरोग्यसेवेच्या माध्यमातून शून्यावर आणण्याचे ध्येय ठेवायला हवे. याची सुरुवात ही आरोग्य क्षेत्रासाठी आर्थिक तरतुदीपासून होते. एकूण आरोग्यसेवेच्या बाबतीत शासनाला केवळ खाजगी व धर्मादाय रुग्णालयांवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा म्हणून नव्हे, तर त्या तोडीची किंबहुना त्यापेक्षाही दर्जेदार सेवा देणारी यंत्रणा उभी करावी लागेल.

**कामकाजाचे अंकेक्षण :** ज्या उद्देशाने जागा दिली होती, त्याकरिता जर ती वापरली जात नसेल किंवा त्या उद्देशाच्या विपरीत जर वागणूक केली जात असेल, तर निश्चितपणे सदर दान दिलेली जागा परत घेतली जाऊ शकते. एवढेच नव्हे, तर आतापर्यंत किती ग्राहकांना पूर्ण पैसे घेऊन व किती ग्राहकांना सवलतीमध्ये उपचार देण्यात आला, याची संपूर्ण माहिती मागविता येईल तसेच संस्थेचे नफा-तोटा पत्रक आणि अंकेक्षण अहवाल मागून संस्थेविषयी संपूर्ण खरी माहिती जाणून घेता येईल. त्याचप्रमाणे सदर सवलतीचा लाभ मिळवून देण्यासाठी केंद्रीय शासकीय यंत्रणा असण्याची गरज आहे व त्यामार्फत नोंदणी घेऊन गरिबांना लाभ करून देता येईल. उदाहरणार्थ : फोन क्रमांक १०४ अंतर्गत आरोग्यविषयक सल्ला दिला जातो. त्याच क्रमांकामार्फत गरजूंना लाभ करून देता येऊ शकतो. फक्त लाभ करून देणारी समिती तज्ज्ञ व प्रामाणिक असण्याची गरज आहे. सर्व महाराष्ट्रातील धर्मादाय हॉस्पिटलमधील राखीव जागांची माहिती व नियंत्रण सदर यंत्रणेकडे असावे व ग्राहक चळवळ आणि अन्य सामाजिक संस्थांमधील कार्यकर्ते या समितीमध्ये असावेत. आता तरी अतिशय तातडीने धर्मादाय आयुक्त व शासनाने तसेच अन्य सर्व संबंधितांनी कृती करावी, अशी अपेक्षा आहे.

**आरोग्य योजना ऑनलाईन कराव्यात :** एखाद्या मोठ्या रुग्णालयात जर १०० खाटा (बेड) असतील, तर फक्त २० खाटा यांना धर्मादाय सवलती असतात आणि ८० खाटा हॉस्पिटल्स प्रशासनाच्या असतात. मग रुग्णाला कसे कळणार १०+१०=२० खाटा. संबंधित हॉस्पिटलमध्ये रुग्णाला भरती केले आहे. धर्मादाय रुग्णालयामध्ये २० टक्के खाटांमधून १० टक्के खाटा रिकाम्या असतील व रुग्णालय म्हणेल की एकही खाट रिकामी नाही. तुम्हाला शुल्क देऊन भरती व्हावे लागेल, अशा स्थितीत रुग्ण काय करणार? सरकारने महाराष्ट्रातील सर्व धर्मादाय रुग्णालयांचा डाटा ऑनलाईन केल्यास तेथील किती खाटा धर्मादाय कोट्यातील रिकाम्या आहेत, ते कळेल.

सरकारी योजना मग धर्मादाय, म. जोतिबा फुले योजना, प्रधान मंत्री आरोग्य योजना यामध्ये गैरमार्गाने पैसै कमाई करत असेल, तर सरकारने कडक कारवाई करावी व रुग्णांना धर्मादाय कोट्यातील २० टक्के फायदा करून द्यावा. याकरिता आरोग्य विभाग, जिल्हा, तालुका यांनी जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे. नाही तर धर्मादाय योजनेचा बट्ट्याबोळ होईल. एखाद्या राजकीय व्यक्तीची रुग्णालयात घटना घडली, तर सर्व यंत्रणा कामी लागते व दररोज सामान्य रुग्ण कितीही वेदना सहन करत असेल, तर त्याकडे मीडिया, सरकार, प्रशासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष होते. रुग्ण कुणीही असो त्याला एक रुग्ण म्हणूनच प्रशासनाने बघावे. दोघांना सारखी मदत करावी व सारख्या नजरेने बघावे. सर्व रुग्णालयांत रुग्ण हक्क सनद व दरपत्रक दर्शनीय भागात लावावे. यामुळे रुग्ण, रुग्णालय व डॉक्टर यांचे वाद होणार नाहीत आणि रुग्ण व डॉक्टर यांचे संबंध जिव्हाळ्याचे राहतील. सर्व सरकारी रुग्णसेवा धर्मादाय, महात्मा जोतिबा फुले योजना, प्रधानमंत्री आरोग्य योजना याचा फायदा पारदर्शकपणे रुग्णांना व्हावा, अशी अपेक्षा आहे. धर्मादाय आयुक्त व संबंधित मंत्री यांनी याकडे विशेषत्वाने लक्ष देण्याची गरज आहे व जनता आणि सामाजिक संस्थांनी पाठपुरावा करण्याची गरज आहे.

९८८१७१७८४६


## वेध

**संजय रामगिरवार**

# सुट्यांमध्ये कामावर राहणार शिक्षक!

आपल्या शिक्षण व्यवस्थेची बिकट स्थिती सांगणारी एक प्रसिद्ध गोष्ट आठवली. शाळेची पाहणी करण्यासाठी शिक्षणाधिकारी येतात. वर्गात जाऊन ते एका विद्यार्थ्याला विचारतात, सांग बघू शिवधनुष्य कुणी मोडले? तो उत्तरतो, मी नाही मोडले बाबा! गुरुजींना विचारतात, बघा हा काय म्हणतो! गुरुजी सांगतात, साहेब मी 'गॅरंटी' घेतो, हा मुलगा तसे करणार नाही!! मग साहेब तरातरा हेडमास्तरकडे जातात आणि घडलेला प्रकार सांगतात. त्यावर हेडमास्तर म्हणतात, कोण नाही म्हणतो. मी छडी घेऊन गेलो तर सगळेच म्हणतील शिवधनुष्य मीच मोडला म्हणून... पण साहेब जाऊ द्या न, मोडला तर मोडला, मी दुसरा विकत आणतो!!!

'एनएएस' आणि 'एएसईआर' अशा विविध सर्वेक्षण अहवालात महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत अतिशय भयाण स्थिती समोर आली आहे. त्यामुळे सरकार खडबडून जागे झाले असून, त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान कौशल्य विकसित करण्यासाठी राज्यात निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत कृती कार्यक्रम आखला आहे. तसा शासन निर्णय ५ मार्च रोजी जारी करण्यात आला आहे.



''प्राथमिक शाळांमध्ये पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान साध्य करणे ही शिक्षणव्यवस्थेची सर्वोच्च प्राथमिकता असून, अगदी प्राथमिक अध्ययन आवश्यकता (म्हणजे, मूलभूत पातळीवरील वाचन, लेखन आणि अंकगणित) साध्य केली तरच, शिक्षणाचे उर्वरित धोरण विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरेल'', हे या शासन निर्णयातील विधान अतिशय बोलके आहे. या अभियानात विद्यार्थी, पालक, शाळा, शिक्षक, समाज व शासकीय यंत्रणा या सर्वांच्या समन्वयाने विद्यार्थ्यांच्या भावी शिक्षणाचा पाया मजबूत करायचा आहे. इयत्ता २ रीपेक्षा वरच्या वर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी अपेक्षित अध्ययन क्षमता प्राप्त केल्या नाहीत, त्यांना त्या प्राप्त करून देण्यासाठी हे अभियान राबवले जात आहे. ते ५ मार्च ते ३० जून २०२५ पर्यंत चालणार आहे. हा तसा सुटीचा कालावधी असला तरी शिक्षकांना आपल्या विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडता येणार नाही. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षमतेनुसार स्वतंत्र गट तयार करून अध्ययनाचे वेळापत्रक ठरवायचे आहे. त्यांना वाचन शिकवणे, अंक ओळख येणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांचा विशेष वर्ग ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने घ्यायचा आहे.

खरे तर, शिक्षकांना असे कुठलेही कार्यक्रम दिले तर ते थातुरमातुर पद्धतीने पूर्ण करतात किंवा कागदं तेवढे रंगवतात आणि काही तरी केल्याचे दाखवतात, असा आजवरचा अनुभव आहे. पण त्यावर उपायही या शासन निर्णयात नमूद आहे. मे महिन्यामध्ये सुट्या मिळाव्यात म्हणून एप्रिल महिन्यामध्येच घाईघाईत अभियानाचे तीन तेरा वाजवू नये किंवा अभियान झाल्याचे घोषित करू नये किंवा एकदा तसे घोषित केल्यानंतर हे विद्यार्थी पुन्हा मागील टप्प्यावर येणार नाहीत याची दक्षताही घ्यायची आहे, अशी तंबी या शासन निर्णयात शिक्षकांना आणि विशेषतः मुख्याध्यापकांना दिली गेली आहे. कोणत्या वर्गातील मुलाला काय यावे, त्यांना प्रशिक्षित कसे करावे आदी सविस्तर माहिती दिली गेली आहे.

या आदेशात पुढे असेही म्हटले आहे की, या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी इयत्ता २ री ते ५ वीच्या विद्यार्थ्यांना नियमितपणे शिकविणाऱ्या शिक्षकांची प्रत्येक वर्गासाठी विशेष आदेशाने नावनिहाय नेमणूक मुख्याध्यापकांनी तत्काळ करावी. विद्यार्थी या कृती कार्यक्रमासाठीच्या अपेक्षित अध्ययन क्षमता प्राप्त करतील, तसा तसा प्रगती अहवाल 'चावडी वाचन व गणन' कार्यक्रमात सादर करावा लागणार आहे. १ मे २०२५ रोजीच्या ग्रामसभेमध्येही 'चावडी वाचन व गणन' याचे सादरीकरण करावे लागेल. विद्यार्थी कशा पद्धतीने प्रगती करीत आहे याचा अहवाल मुख्याध्यापकांनी सादर करावा. शिक्षक व मुख्याध्यापक मनमानी करणार नाही यासाठी शाळाभेटी करताना पर्यवेक्षकीय यंत्रणेने या साऱ्या मुद्यांकडे प्रामुख्याने लक्ष द्यावे, असेही या शासन आदेशात म्हटले आहे.

अतिशय चांगला आणि विद्यार्थ्यांचा पाया मजबूत करणारा हा निर्णय आहे. मात्र, आजवर शिक्षकांना कोणतेही काम सांगितले की, त्यांच्या विविध शिक्षक संघटना दंड थोपटून आडव्या येतात. या शासन निर्णयाबाबत तरी तसे होऊ नये अशी अपेक्षा आहे. अन्यथा, आमच्या शिक्षकांना सुट्या का उपभोगू देत नाही, असा युक्तिवाद या शिक्षक संघटना करू शकतात आणि आंदोलनाची धमकी देऊ शकतात. असे झाल्यास त्यापेक्षा मोठे दुर्दैव या व्यवस्थेचे आणि विद्यार्थ्यांचे असणार नाही, हे खरे...

९८८१७१७८३२

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# ठाकरे बंधू एकत्र येतील?



उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोघे चुलत भाऊ एकत्र येत असल्याच्या चर्चेने सध्या धुमाकूळ घातला आहे. राजकारणात काहीही होऊ शकते. त्यामुळे दोन मराठी माणसं आणि तेही दोन भाऊ एकत्र येत आहेत अशा पॉझिटिव्ह चर्चेने मराठी माणूस कमालीचा सुखावला आहे. बाळासाहेब ठाकरे होते तेव्हा हे दोघे एकत्र शिवसेनेत होते. २००५ साली राज ठाकरे यांनी शिवसेना सोडली तेव्हा बाळासाहेब हयात होते. राज ठाकरेंनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना नावाने वेगळा राजकीय पक्ष काढला. तेव्हापासून हे दोघे एकत्र येत असल्याच्या चर्चा अधूनमधून उठतात आणि थांबतात. सध्या दोन्ही भाऊ 'रिकामे' आहेत. ते ज्यांचा वारसा सांगतात त्यांचा पक्ष एकनाथ शिंदे यांनी केव्हाच हायजॅक केला आहे. आता कुठल्याही मोठ्या निवडणुका नसताना दोघांच्या एकत्र येण्याच्या चर्चेने साऱ्यांनाच बुचकळ्यात टाकले आहे. या चर्चेला निमित्त झाले ते एका मुलाखतीचे. सिने दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी घेतलेली ही राज ठाकरे यांची 'पॉडकास्ट' मुलाखत आहे. भावासोबत जाणार का? या प्रश्नावर राज ठाकरे यांनी दिलेल्या उत्तराने मनोमिलनाची चर्चा पेटली आहे. महिन्यापूर्वी घेतलेली ही मुलाखत नुकतीच रिलीज झाली तेव्हा राज ठाकरे यांचे विमान उन्हाळी सुटीवर उडाले होते. उद्धव ठाकरे मात्र त्या दिवशी देशात होते. त्यांनी काही अटी-शर्ती घालून भावाच्या टाळीला हाळी दिली तेव्हापासून उलटसुलट चर्चा सुरू आहे. यांनी बिरबलाची खिचडी शिजायला ठेवली आहे का? या दोघांनी एकत्र यावे असे अनेक प्रसंग गेल्या २० वर्षांत घडले. मात्र तेव्हा एकत्र येणे तर दूर, एकत्र येण्याचा सूरही न आळवणारे हे भाऊ आता एकत्र येतील? तुम्हाला काय वाटते? पवार कुटुंबात चालते तशी ही मिलीजुली कुस्ती असेल का? महिन्यापूर्वी झालेली मुलाखत विदेशात असताना राज यांनी रिलीज करणं आणि त्यावर लगेच उद्धव ठाकरे यांनी तयारी दाखवणं, हे एवढे झटपट शक्य होऊ शकते? 'फिक्सिंग' तर नाही ना? लोकांमध्ये कुजबुज आहे. दोघांचे एकत्र येणे लोकांना आवडले का? याची चाचपणी हे दोघे करीत असतील का? राज ठाकरे २९ तारखेला मुंबईला परतत आहेत. 'तोपर्यंत या विषयावर चर्चा नको' असा संदेश त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना पाठवला आहे. तोपर्यंत चघळायला सस्पेन्स चांगला आहे. माझी छोटी इच्छा आहे. युती करा किंवा करू नका. पण निदान सकाळचा 'भोंगा' बंद करायला तरी एकत्र या.

ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याच्या बातम्या मराठी मनाला गुदगुल्या करणाऱ्या नक्कीच आहेत. पण तुम्ही लिहून ठेवा. हे दोघे भाऊ एकत्र येणार नाहीत. २० वर्षांत एकत्र यावं असं या दोघांना कधी वाटलं नाही. आता या दोघांकडे एकत्र येण्याएवढं असं काय उरलं आहे? मुलांच्या निवडणुकीनिमित्ताने या दोघांना एकत्र येता आले असते. मात्र ती संधी दोघांनी वाया घालवली. राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे आपली पहिलीच निवडणूक हरले. त्यांच्याविरोधात भावानेच नव्हे तर एकनाथतात्यानेही आपापले उमेदवार मैदानात उतरवले होते. आदित्य ठाकरेंच्या पहिल्या निवडणुकीत राज ठाकरेंनी आपला उमेदवार दिला नव्हता. ते उपकार उद्धव यांनी यावेळी अमित ठाकरे यांच्या निवडणुकीत लक्षात ठेवले नाहीत. तिरंगी लढतीत राज ठाकरेंचा मुलगा पहिलीच निवडणूक हरला. भावाच्या मुलाबद्दल इतका टोकाचा विचार करणारे भाऊ एकत्र येतील हा विचार कसा शक्य आहे? राजकारणात मोठमोठ्या आघाड्या झाल्या आहेत. जनता पक्ष हा अशाच वेगवेगळ्या भूमिका असलेल्या पक्षांचे कडबोळे होता. जनमानसाच्या दबावाखाली हे पक्ष एकत्र आले. पण मनाने एकत्र नव्हते. त्यामुळे जनता पक्ष टिकू शकला नाही. भाजप-शिवसेना युतीत २५ वर्षे सडलो असे उद्धव म्हणाले होते. त्यांच्या मनात मुख्यमंत्री व्हायचा किडा शरद पवारांनी सोडला होता. आता 'एकत्र यायचं असेल तर भाजप आणि शिंदे सेनेला बाजूला ठेवून या' अशी नाजूक अट उद्धव यांनी घातली आहे. राज ठाकरेही आपल्या अटी पुढे करू शकतात. अशा अटीतटी घालून ऐक्य होत नसते. झाले तरी टिकाऊ नसते. नेते एकत्र आले तरी कार्यकर्ते एकत्र येतीलच अशातला भाग नसतो. एकत्र आले तरी बॉस कोण? हा कळीचा मुद्दा उरतोच. राज आणि उद्धव दोघेही स्वयंभू नेते आहेत. कोणाच्या हाताखाली काम करू शकत नाहीत. एका म्यानात दोन तलवारी राहू शकत नाहीत. त्यामुळेच या दोघांच्या एकत्र येण्याचा मुद्दा तसाही निकालात निघतो. पण राजकारणात चमत्कार होऊ शकतो. तेच आपल्याला पाहायचे आहे. उबाठा सेनेचे फक्त २० आमदार निवडून आले आहेत. त्यातले दहा मुंबईतले आहेत. राज ठाकरेंकडे एकही आमदार नाही. तरीही दोघांच्या शक्तीची चर्चा होते. कारण एकाकडे वक्तृत्व आहे तर दुसऱ्याकडे संघटना. महाराष्ट्राचे हित, मराठीच्या अस्मिता... वगैरे बोलायला ठीक आहे. पण जनतेच्या दरबाराचे काय? सभांना गर्दी झाली म्हणून मतं मिळत नाहीत आणि टोणपे हाणले म्हणून निवडणुका जिंकता येत नाहीत हे वारंवार स्पष्ट झाले आहे. तरीही मराठी माणसाला या दोन नेत्यांचे आकर्षण सोडवत नाही. त्यांच्या न होऊ घातलेल्या युतीची चर्चा त्यामुळेच सुरू आहे. पण भावाला धरताना काँग्रेस आणि शरद पवार म्हणजे 'शिल्लक राष्ट्रवादी'ला सोडण्याचा धोका उद्धव पत्करतील? शरद पवार काँग्रेसला सोडणार नाहीत कारण त्यांना आपल्या मुलीच्या करीअरची चिंता आहे. दोन्ही भावांना आपल्या मुलांच्या भवितव्याची चिंता आहे. एकूणच महाराष्ट्राचे संपूर्ण राजकारण 'मित्रांच्या' शोधात आहे. पुतण्याने काकाचा पक्ष पळवला. तेवढ्यापुरती पाडापाडी झाली. निवडणूक संपल्या. कटुता संपली. याला म्हणतात पवारांचे राजकारण. आता तर काका-पुतण्याची जवळीक वाढली आहे. दहा दिवसांत तीनदा भेटले आहेत काका-पुतण्या. शरद पवारांना समजायला शंभर जन्म लागतील असे संजय राऊत म्हणतात ते खरे मानायचे का? काय गंमत आहे पाहा. काका-पुतण्या केव्हा एकत्र येणार याची चर्चा होत नाही. कारण एकत्र यायला दूर कुठे गेले होते? शुगर इन्स्टिट्यूट, साखर संघ, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, रयत शिक्षण संस्था... या नेहमीच्या अड्ड्यांवर तुम्हाला काका-पुतण्या केव्हाही दिसू शकतात. मग अजितदादांना ओढून कोणाचा फायदा झाला?

सुप्रीम कोर्टात अडकलेल्या महापालिकेच्या निवडणुका या वर्षअखेर लागतील अशी माहिती आहे. मुंबई महापालिकेत उद्धव ठाकरे यांचा प्राण अडकला आहे. गेली कित्येक वर्षे मुंबई महापालिका ठाकरेंकडे होती. यावेळी कुठल्याही परिस्थितीत तिथे भाजपचा झेंडा फडकवायचा असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. मुंबई जिंकायची असेल तर भाजपला बहुरंगी लढती कराव्या लागतील. मुंबईत अजूनही २५ टक्के मराठी टक्का उरला आहे. सारी मारामारी या मराठी मतांसाठी आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## इंग्लंडच्या राजाला झाले तरी काय?

ईस्टर संडेच्या निमित्ताने इंग्लंडचे राजे चार्ल्स तृतीय यांनी इस्लामचे कौतुक केले. ते त्यांनी भयापोटी केले की, त्यांना इस्लामचा खूप पुळका आला हे त्यांचे त्यांनाच ठाऊक. ब्रिटनचे काही राजकीय पक्षही मुस्लिमधार्जिणे आहेत. त्यात आता राजे साहेबांची पण भर पडली. राजे चार्ल्स यांच्या इस्लामप्रेमामुळे तेथील ख्रिस्ती मात्र प्रचंड संतापले आहेत. तिथे प्रतिक्रियांचा समाज माध्यमांमध्ये पाऊस पडतो आहे. काही तर अगदी तीव्र प्रतिक्रिया आहेत. राजे चार्ल्स तृतीय यांनी धर्मांतरण केले आहे का? असे प्रश्न सातत्याने विचारले जात आहेत. ब्रिटनचा राजा हा ख्रिस्ती धर्माचा रक्षक मानला जातो. कट्टरपंथी जिहादींच्या विरोधातील युद्धाचे नेतृत्व इंग्लंडने केले होते. असे असता राजे चार्ल्स तृतीय यांची भूमिका विरोधाभासी वाटते. ब्रिटनमध्ये मोठ्या प्रमाणात मुसलमानांची संख्या वाढते आहे. तेथील कारागृहात मोठ्या संख्येने जिहादी, आतंकवादी आणि मुस्लिम गुन्हेगार आहेत. तेथेही त्यांनी वर्चस्व स्थापित केले आहे. ब्रिटनमध्ये दोन ते तीन मुस्लिम महापौर निवडून आले आहेत. ब्रिटनमध्ये मुस्लिम लोकसंख्या ही दुसऱ्या क्रमांकाची झालेली आहे. त्यामुळे लोकसंख्येसोबतच कट्टरतावाद, द्वेष, धार्मिक दंगली यामध्ये वाढ झाली आहे आणि अशा परिस्थितीत राजे चार्ल्स तृतीय यांनी केलेले विधान हे भयापोटी तर नाही ना! अशी शंका येते. परवाच्या काश्मीरच्या उदाहरणाने हे दाखवून दिले की, आपण किती सावध असायला हवे.

**माधवी पत्की**/नागपूर

## वाचक पत्रे

## देशांतर्गत गुन्हेगारीची कीड नष्ट होणे आवश्यक

बदलत्या काळाप्रमाणे गुन्हेगारीचे स्वरूप देखील बदलले दिसून येते. विशेषतः आधुनिक तंत्रज्ञानाचा अत्यंत हुशारीने व चतुराईने त्याचा वापर करून गुन्हेगारीने वेगळ्या उच्चांक गाठला आहे. गेल्या काही वर्षांत दहशतवाद, हत्याकांड आणि आर्थिक फसवणूक याचे देखील प्रमाण वाढलेले आहे. दहशतवादाला जरी आळा बसल्याचे केंद्र सरकारकडून सांगितले जात असले तरी हा दहशतवाद वेगवेगळ्या पद्धतीने जोपासला जात आहे. आर्थिक क्षेत्रातसुद्धा वेगळ्या पद्धतीने हा दहशतवाद पाहायला मिळतो. आधुनिक तंत्रज्ञानाबरोबर इतर पद्धतीचा वापर करून गुन्हे केले जातात. ज्यामध्ये हवाला प्रकारापासून ते कर्ज घोटाळ्यापर्यंत अनेक प्रकारचा समावेश होतो. हजारो कोटींचा घोटाळा करून हे गुन्हेगार सफाईने सुगावा न लागता परदेशात पळून जातात आणि त्यामुळे त्यांना भारतात आणणे अधिक कठीण झालेले आहे. या गुन्हेगारांमध्ये गुन्हेगारी क्षेत्रात तरबेज असलेले अतिश्रीमंत किंवा मोठे उद्योगपती यांचाही समावेश असतो.

अलिकडेच अशा प्रकारच्या गुन्हेगारीसाठी केंद्रीय गृहमंत्रालयाने भारतपोल नावाची यंत्रणा विकसित केली आहे. इंटरपोलप्रमाणे या भारतपोलच्या माध्यमातून परदेशात पळून गेलेल्या गुन्हेगारांना भारतात आणणे सोपे होऊ शकेल. या प्रकारच्या उपाययोजनांची आवश्यकता भारताला नक्कीच होती यात काही शंका नाही. जगातल्या अनेक देशांमधल्या तपासयंत्रणांशी संपर्क साधणे, परदेशात पळून गेलेल्या गुन्हेगारांचे किंवा आरोपींचे पुन्हा भारताकडे प्रत्यार्पण करणे, शिवाय परदेशात पळून गेलेल्यांविरुद्ध भारतात खटला चालवून त्या त्या देशांना हे आरोपी भारताकडे सुपूर्द करण्याची विनंती करणे यासारख्या तरतुदींचा त्यात समावेश आहे. अधिकाधिक तंत्रज्ञानाचा वापर करून या गुन्हेगारांना शोधण्याचे काम या भारतपोलमुळे होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. परंतु देशांतर्गत गुन्हेगारीचा आलेख लक्षात घेता तर परिस्थिती चिंताजनक असल्यासारखेच दिसून येते.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

## धार्मिक कृतींमागील अध्यात्मशास्त्र!

मी २ वर्षांपूर्वी एका गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमाला गेले होते. ती गुरुपौर्णिमा मला अन्य ठिकाणच्या गुरुपौर्णिमेपेक्षा वेगळी वाटली. सनातन संस्थेच्या वतीने या गुरुपौर्णिमेचे आयोजन करण्यात आले होते. हिंदूंच्या अनेकविध धार्मिक कृतींमागे नेमके काय 'शास्त्र' आहे ? सण, व्रते, विधी, धार्मिक कृती या वेळी ईश्वराचे चैतन्य प्रत्यक्ष कशामुळे कार्यरत होऊ शकते? उदा. गणपतीला लाल फूल वाहतात; कारण त्यात श्री गणेशाचे तत्त्व आकर्षित आणि प्रक्षेपित करण्याची क्षमता अधिक असल्याने त्याचा लाभ भाविकाला होतो. नमस्कार कसा करावा?, देवघराची मांडणी, कुंकू लावणे, औक्षण आदी अनेक धार्मिक कृतींमागील शास्त्र सांगण्यासह होळी किंवा गणेशोत्सव असे सार्वजनिक उत्सवही धर्मशास्त्रानुसार आदर्श कसे साजरे करावेत? हे सनातन संस्था समाजाला सांगत आहे. त्याच सनातन संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्ताने गोवा येथे सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे हे ऐकून आनंद वाटला.

**डॉ. ज्योती काळे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९५०७५३८२१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमूर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर, संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा, सांगली, कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारताच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरित केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे. ● मुख्य संपादक : प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी - संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharat@gmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांमधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# एचएसआरपी नंबर प्लेट बसवण्यासाठी ज्यादा रकमेची वसुली

## कल्पना टॉकीज येथील कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांची मागणी

तभा वृत्तसेवा
**सोलापूर, दि.२४ एप्रिल**

राज्य शासनाने २०१९ पूर्वी नोंदणीकृत सर्व वाहनांना हायसिक्यूरिटी नंबरप्लेट (एचएसआरपी) बसविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सोलापूर शहर जिल्ह्यात सदरची नंबरप्लेट बसवण्यासाठी खाजगी कंत्राटदारांची नेमणूक केली आहे. फिटमेंट सेंटर अंतर्गत शहरात विविध ठिकाणी नंबर प्लेट बसवण्याचे काम केले जात आहे. आर. टी. ओ. विभागाकडे ऑनलाइन पद्धतीने अर्ज दाखल करण्यासाठी अधिकृत कंत्राटदार नेमण्यात आलेले आहेत. त्यांच्याकडे ऑनलाइन अर्ज दाखल केल्यानंतर, सदर वाहनधारकांकडून ४५० रुपये नंबरप्लेट नोंदणीसाठीचे शुल्क तसेच त्यावर ८१ रुपये जीएसटी अर्ज भरण्यासाठी ५० ते १०० रुपये असे एकूण ६५० रुपये दर आकारले जात आहेत.



एवढे पैसे भरून देखील नंबरप्लेट बसवण्यासाठी आलेल्या वाहनधारकांकडून कर्मचारी जास्तीच्या पैशाची मागणी करत आहेत. शहरात कंत्राटदारकडील कर्मचाऱ्यांकडून नवीन नंबरप्लेट बसवण्यासाठी ज्यादा पैसे वसूल केले जात आहे.

दरम्यान, कल्पना टॉकीज येथील गिरी या कंत्राटदाराकडे असणारे कर्मचारी वाहनधारकांकडून पैसे वसूल करत आसल्याचे निदर्शनास आले आहे. कल्पना टॉकीज येथे जागा अपुरी पडत असल्याने कंत्राटदाराने जुनीमिल येथील ई स्केअर या इमारतीत नंबर प्लेट बसवण्याचे काम सुरू केले आहे. येथे जुनी नंबरप्लेट काढण्यासाठी आणि नवीन नंबरप्लेट बसवण्यासाठी पैशांची मागणी केली जात आहे. प्रत्येक प्लेट मागे ५० ते १०० रुपये ज्यादा मागितले जात आहेत.

याबाबत वाहनधारकांनी विचारले असता, नंबर प्लेट बसवण्यासाठी काढण्यासाठी पैसे लागतात असे सांगितले जाते. नंबर प्लेट काढून नवीन नंबर प्लेट बसवण्याचे आदेश त्यामध्ये असताना, तसे होताना दिसत नाही. तुम्हीच नंबर प्लेट काढून आणावी, असे सांगितले जाते. त्याच पद्धतीने नंबर प्लेट बसवल्यानंतर त्या भोवती ब्रॅकेट बसवण्यासाठी तगादा लावला जातो. सदरचे ब्रॅकेट १५० ते २०० रुपये असल्याने त्यामध्ये देखील कंत्राटदार आणि कर्मचारी पैसे उकळण्याचे काम करत आहेत. फीटमेंट सेंटर नावाखाली पैशाची लूट चालू असून येथे आरटीओ विभागाने लक्ष देणे गरजेचे आहे.

### नंबर प्लेट काढण्यासाठी पैशाची मागणी

जुनी नंबर प्लेट काढण्यासाठी ५० ते १०० रुपयांची मागणी केली जाते. त्याच पद्धतीने काळे ब्रॅकेट बसवण्यासाठी तगादा लावला जातो. या माध्यमातून फिटमेंट सेंटर घेणाऱ्या कंत्राटदार आणि त्याच्या कर्मचाऱ्यांकडून ग्राहकांची पिळवणूक होत आहे. वाहनधारक किरकोळ भांडण न करता पैसे देतात. मात्र सदरची ही अनाधिकृत रीत्या वसुली चालू आहे. याकडे आरटीओने लक्ष देणे गरजेचे आहे.

**- राकेश काटकर, वाहनधारक**

### कंत्राटदार विरोधात ऑनलाईन तक्रार करा

नवीन हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवण्यासाठी कंत्राटदार किंवा त्याचे कर्मचारी जादा पैसे मागणी करत असतील,तर ऑनलाइन पद्धतीने तक्रार करण्याचे आवाहन आरटीओ विभागाने केले आहेत. नंबरप्लेट बसवण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरून प्राप्त झालेल्या पावतीनुसारच त्याचे कामकाज होणे बंधनकारक आहे. जर कंत्राटदार किंवा कर्मचारी पैसे मागत असतील, तर ऑनलाईन पद्धतीने अर्ज दाखल करावा, असे आरटीओच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

## महत्वाचे...

### दहा हजारांची लाच घेणा-या उप-लेखापरीक्षकाविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी येथील मजूर सहकारी संस्थेच्या विरोधातील तक्रारीचा अहवाल सकारात्मक देण्यासाठी दहा हजारांची लाच घेतल्याप्रकरणी लेखापरीक्षकाविरुध्द जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाची पडताळणी १५ व १७ एप्रिल रोजी करण्यात आली. शिवाजी गंगाधर उंबरजे (वय ५७, रा. यशवंत हौसिंग सोसायटी कुमठा नाका सोलापूर असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या उप- लेखापरीक्षकाचे नाव आहे. यातील तक्रार याची बोरामणी येथे विलासराव देशमुख सहकारी संस्था आहे त्या संस्थेचे ते माजी चेअरमन आहेत सध्या या संस्थेवर चेअरमन म्हणून तक्रारी यांच्या पत्नी काम पाहत आहेत. दरम्यान या संस्थेविरुद्ध दक्षिण सोलापूर सहाय्यक उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे तक्रार दाखल झाली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करून अहवाल सादर करण्याचे काम उपलखारक्षक उंबरजे यांच्याकडे देण्यात आले होते. या तक्रारीच्या अनुषंगाने सकारात्मक अहवाल देण्यासाठी उंबरजे याने तक्रार त्यांच्याकडे २५ हजार रुपयांची मागणी केली होती. त्यापैकी दहा हजार रुपये देण्याचे ठरले होते. याबाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली असता त्यामध्ये उपलेखापरीक्षक उंबरजे यांनी दहा हजार रुपये लाच घेतल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी १५ व १७ एप्रिल रोजी पडताळणी करण्यात आली होती. याप्रकरणी उपलेखा परीक्षक उंबरजे विरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार, पोलीस हवालदार शिरीष कुमार सोनवणे, श्रीराम घुगे, राजू पवार, सचिन राठोड व श्याम सुरवसे यांनी केली.




# बृहन्मठ होटगी संस्था आध्यात्मिक केंद्र आहे

### काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी; चन्नवीर मंदिरात शिबिर

तभा वृत्तसेवा,
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

श्रीमद काशी जगद्गुरुंनी आशीर्वाचनातून म्हणाले की, गेल्या अनेक वर्षापासून श्री. बृहन्मठ होटगी मठाकडून वैदिकत्व, अर्चकत्व पौरोहित्य धर्मसंस्कार, मानवता, व्यक्तिमत्व विकास, संस्कृत संभाषण प्रवचनकला, व योगासने प्राणायाम इत्यादींची माहिती महिनाभरपर्यंत देण्यात येते, ही गोष्ट सर्वच भक्तगण व जंगमांसाठी अभिमानास्पद आहे. जंगमामुळे गुरूमुळेच भक्तांचा उद्धार होतो. म्हणूनच अशा जंगम बटूंना योग्य वयात धर्मसंस्कारीत करण्याची जबाबदारी श्री बृहन्मठ होटगी मठाकडून करण्यात येते. याच मठाच्या शिबिरातूनच मी ही घडलो आणि आज जगद्गुरु पदावर आहे, याच मला अभिमान आहे, असे मत काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांनी व्यक्त केले.

श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी एमआयडीसी येथील श्री चन्नवीर मंदिरात दिनांक २४ एप्रिल ते २७ मे २०२५ पर्यंत अर्चकत्व, पौरोहित्य व संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यावेळी ते बोलत होते.

ज्ञानसिंहासनाधीश्वर श्री.श्री.श्री १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजींच्या दिव्य सानिध्यात, श्री.ष.ब्र.श्रीकंठ शिवाचार्य स्वामीजी नागणसूर यांच्या उपस्थितीत वेदमूर्ती परमेश्वर शास्त्रीजींच्या वेदघोषाने अर्चकत्व व पौरोहित्य शिबिराचे उद्‌घाटन जगद्गुरुंना पुष्पमालार्पण करून व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव शांतय्या स्वामी, वेदमूर्ती मल्लिकार्जुन मठ, वेदमूर्ती परमेश्वर हिरेमठ शास्त्री वेदमूर्ती सिद्धया हल्लाळी शास्त्री, हणुमंत पाटील, वेदमूर्ती सागर स्वामी, स्वामीनाथ कलशेट्टी उपस्थित होते. याप्रसंगी श्री.ष.ब्र.श्रीकंठ शिवाचार्य स्वामीजींचे श्री होटगी मठाकडून सत्कार करण्यात आला. सचिव शांतय्या स्वामी यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वे.मू संदीप स्वामी, शांतु स्वामी, मंजुनाथ स्वामी, संतोष हिरेमठ, बसवेश्वर स्वामी, सोमशेखरय्या हिरेमठ जगन्नाथ शास्त्री, हणमंत यळमेली, यमनप्पा होटगोंड, श्रीकांत धनवे, आनंद स्वामी, महादेव स्वामी, महादेव पुजारी यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन वेदमूर्ती सिद्धया हल्लाळी शास्त्री व आभार सागर स्वामी यांनी केले. कार्यक्रमाची सांगता ओम शांती शांती या गीताने करण्यात आले.



# नीतीमत्तेचा दीप प्रज्वलित करणारे गांधी हे एक प्रेरणास्रोत : देशमुख

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

संपूर्ण सृष्टीची रचना करताना परमेश्वराने प्रत्येक जीवाला काही ना काही गुण दिले, परंतु बुद्धी, विवेक, आणि सदसद्विवेकबुद्धीने मार्गक्रमण करण्याची ताकद केवळ मानवालाच दिली. या दिव्य गुणांना जागून स्वतःच्या आयुष्याला एका उच्च ध्येयाशी जोडणारे, आणि इतरांच्या जीवनातही प्रकाश पसरवणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे श्रीमान भाऊसाहेब गांधी. अशा शब्दात साताराजवळील घारेवाडी येथे, त्यांच्या २३व्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात शिवम प्रतिष्ठानचे इंद्रजीत देशमुख यांनी त्यांच्या ओघवत्या, मिश्कील आणि चिंतनशील भाषणातून भाऊसाहेबांच्या कार्याला उजाळा दिला.

यावेळी वालचंद शिक्षण समुहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, माया गांधी, विश्वस्त पृथ्वीराज गांधी, वैभव गांधी, पराग शहा, हर्षवर्धन शहा, शशिकिरण शहा आदींबरोबर वालचंद शिक्षण समुहातील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तथा समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते.

शिक्षक हा समाजाचा आरसा आहे. वालचंद शिक्षण समूह म्हणजे शिक्षण, मूल्य आणि नीतीमत्तेचा पायाभूत दगड. कर्मवीर भाऊराव पाटलांच्या कार्याची आठवण करून देणारी ही संस्था, केवळ ज्ञानदायिनी नसून, चारित्र्य घडवणारी आहे. या संस्थेच्या माध्यमातून भाऊसाहेबांनी शिक्षणाला व्यवसाय नव्हे, तर समाजसेवेचे रूप दिले. म्हणूनच, या संस्थेची ओळख नीतीमत्तेच्या सद्गुणाची प्रेरक म्हणून अभिमानाने घेतली जाते. ईश्वराने मानवाची निर्मिती केली ती शेवटच्या जीवश्रेणी म्हणून जेथे विवेक आहे, सहवेदना आहे, आणि बौद्धिक विचारांची क्षमता आहे. अशा या सृष्टीतील श्रेष्ठ सृजनाचा उद्देश केवळ स्वतःसाठी जीवन जगणे नव्हे, तर समाज, निसर्ग आणि पुढील पिढीसाठी आदर्श ठेवणे असावा, याचा उहापोह करताना देशमुख यांनी विनोदीबुद्धी आणि समंजस दृष्टिकोनातून समाजातील विसंगतींवर भाष्य करत मानवी जीवनाचे ध्येय, त्याचे वर्गीकरण आणि नीतीमूल्यांची गरज यावर मार्मिक विचार मांडले

त्यांचे विचार ऐकून उपस्थित प्रेक्षक, शिक्षकवर्ग आणि प्रतिष्ठित व्यक्ती विचारमग्न झाले. प्रारंभी भाऊसाहेब गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. डॉ. मनोहर जोशी यांनी प्रस्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. प्रा. अंजना गायकवाड आणि डॉ. प्रा. प्रीती जोशी यांनी दिला.

श्री भाऊसाहेब गांधी यांच्या कार्याचा प्रकाश आजही शिक्षणाच्या वाटेवर आदर्शवत मार्गदर्शक ठरत आहे. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ वाहिलेली ही सुमनांजली म्हणजेच नीतिमत्तेच्या वटवृक्षाला दिलेला श्रद्धेचा जल अर्पण, अशा भावना उपस्थितांकडून व्यक्त होत होत्या.

## नाल्याजवळ नेऊन केला अत्याचार

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

मोबाईल फोनवर मैत्री करण्याचा बहाना ओळख वाढवून लाँग ड्राईव्हकरिता म्हणून शहर परिसरातील नाल्याजवळ नेऊन अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्याविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. पीडितेच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून योगेश परशुराम कणकी (वय २१, रा सोलापूर) विरुद्ध गुन्हा दाखल आहे. गतवर्षी फेब्रुवारी महिन्यात आरोपीने पीडितेच्या घरातील मोबाईलवर फोन केला त्याने पीडीते बरोबर मैत्री करावयाची असल्याची सांगितले त्यानंतर पिडीता आणि आरोपी दोघे एकमेकांशी फोनवर बोलत होते. साधारण डिसेंबर महिन्यात आरोपीने पीडीतेला कॉलेजला जाण्यापासून रोखत लॉन्ग ड्राईव्हला जाऊन येऊ असे म्हणून दुचाकीवर बसून नेले.

## अल्पवयीन मुलीस पळवून नेल्याप्रकरणात चौघांना पाच दिवसाची पोलीस कोठडी

**मंगळवेढा दि.२४ एप्रिल**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीस फुस लावून पळवून नेवून अत्याचार केल्याप्रकरणी आकाश उर्फ ज्ञानेश्वर भारत वाघमारे, गणेश अंकुश वाघमारे, प्रविण बाबूराव वाघमारे (सर्व वय २३), बाळासाहेब भारत वाघमारे (वय २५, सर्व रा.बोराळे) यांना पोलीसांनी अटक करुन पंढरपूर येथील जिल्हा सत्र न्यायालयात उभे केले असता त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.

अल्पवयीन मुलीची सोलापूर येथील बाल सुधारगृहात रवाणगी करण्यात आली आहे. या घटनेची हकीकत अशी, १७ वर्षीय अल्पवयीन मुलीस १७ एप्रिल रोजी पहाटे पाचच्या दरम्यान राहते घरातून अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळवून नेल्याची घटना घडली. तिच्या वडिलाच्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल झाला होता.

सर्व आरोपींना अटक करुन पंढरपूर येथील जिल्हा सत्र न्यायालयात उभे केले असता त्यांना २८ एप्रिलपर्यंत पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. यांनी केला.

पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे, पोलीस हवालदार मनोज खंडागळे सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश वाघमोडे यांनी पुणे जिल्ह्यातून मुलीचा शोध घेण्यात यश प्राप्त केले.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत विभाग**
**ई-टेंडर सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर ऑनलाइन ई-टेंडर आमंत्रित करत आहेत. निविदा क्रमांक SUR/TD/T/2024/16R1 **कामाचे नाव** : ट्रॅकवर सुरक्षा कुंपण (ACB आणि फिक्स्ड नॉट कुंपण) च्या तरतूदीशी संबंधित कामाचा इलेक्ट्रिकल TRD भाग 1) SUR-AKOR कडून CPWI/DUD 2) AKOR-DUD कडून CPWI/DUD 3) CPWI/KLBG भाग-१ (DUD-HHD) 4) CPWI/KLBG भाग-२ (HHD-HQR) 5) CPWI/SDB (पुनर्निमंत्रण) **अंदाजे किंमत** : 1,29,85,304.22 **बोली सुरक्षा** :2,14,900/- **पूर्ण कालावधी** : 12 **महिने ऑफरची वैधता:** 60 दिवस **वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:-** 20/05/2025 दुपारी 3:00 वाजता. ANJ-47

धोकादायक आणि विस्फोटक सामानासह यात्रा करणे दंडनीय अपराध आहे.



**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
सार्वजनिक बांधकाम विभाग
**उड्डाणपूल भूसंपादन निधी व महा. सु.ज.यो. (जिल्हास्तर) योजना**
**सन २०२५-२६ अंतर्गत**
**फेर ई-निविदा सूचना क्र.२६९/सन २०२५-२६**
**ई-निविदा आय.डी.क्र.**1172929-1

उड्डाणपुल भूसंपादन निधी व महा.सु.ज.यो.(जिल्हास्तर) अंतर्गत एकूण ०१ कामांकरिता फेर ई निविदा नोटीस क्र. २६९ ऑनलाईन पध्दतीने निवीदा मागविणेसाठी मा. महाराष्ट्र शासनाच्या http://mahaetenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**शहर अभियंता**
**अहिल्यानगर महानगरपालिका**



**जागा भरणे आहे**

**श्री स्वामी समर्थ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित मोडनिंब**
श्री. राम चौक मोडनिंब ता. माढा, जि. सोलापूर पिन - ४१३३०१ संपर्क - मो. नं. ९८६०६३६३१६

संपूर्ण सोलापूर जिल्हा कार्यक्षेत्र असणाऱ्या व सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या पतसंस्थेत खालील पदासाठी जागा भरणे आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी मूळ कागदपत्रांसह दि. ०९/०५/२०२५ पर्यंत सादर करावीत.

| Sr. No. | पदाचे नाव | पद संख्या | पात्रता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रशासकीय अधिकारी | ०१ | MBA/M.COM/ B.COM & GDCA. | कमीत कमी ५ वर्ष |

टीप : सहकारी पतसंस्था अथवा वित्तीय संस्थेत कामाचा अनुभव असणाऱ्या उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल.

शिक्का
**सही/-**
**चेअरमन**
**श्री स्वामी समर्थ ग्रा.बि.शे.सह पतसंस्था मर्या. मोडनिंब**



**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
**ई-निविदा सुचना**

महावितरण तर्फे अधीक्षक अभियंता (स्था), स्थापत्य मंडल कार्यालय पुणे अंतर्गत अनुभवी कंत्राटदारांकडुन सोलापूर सं व सु मंडल कार्यालय येथे नवीन आसनव्यवस्था व इतर फर्निचर विषयक कामे करण्यासाठी महावितरणमधील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून निविदा क्र. T-01/2nd call/25-26 साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरणच्या संकेतस्थळावर (https://etender.mahadiscom.in/eatApp) दि.२४.०४.२०२५ ते ३०.०४. २०२५ पर्यंत १२.०० Hrs वाजेपर्यंत उपलब्ध आहेत व दि.३०.०४.२०२५ रोजी सकाळी १५:०० Hrs वाजेपर्यत स्वीकारण्यात येतील. निविदासंदर्भात अधिक माहितीसाठी अति.कार्यकारी अभियंता (स्था) स्थापत्य मंडल, पुणे यांच्या भ्रमणध्वनी क्र. ७७६७०००५४८ वर संपर्क साधावा. निम्नस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. निविदेबाबत काही मुदतवाढ पुन:र्निविदा किंवा शुद्धी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील "Announcements" मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**स्वा/-**
**अधीक्षक अभियंता (स्था),**
**स्थापत्य मंडल पुणे**
**PRO No. PZ- 25 /25**



**सोलापूर महानगरपालिका सोलापूर**
पत्ता - इंद्रभुवन, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारदपथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००१
**नगर अभियंता कार्यालय, बांधकाम -२, विभाग**
ई-मेल आयडी - smcaecivilworks@gmail.com मो.नं. ७७४४००९९७९

जा.क्र.न.अ/बांधकाम -२/२०२५-२६ २०६ दि.२४/०४/२०२५

**फेर जाहीर प्रसिद्धीकरण**

सोलापूर महानगरपालिकेमार्फत नगर अभियंता खात्याकडील काही विशिष्ट कामासाठी स्ट्रक्चरल डिझाइन तसेच स्ट्रक्चरल स्टेबिलिटी तपासणीकामी स्ट्रक्चरल इंजिनिअरचे पॅनल तयार करावयाचे आहे. त्यासाठी इंडियन सोसायटी ऑफ स्ट्रक्चरल इंजिनिअरकडे नोंदणीकृत असलेल्या स्ट्रक्चरल इंजिनिअरकडून निविदा मागवित आहेत.

E-Tender ID-2025_SMC_1173358_1

या कामाचे टेंडर शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. २४/०४/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता पासून उपलब्ध असेल.

**सही/-**
**उपअभियंता**
**बांधकाम १ व २ विभाग**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**



**जाहीर प्रगटीकरण**

दिवाणी किरकोळ अर्ज २१/२०२५
नि. नं. ८

**बार्शी येथील मे अति जिल्हा व सत्र न्या सो यांचे कोर्टात**

**पल्लवी नागनाथ नवले.** वय ३० वर्ष.
धंदा काही नाही. तर्फे पालनकर्ता जनक आई संगीता नागनाथ नवले. वय ५५ धंदा शेती,
रा. बारलोणी, ता. माढा, जि सोलापूर. व इतर — **अर्जदार**
**विरुद्ध**
**महाराष्ट्र शासन - सा. वाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार पल्लवी नागनाथ नवले हि जन्मापासून मूकबधीर असल्याने तिची पालनकर्ता जनक आई संगीता नागनाथ नवले हिने डी सोलापूर सब डी व ता माढा पैकी भोसरे येथील शेत जमीन याचा गट नं २८/२/अ याचे एकूण क्षेत्र ०० हे ४७ आर, पैकी अर्जाचा मुख्य विषय मिळकत गट नं २८/२/अ पैकी ०० हे १३.५० आर याचे खरेदीखतास मे कोर्टाची परवानगी मिळणेबाबत हा अर्ज दाखल केलेला आहे. यातील अर्जदार पल्लवी हि तिचे जन्मापासून मूकबधीर असल्याने तिला कोणत्याही बाबतीत मानसिक, शारीरिक, बौद्धिक स्वरूपाचे आकलन/समज होत नाही. तिचे वडील दिनांक ११/०८/२०२२ रोजी मयत झाल्याने अर्जदार नं १ पल्लवी हिचे पालनपोषणाची जबाबदारी आई संगीता यांचेवर होती व आहे. अर्जदार यांची मौजे बारलोणी येथील मिळकतीवर अद्याप वारसाहक्काने नावे लागलेली नाहीत. अर्जदार नं १ पल्लवी हिची तब्बेत ठीक नसल्याने तिचे वारंवार औषध पाण्याच्या खर्चासाठी अर्जदार नं १ हिस तिचे दावा मिळकतीतील कायदेशीर हक्क हिस्सा विक्री करण्याचा आहे परंतु तिचा अविभक्त हिस्सा असून तो विक्री करणेसाठी तुकडे जोड तुकडे बंदी कायद्याची बाधा येते म्हणून अर्जदार नं २ व ३ यांना सामील केलेले आहे. त्यांची मे कोर्टाकडून कोणतीही मागणी नाही. अर्जदार नं १ पल्लवी हि मूकबधीर असल्याने तीची आई संगीता यांची तिचे वतीने पालकत्वाची नेमणूक होवून तिचे वतीने खरेदीखतास में कोर्टाची परवानगी अधिकार अर्जदार नं १ च्या वतीने आई संगीता हिस मिळणेबाबत सदरचा अर्ज आणलेला आहे. अर्जदार नं १ हिचे येणाऱ्या हिश्यातील काही रक्कम तीची तब्बेत ठीक नसल्याने तीचे औषध पाण्याच्या खर्चासाठी वापरून, तसेच काही रक्कम अर्जदार हिचे मौजे बारलोणी येथील शेतजमीन सुपीक करण्यास वापरून, उर्वरित रक्कम पल्लवी हिचे भविष्याचे उदरनिर्वाहासाठी तिचे नावे बँकेत ठेवण्यास तयार आहे. त्यामुळे तिचे हिताचा विचार करून सदर जमीन अर्जदार यांनी विजय रामचंद्र जाधव यांना विक्री करण्याचे ठरवून त्यापोटी इसार रक्कम घेतलेली आहे. सदर अर्जदार नं १ हिचे वतीने आई संगीता यांना प्रस्तुत अर्जातील मिळकत यातील खरेदी घेणार विजय रामचंद्र जाधव यांचे हक्कात करून देण्यास मे कोर्टाची परवानगी मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं १ च्या वतीने तीची आई संगीता यांना सदर मिळकत विजय रामचंद्र जाधव यांना विक्री करणेस परवानगी मिळणेकामी कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास सदर जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत अथवा नेमलेली तारीख २४/०६/२०२५ चे रोजी अगर त्यापूर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणचीही तक्रार न आल्यास मे कोर्ट पुढील योग्य तो हुकुम करतील याची नोंद घ्यावी.

हे जाहीर प्रसिद्धीकरण मे कोर्टाचे सही शिक्यानिशी दिले. ता. २३/०४/२०२५.

कोर्टाचा शिक्का
**सही/-**
**अधिक्षक**
**अति जिल्ह व सत्र न्या. सो. बार्शी**
**ता. बार्शी, जि. सोलापूर**



**Classifieds**

**पाहिजेत**

**पार्ट टाईम काम करु इच्छिणाऱ्या शंभर महिला, मुले, मुली पाहिजेत. अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटून काम सुरू करणाऱ्यांना नावनोंदणी व हजाराची वस्तू मोफत. मात्र अटी लागू. संपर्क: 9765641261**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.



**जाहीर समन्स व नोटीस**

रे.मु.नं.४८/२०२४

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**श्रीमती जगदेवी रायगोंडा चांभार (चौगुले) वगैरे - वादी**
**विरुध्द**
**श्री. शैलेश वंडेप्पा चांभार (चौगुले) वगैरे - प्रतिवादी**

प्रति,
**प्रतिवादी :-**
**५. परसप्पा शिरेप्पा चांभार (चौगुले)**
**६. मल्लप्पा दत्तात्रय उर्फ दत्ता चांभार (चौगुले)**
**७. नागेश दत्तात्रय उर्फ दत्ता चांभार (चौगुले)**
**८. सविता शंकर बनसोडे**
**सर्वजण रा. जेऊर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर सध्या सर्वजण, रा.पुणेरी नगर, जे. व्ही. लिंक रोड, आय.ई.एस. शाळेजवळ, मिल्क कॉलनी युनिट २० गोरेगांव इस्ट, मुंबई-४०००६५.**

ज्याअर्थी वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द दावा मिळकतीचे सरस-निरसमानाने वाटणी होऊन प्रत्यक्ष कब्जा मिळणेसाठी निरंतर ताकीदीसाठीचा दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याची समन्स मे. कोर्टामार्फत प्रतिवादी यांना वरील पत्यावर वजावणीकरिता आर.पी.ए.डी. पोस्टाने पाठविले असता, Insufficient address, Address not found असा शेरा मारुन परत आला आहे. त्यामुळे दाव्याचे काम लांबणीवर पडत आहे.

त्याअर्थी उपरोक्त दाव्याकामी आपले दाव्यास म्हणणे देण्यासाठी दि.०९/०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपल्या विधिज्ञामार्फत या न्यायालयात हजर रहावे. उपरोक्त तारखेस हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी घेण्यात येऊन एकतर्फी निकाल होईल ते तुमच्यावर बंधनकारक राहील. दि.८/०४/२०२५ रोजी न्यायालयाच्या सहीशिक्क्यानिशी ही जाहीर समन्स व नोटीस दिली.

कोर्टाचा शिक्का
**सही/-**
**सह. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकोट**



**जाहीर प्रसिध्दीकरण**

नियमित दिवाणी दावा क्र. ७०३/२०२४
पुढील नेमलेली तारीख :- १८/०६/२०२५
निशान क्र. १४

**बार्शी येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात**

१) **श्री. शिवदास तात्या नलवडे,** वय- ६४ वर्षे, धंदा- सेवानिवृत्त, रा. पाटील प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.
२) **सौ. माधुरी श्यामसुंदर गवळी,** वय- ३७ वर्षे, धंदा- नोकरी, रा. बिजली नगर, चिंचवड, पुणे. ता., जि. पुणे. — **वादी**
**विरुध्द**
**श्री. विलास शिवाजी गुंड,** वय ६० वर्षे. धंदा- शेती, रा. गुंड प्लॉट, संकेश्वर बागेजवळ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **प्रतिवादी**

ज्याअर्थी यातील वादीने प्रतिवादी विरुध्द प्रतिवादीने स्वतः अथवा इतरांमार्फत वादीचे दावा कलम १ मधील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा निरंतर ताकीदीचा आदेश प्रतिवादी विरुध्द मिळणेकरीता दावा दाखल केला असून, प्रतिवादी हे दाव्यात नमुद केलेप्रमाणे नमुद पत्यावर राहत असून देखील सदर दाव्याचे समन्स अद्याप प्रतिवादी यास बजावणी न झाल्याने वादी यांनी दि. ०५/०४/२०२५ रोजी या मे. न्यायालयात प्रतिवादीस प्रस्तुत प्रकरणाचे समन्स जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे प्रसिध्द करण्याचा अर्ज दाखल केल्याने व सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १८/०६/२०२५ अशी नेमलेली असून, यातील प्रतिवादी याने वादींचे दाव्यास स्वतः अथवा विधीज्ञांमार्फत हजर राहुन म्हणणे दाखल करावे.

अन्यथा, सदर वादीचे दाव्याबाबत प्रतिवादी याची कोणतीही कसलीही हरकत, तक्रार नाही, असे समजण्यात येऊन प्रतिवादी विरुध्द योग्य ते आदेश पारीत करण्यात येतील. त्यामुळे प्रतिवादी याने सदर प्रकरणातील जाहीर प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसाच्या आत किंवा पुढील नेमलेल्या दि. १८/०६/२०२५ या तारखेस न्यायालयात हजर राहुन कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा, प्रतिवादी याची कसलीही हरकत नाही, असे समजुन सदर प्रकरणी न्यायालय पुढील योग्य ते निर्णय पारीत करतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे. दि. ०८/०४/२०२५.

कोर्टाचा शिक्का
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, बार्शी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# ‘उमेद’ महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान : एक दृष्टीक्षेप

उमेद
क्षितिज नवे, विश्वास नवा...

केंद्र पुरस्कृत कार्यक्रमामध्ये ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासाठी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम **(Integrated Rural Development Program - IRDP)** हा एकमेव स्वयंरोजगार कार्यक्रम होता. त्यामध्ये ग्रामीण क्षेत्रातील महिला व बालविकास (डवाक्रा), ग्रामीण भागातील पारंपारिक कारागिरांना सुधारित हत्यार संच पुरविणे (सिट्रा) यासारख्या अनेक संलग्न कार्यक्रमाची भर घालण्यात आली. मात्र, या प्रत्येक कार्यक्रमाकडे स्वतंत्र कार्यक्रम म्हणून पाहिल्यामुळे त्याची परिणती कार्यक्रमनिहाय उद्दिष्टे साध्य करण्यास झाला परंतु, एकात्मिक दृष्टीकोणाचा त्यात अभाव जाणवला. या स्थितीत सुधारणा करण्यासाठी स्वयंरोजगार कार्यक्रमाचे स्वरूप बदलून एप्रिल १९९९ पासून केंद्र शासनाने दारिद्र्य निर्मूलनासाठी स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार **(SGSY)** हा पतकर्ज-नि-अर्थसहाय्य असा नवीन कार्यक्रम सुरु केला त्यामध्ये स्वयंसहाय्यता गटांद्वारे दारिद्र्य रेषेखालील स्वरोजगारींचे संघटन, प्रशिक्षण व कौशल्यवृद्धी, पतकर्ज, तंत्रशास्त्र, मूलभूत सुविधा आणि पणन यासारखे पूरक कार्यक्रम अंतर्भूत करण्यात आले, जेणेकरून ग्रामीण कुटुंबाचा आर्थिक विकास होऊन, त्यांचे सातत्यपूर्ण उत्पन्न वाढून ते दारिद्र्य रेषेच्या वर येतील. **SGSY** योजना केंद्र शासन ७५% निधि व राज्य शासन २५% निधि पुरस्कृत होती. स्वरोजगारीचे स्वयंसहाय्यता गट करण्यास प्राधान्य देऊन त्यांना प्रशिक्षण, अनुदान, मूलभूत सुविधा आणि बंकेकडून कर्ज देऊन त्यांना उपक्रम सुरू करण्यास उद्युक्त करणे, जेणेकरून या कुटुंबाचे प्रती मासिक उत्पन्न किमान रु. २०००/- होऊन ते दारिद्र्य रेषेच्या वर येतील अशी संकल्पना होती.

**SGSY** या योजनेचे केंद्र शासनाने विविध संस्थाकडून मूल्यमापन केले असता सदर योजना दारिद्र्य निर्मूलनासाठी काही अंशी यशस्वी ठरली असली तरी अजूनही मोठ्या प्रमाणात दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे सक्षमिकरण करून त्यांना आर्थिक कार्यक्रमाद्वारे सातत्यपूर्ण उत्पन्न प्राप्ती होणे आवश्यक आहे, असे निष्पन्न झाल्याने योजना राबविण्याच्या कार्यपद्धतीत खालील मर्यादा जाणवल्या.

1.गटाची नोंदणी झाली, परंतु बांधणी आवश्यक तेवढ्या प्रमाणात झाली नाही,
2.बँकाचे एकूण धोरण, त्यांचेकडील या योजनेसाठीचा कमी कर्मचारीवृंद, जागृतीचा अभाव व काही बँकाची या योजनेकडे व्यवसाय म्हणून्न बघण्याची प्रवृती, यामुळे पुरेसे निधीसहाय्य झाले नाही.
3.सक्षम संस्थात्मक व्यवस्था व मूलभूत सुविधांचा व योग्य प्रशिक्षणांचा अभाव,
4.योजना गट समुहाला प्राधान्य देणारी असून या गटसमुहांचे संघिकरण होणे आवश्यक होते. तथापि,सांघिकरणची प्रक्रिया अत्यंत कमी प्रमाणात झाली.
5.स्वरोजगारीचे स्वास्थ्य, सामाजिक सुरक्षा व त्यांच्या साधनसामुग्रीची जबाबदारी घेण्यासाठी विम्याच्या किंवा तत्सम संरक्षण पर्यायबाबत अत्यंत अल्प प्रमाणात कार्यवाही झाली.
6.जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेसाठी या योजनेकरिता स्वतंत्र व व्यावसायिक कर्मचारीवृंद नसल्याने या योजनेकडे पुरेसे लक्ष देता आले नाही.
7.ग्रामीण भागातील दारिद्र्य मोठ्या प्रमाणात अनुसूचीत जाती / जमाती, इतर मागास वर्ग व अल्पसंख्यांक प्रवर्गात आहे. मात्र, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची निवड करताना हे घटक डावलल्याचे व प्रभावी घटकांनी आपली नावे नोंदविल्याचे दिसून आले.
8.बाजारपेठेत यशस्वी होण्याची प्रचंड क्षमता असूनही स्वयंसहाय्यता गटांकडून उत्पादित माल व सेवा यात निम्न मुल्यवर्धन **(Low Value ddition)**, दर्जा **(Grade)**, प्रत **(Quality)**, वैविध्याचा अभाव **(Lack of Variety)**, परंपरागत उत्पादनाच्या पलीकडे जाण्याची उदासिनता, पॅकिंग व ब्रँडिंगचा अभाव, मोठ्या उद्योग घटकांशी साखळी निर्मितीचा अभाव अशा त्रुटी दिसून आल्या.

त्यामुळे मूल्यमापन अहवालांच्या आधारे जाणवलेल्या उणीवा दूर करून केंद्रशासनाने सन २०११-२०१२ पासून राष्ट्रीय राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान **(National Rural Livelihoods Mission - NRLM²)** सुरु केले.

### स्वरूप व महत्वाचे घटक

दारिद्र्य रेषेखालील प्रत्येक कुटुंबामध्ये कार्यक्षमता असते व दारिद्र्यातून बाहेर येण्याची त्याची तीव्र इच्छा असते मात्र, या क्षमता वृद्धीसाठी व इच्छापूर्तीसाठी त्यांना ज्या प्रक्रियेतून जाणे आवश्यक आहे, ती परिपूर्ण होणे आवश्यक आहे. केंद्र शासनाने स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे उद्दिष्ट कायम ठेऊन या योजनेचे, यासाठीच, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान **(National Rural Livelihoods Mission - NRLM²)** मध्ये रूपांतर करण्याचा निर्णय घेतला. तसेच महाराष्ट्र राज्यासह इतर राज्यांना केंद्र शासनामार्फत जागतिक बँकेच्या सहकार्याने १२ जिल्हे आणि ५० तालुक्यात राष्ट्रीय ग्राम ीण जीवनोन्नती प्रकल्प **(National Rural Livelihoods Project - NRLP)** सन २०१२-२०१३ ते २०१६-२०१७ या कालावधीत राबविण्यात आला.

### अभियानातील महत्वाचे घटक :-

#### (i) संवेदनशील सहाय्य संरचना:-

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेमध्ये स्वतंत्र **(Independent)** समर्पित **(Dedicated)** व संवेदनशील **(Sensitive)** कर्मचारीवृंदाचा अभाव लक्षात घेऊन अशी संवेदनशील व समर्पित सहाय्य संरचना राष्ट्रीय, राज्य, जिल्हा, तालुका व क्लस्टर पातळीवर निर्माण करणे, जिल्हा पातळीवरील घटक हा उपक्रमाच्या व्यवस्थेसाठी स्वतंत्रपणे व पुर्णपणे कार्यरत राहून तो जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेशी तसेच पंचायत राज संस्थांशी समुचित पद्धतीने समन्वित व संलग्न आहे.

> **अभियानाचे उद्दिष्ट**
> दारिद्र्य निर्मूलनासाठी दारिद्र्य रेषेखालील स्वरोजगारींची क्षमता वाढविण्यासाठी तळागळापासून भक्कम संस्थिय प्रणाली स्थापन करून त्याद्वारे दारिद्र्य निर्मूलन करणे. या संस्था दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना, व्यक्तींच्या, व्यक्तींकरिता स्थापित केलेल्या असतील व दारिद्र्य रेषेखालील स्वरोजगारीना लाभदायक क्षमता वृद्धी, स्वरोजगार व कौशल्याधारित रोजगाराच्या (वेतनी व स्वरोजगारांच्या) संधी उपलब्ध करून देतील, जेणेकरून त्यांचेकडे शाश्वत रोजगार साधन उपलब्ध होऊन त्यांचे कायम स्वरूपी उत्पन्न वाढेल.

#### (ii) सामाजिक समावेशन :-

दारिद्र्य रेषेखालील प्रत्येक कुटुंबातील किमान एक सदस्य, विशेषतः महिला स्वयंसहाय्यता गटामध्ये समाविष्ट करण्याचे उद्दिष्ट असून आतापर्यंत महाराष्ट्रातील सामाजिक व आर्थिक जात सर्वेक्षण **(SECC)** यादीतील १,६५,५३१ (१००%) कुटुंबांचे समावेशन गटात करण्यात आले आहे.

#### iii) संस्था बांधणी :-

दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या संस्था जसे स्वयंसहाय्यता गट, गावस्तरावर ग्रामसंघ, जिल्हा परिषद मतदारसंघ स्तरावर प्रभागसंघ स्थापन करून दारिद्र्य रेषेखालील लोकांचे बाह्य एजन्सीवरील अवलंबण कमी करण्यात आले आहे.

सामाजिक व आर्थिक सेवा तळागळातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी या संस्था शासन, पंचायतराज संस्था, सार्वजनिक व खाजगी क्षेत्राशी अनुरूप भागीदारी व समन्वयातून काम करत आहेत. सध्या धाराशिव जिल्ह्यात एकूण १४५३४ स्वयंसहाय्यता समुह, ७८२ ग्रामसंघ आणि ५५ प्रभागसंघ स्थापन करण्यात आले आहेत.

ग्रामसंघ आणि प्रभागसंघ यांचे काम सुरळीतपणे चालावे तसेच त्यांच्या कार्यालयासाठी आवश्यक साधनसामुग्री घेण्यासाठी प्रति ग्रामसंघ रु. ७५,०००/- (रु. पंच्याहत्तर हजार फक्त) इतका व्यवस्थापन निधी दोन टप्प्यात उपलब्ध करून देण्यात येतो. तसेच प्रभागसंघांच्या कार्यालय स्थापनेसाठी रु. ३,५०,०००/- (रु. तीन लाख पन्नास हजार फक्त) इतका व्यवस्थापन निधी तीन टप्प्यात उपलब्ध करून देण्यात येतो. आतापर्यंत ६३८ ग्रामसंघांना रु. ४,७८,५०,०००/- (रु. चार कोटी अठ्ठयाहत्तर लाख पन्नास हजार फक्त) आणि ५५ प्रभागसंघांना रु. ५,५०,००,०००/- (रु. पाच कोटी पन्नास लाख फक्त) इतका व्यवस्थापन निधी वितरीत करण्यात आला आहे.

तसेच गटातील विधवा, परित्यक्ता, एकाल महिला, दिव्यांग व्यक्ती, निराधार वृद्ध, बेघर, असुरक्षित व्यवसायात असलेल्या व्यक्ती / कुटुंबे इ. जोखीमप्रवण **(Vulnerable)** कुटुंबांसाठी ग्रामसंघांमार्फत जोखीमप्रवणता कमी करण्यासाठीचा निधी **(Vulnerability Reduction Fund - VRF)** देण्याचे प्रयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी प्रती ग्रामसंघ रु. ७५,०००/- (रु. पंच्याहत्तर हजार फक्त) इतका निधी देण्यात येतो. आतापर्यंत ५६८ ग्रामसंघांना रु. ४,२६,००,०००/- (रु. चार कोटी सव्वीस लाख फक्त ) इतका **VRF** वितरीत करण्यात आला आहे.

#### iv) प्रशिक्षण व क्षमता बळकटिकरण;-

दारिद्र्य रेषेखालील स्वरोजगारीच्या संस्था,जीवनमान, पतव्यवस्था यांचे सुयोग्य व्यवस्थापण करण्यासाठी व्यवस्थापकीय प्रशिक्षण देण्यात येत आहे. यामध्ये गट, ग्राम संघ आणि प्रभागसंघ यांच्यासाठी विविध ३३ प्रकारचे प्रशिक्षण मोड्यूल्स विकसित करण्यात आले आहेत. त्याचबरोबर कौशल्य विषयक प्रशिक्षण आणि रोजगार व स्वयंरोजगार सक्षमतेने करण्यासाठी विविध प्रशिक्षण दिले जाते.

#### v) आर्थिक समावेशन ;-

स्वयंसहाय्यता गटांना त्यांच्या स्वबचतीशिवाय वित्तीय संस्थाकडून खेळता निधी व पतपुरवठा आणि त्यांच्या तात्काळ गरजा भागविण्यासाठी शासनाकडून रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त) ते रु. १५,०००/- (रु. पंधरा हजार फक्त) या मर्यादेत गटाच्या श्रेणीनुसार फिरता निधी **(Revolving Fund - RF)** दिला जातो. फिरता निधी हा भांडवली अनुदान या स्वरुपात अनुदान देण्यात येतो. धाराशिव जिल्ह्यामध्ये आतापर्यंत १४४२७ स्वयंसहाय्यता समूहांना रु. २१६४ लाख इतका फिरता निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

गरीब अति गरीब कुटुंबांना वारंवार पतपुरवठा आवश्यक असतो. बँकेचे व कुटुंबाचे संबंध दीर्घ कालावधिकारिता राहून त्यांचे दारिद्र्य दूर होईपर्यंत गरजेनुसार पतपुरवठा उपलब्ध व्हावा, यासाठी गटांना बँकाकडून कर्ज पुरवठा मिळवून देण्यासाठी अभियानामार्फत प्रयत्न केले जातात. पहिले कर्ज एक लाखांचे असून गटाच्या परतफेडीनुसार त्याची मर्यादा प्रति गट पाच लाखांपर्यंत कर्ज मिळू शकते. नुकतेच मा. पंतप्रधान महोदय यांनी स्वयंसहाय्यता गटांना रु. २०,००,०००/- (रु. वीस लाख फक्त) पर्यंत विनातारण कर्ज उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे. स्वयंसहाय्यता गटांना परवडणार्या कमी व्याज दराने त्यांच्या उपक्रमांच्या स्थैर्यासाठी आणि ते शाश्वत उत्पन्न स्त्रोत म्हणून विकसित होण्यासाठी एकापेक्षा जास्त वेळा **(Multiple Dosage)** कर्ज मिळणे ही त्यांची अत्यंतिक गरज आहे.

त्यासाठी त्यांना कर्ज परवडावे म्हणून द.सा.द.शे.७% वरील व्याजासाठी अभियानामार्फत सुमतीबाई सुकळीकर व्याज परतावा योजनेअंतर्गत अनुदान देण्यात येते. आतापर्यंत धाराशिव जिल्ह्यातील १४१३३ स्वयंसहाय्यता गटांना रु. ५३२ कोटी ६७ लाख इतक्या रकमेचे बँक कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे.

अभियानांतर्गत गरीब अति गरीब महिलांच्या स्वयंसहाय्यता गटांना बँकिंग सेवा मिळत आहे. परंतु केवळ बँक खाते उघडण्यापुरती बँकिंग सेवा सीमित न ठेवता त्यापलीकडे जाऊन वैश्विक आर्थिक समावेशन साध्य करण्यासाठी अभियान कार्यरत आहे. तसेच जीवनरक्षा,आरोग्य आणि साधनसंपत्ति या गरजा यांना विमा योजनेद्वारे संरक्षण देण्यासाठी विशेषत्वाने पुढाकार घेतला जातो.

#### (vi) उपजीविका :-

या अभियाना अंतर्गत महिलांच्या कुटुंबाकडे असणारी सध्याची उपजीविकेची साधने बळकट करणे आणि त्यांच्याकडील कौशल्य वाढवून नवीन साधने निर्माण करणे यासाठी मदत व मार्गदर्शन करण्यात येते. यात कृषी आणि अकृषी अशा दोन्हीचा समावेश करण्यात आला आहे. यासाठी अभियानमध्ये जिल्हा व तालुका पातळीवर प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध असून गाव पातळीवर मदत व मार्गदर्शन करण्यासाठी विविध समुदाय संसाधन व्यक्ती नेमण्यात आल्या आहेत.

उदा. कृषी सखी, पशुसखी, मत्स्य सखी, प्रभाग कृषी समन्वयक, प्रभाग पशु समन्वयक, उद्योग सखी इ. तसेच व्यावसायिक प्रशिक्षण व विपनणासाठी आवश्यक मूलभूत सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. विशेषतः स्वयंसहाय्यता गटांना विपणन सहाय्य, ज्यामध्ये बाजार संशोधन, बाजरासाठी तांत्रिक क्षमता, त्यांचा विस्तार व सुधारणा याकडे जास्त लक्ष देण्यात येत आहे. गटातील सदस्यांच्या उपजीविका वृद्धीसाठी अभियानाकडून प्रती स्वयंसहाय्यता समूहाला रु. ६०,०००/- (रु. साठ हजार फक्त) इतका समुदाय गुंतवणूक निधी **(Community Investment Fund - CIF)** उपलब्ध करून दिला जातो. आतापर्यंत धाराशिव जिल्ह्यामध्ये ८२०८ स्वयंसहाय्यता समूहांना रु. ४५१५.७६ लाख इतका समुदाय गुंतवणूक निधी वितरीत करण्यात आला आहे.

सन २०१९-२०२० पासून जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने जुन्या १२ जिल्ह्यातील ५० तालुक्यामध्ये राष्ट्रीय ग्रामीण आर्थिक परिवर्तन प्रकल्प **(National Rural Economic Transformation Project - NRETP)** अंमलबजावणी सुरु झाली असून त्या अंतर्गत सेंद्रिय शेती, उत्पादक गट आणि शेतकरी कंपन्या स्थापन करून उपजीविका संसाधने निर्माण करून महिलांचा आर्थिक विकास करण्याचे उद्दिष्ट आहे. धाराशिव , तुळजापूर आणि लोहारा या जुन्या तीन तालुक्यांमध्ये छठएढझ प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु आहे.

#### (vii) कृती संगम (Convergence)

ग्रामीण विकास मंत्रालय, अन्य मंत्रालय तसेच राज्य शासनाच्या विकासात्मक योजनांची जुळणी व एकत्रीकरण **(Convergence/ Integration)** या अभियानांतर्गत करण्यात येते. मनरेगा, स्वच्छ भारत अभियान, जनधन बँक खाते, प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना, प्रधानमंत्री जीवन सुरक्षा योजना, अटल पेन्शन योजना, पोषण अभियान, अस्मिता सॅनिटरी पॅड इ. योजनांच्या अंमलबजावणीमध्ये अभियानाने सक्रीय काम केले आहे.

#### (viii) कौशल्यवृद्धी तसेच नोकरी देणारे प्रशिक्षणाचे विशेष प्रकल्प :-

बाजारात मागणी असलेल्या बाबींवर प्रशिक्षण देऊन तरुणांना नोकरी मिळवून देण्यासाठी शासनाने निवडलेल्या संस्थांमार्फत **(Project Implementing gency - PI)** इच्छुक युवक युवतींना प्रशिक्षण दिले जाते. तसेच स्वरोजगारासाठी कौशल्य प्राप्त करून देण्यासाठी ग्रामीण स्वरोजगार प्रशिक्षण केंद्रामार्फत **(RSETI)** प्रशिक्षण दिले जाते. आतापर्यंत ९६६०

युवक युवतींना **RSETI** मार्फत स्वयंरोजगार विषक उदा. ब्युटी पार्लर, शिवणकाम, शेळीपालन, कुक्कुटपालन इ. प्रशिक्षण देण्यात आले आहे.

#### (ix) पंचायत राज संस्थाशी समन्वय

दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींच्या या अभियानांतर्गत विकसित संस्था (गट, ग्रामसंघ आणि प्रभागसंघ) व पंचायती राज संस्था यांचे संबंध, विशेषतः ग्राम पातळीवरील संबंध महत्वाचे आहेत.

या दोन्ही संस्थामध्ये महिला विषयक प्रश्नावर सुसंवाद स्थापन करण्यासाठी महिलांचा पंचायत राज संस्थांमध्ये सहभाग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतात. पंचायत राज सल्ला, सहाय्य व उपलब्ध साधन सामुग्रीचा एकात्मिक उपयोग केला जातो. ग्राम पंचायत विकास आराखडा **(GPDP)** तयार करून त्यात महिलांच्या गरजा सोडविण्यासाठी अभियानातील गट महत्वाची भूमिका पार पडत आहेत.







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# भाळवणीत अज्ञात व्यक्तीमुळे शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

## पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ एप्रिल-**

तालुक्यातील भाळवणी येथील भाळवणी-शेळवे रस्त्यावरील शेतकऱ्यांचे अज्ञात व्यक्तीकडून पाईपलाईन फोडणे, ऊस जाळणे, बग्यास जाळणे, बोरची मोटर तोडून बोअरमध्ये सोडणे, जनावरांच्या चाऱ्याचा गंजी पेटवून देणे असे प्रकार वारंवार केले जात आहेत. अशा विविध कारणांमुळे परिसरातील शेतकरी हवालदिल झाले असून तक्रार करूनही पोलीस कारवाई होत नसल्याने शेतकऱ्यांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

भाळवणी येथील पोपट एकतपुरे यांनी केळीच्या पिकांसाठी उसाचे बग्यास आणले होते. सदर बागेस





रात्री पेटवून दिले. नंदकुमार कापसे यांच्या शेतातील मकवाणाची गंजी रात्री पेटवून दिली. जगन्नाथ शिंदे यांच्या शेतातील ऊस पेटवून दिला. प्रसंगांवधानामुळे पेटलेला ऊस विझवण्यात यश आले.

या बरोबरच प्रशांत माळवदे यांच्या बोर मधील मोटार, पाईप, केबल, दोरी कट करून मोटार बोर मध्ये सोडली आहे. त्याचप्रमाणे देविदास लिंगे यांच्या शेतातील चेंबर, सेंचुरी फोडून इतरत्र नेऊन टाकण्यात आली. दिलीप वाघमारे यांच्या विहिरीवरील मोटार, पाईपलाईन, बोरची पाईप लाईन तोडून टाकण्यात आली. मोहन वाघमारे यांच्या शेतातील मोटारीच्या पेटीला करंट देण्यात आला होता. तसेच ऊसही पेटवून दिला आहे. चंद्रकांत शिंदे यांच्या शेतातील मकवाणाची गंजी पेटवून दिली आहे. घराजवळ जादूटोना करून लिंबू, सुई, दाबन, खिळे, बाहुल्या टाकल्या जात आहेत.

दरम्यान पोलिसांच्या कडे तक्रार केल्यानंतरही गेली एक-दोन दिवसात दिलीप वाघमारे व वैभव वाघमारे यांच्या शेतातील ठिबक, पाईपलाईन, जळून खाक झाली. रणजीत मदने यांच्या शेतातील चेंबरचे, पाईपलाईनची फोड करण्यात आली आहे. दरम्यान तालुका पोलीस स्टेशन येथे तक्रार देऊनही पोलीस कोणतीही कारवाई करत नसल्याने परिसरातील शेतकऱ्यांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

# उद्यापासून अखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य संमेलन

## नागपुरात अनेक पुस्तकांचे होणार प्रकाशन; सहा सत्रातून होणार विचार मंथन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषद सोलापूर या शिखर परिषदेचे दहावे साहित्य संमेलन २६ आणि २७ एप्रिलला नागपूर येथे संपन्न होणार आहे. सर्व तयारी झाली आल्याची माहिती केंद्रीय सचिव अय्यूब नल्लामंदू व संयोजक तथा नागपूरचे ज्येष्ठ साहित्यिक जावेद पाशा कुरेशी यांनी एका पत्रकाद्वारे जाहिर केले आहे.

संमेलनअध्यक्ष माजी कुलगुरु व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. एस.एन. असणार आणि प्रा. डॉ. शरयू तायडे हे स्वागत करणार प्रा. डॉ. अनुपमा अजगरेयांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे प्रमुख पाहुणे म्हणून खासदार हुसेन दलवाई, ॲड. आसीफ कुरेशी, फ. म. शहाजिंदे, खलील मोमीन, अ. कादर मुकादम, डॉ. अजीज नदाफ उपस्थित राहतील.

दोन दिवस साहित्यिक मेजवानी असलेल्या या संमेलनाची सुरुवात अय्यूब नल्लामंदू यांच्या कुराण पठणने होणार असून यावळी प्रा. प्रमोद मुनघाटे, जावेद पाशा कुरेशी, नसीमा जमादार, मुजफर सयद, डॉ. के.जी. पठाण, गौस शिकलगर यांच्या पुस्तकासह मुबारक शेख संपादित संमेलनचे मुखपत्र महाठ वाणी व अबरार नल्लामंदू संपादित कासिद संमेलन विशेषांकाचे प्रकाशन सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते होईल. त्यानंतर डॉ. अलीम वकील संगम नेर, प्रा. फ.म. शहाजिंदे, प्राचार्य फारूक शेख, अय्यूब नल्लामंदू, नौशाद उस्मान, डॉ. अस्लम बारी, तहसीन सय्यद, डॉ. एस. एन. पठाण यांच्या अध्यक्षते खाली विविध सत्रांतून विविध विषयावर विचार मंथान होईल आणि मिर्जा एक्सप्रेसच्या माध्यरातून मनोरंजन होईल तसेच सिराज शिकलगर यांच्या अध्यक्षतेखाली मिला जुला राष्ट्रीय कवी संमेलनआणि सावित्री-फातीमांचीलेकी महिलांसाठी स्वातंत्र कवी संमेलनातून कवियित्रीं गाजवणार संमेलन रंगमंच. तरी या दोन दिवसीय संमेलनामध्ये सामील होण्यासाठी चलो नाग, चलो नागपूरची हाक परिषदचे उपाध्यक्ष डॉ. तांबेळी, सचिव नल्लामंदू, संयोजक जावेद कुरेशी यांनी दिली आहे.

# 'अरिहंत'मध्ये एआय, रोबोटिकसचे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्य पद्मशाली महिला संघम व महाराष्ट्र राज्य पद्मशाली इंजिनिअर्स विभाग संघम यांच्या संयुक्त विद्यमाने जुना विडी घरकुल येथील अरिहंत इंग्लिश मिडीयम स्कूल येथे एआय, रोबोटिकस आणि इलेकट्रॉनिकस बाबत प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर शिबीर पंधरा दिवस चालणार आहे. अरिहंत'चे सर्वे सर्वा डॉ.अजय पोन्नम, महाराष्ट्र राज्य महिला संघमच्या सचिवा सुलक्षणा पोन्नम यांच्या हस्ते आणि महाराष्ट्र राज्य पदाशाली संघमचे अध्यक्ष भूपती कमटम यांच्या अध्यक्षतेखाली या शिबीराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी डॉ.अजय पोन्नम, वेणुगोपाळ येमूल, प्रशांत गाजूल, अमित देवसानी यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी तस्नीम शेख, संगीता इंदापुरे, यशवंत इंदापरे, रजनी सग्गम, पौजान अजहरी यांनी सूत्रसंचालन केले. अर्चना महांकाळ यांनी आभार मानले.

# बार्शीत चौघांच्या हल्ल्यात तीनजण जखमी; रिक्षा पेटवल्याने ८० हजाराचे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि २४ एप्रिल-**

बार्शीतील अलीपूर रोडवरील भगवत मंगल कार्यालयाच्या पाठीमागे झालेल्या एका हिंसक घटनेत चार आरोपींनी मिळून तिघांवर प्राणघातक हल्ला करत गंभीर जखमी केले असून, एक ऑटोरिक्षाही पेटवून दिली. ही घटना २० एप्रिल रोजी दुपारी घडली.

फिर्यादी करण अनिल सपाटे (वय २२), रा. नेटके प्लॉट, बार्शी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा लहान भाऊ रोहित यास विनाकारण भाऊराव उर्फ हर्षल गव्हाणे याने मारहाण केली. यानंतर याबाबत विचारणा करण्यासाठी गेलेल्या फिर्यादी, त्यांचे चुलते संतोष सपाटे आणि भाऊ सोमनाथ यांच्यावर चार आरोपींनी मिळून लोखंडी कुऱ्हाड, हातोडा आणि लाकडी दांडक्याने हल्ला केला. या हल्ल्यात संतोष सपाटे यांच्या डोक्यावर, फिर्यादीच्या डाव्या हातावर तसेच सोमनाथ व करण यांच्या पाठीवर जबर मारहाण झाली. त्याचवेळी आरोपी मोन्या व यशवंत गव्हाणे यांनी फिर्यादीची ऑटोरिक्षा पेटवून अंदाजे ८० हजार रुपयांचे नुकसान केल्याचे सांगण्यात येत आहे. फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी पोलिसांनी भाऊराव उर्फ हर्षल गव्हाणे बाबू गव्हाणे, मोन्या गव्हाणे, यशवंत गव्हाणे (सर्व रा. अलीपूर रोड, बार्शी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून तपास सुरू आहे.

# तिसंगीतील मजुराचा मुलगा झाला आयपीएस

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ एप्रिल-**

केंद्रीय लोकसेवा आयोगाने २०२४ मध्ये घेतलेल्या परीक्षेत पंढरपूर तालुक्यातील तिसंगी येथील अजय सरवदे या तरुणाने उत्तुंग यश मिळविले त्याचे आई-वडील मजूर म्हणून काम करत आहेत मुलाने चांगले यश मिळाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.



दरम्यान लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत अजय सरवदे याने ८५८ वी रँक मिळवून उत्तुंग यश मिळविले आहे. त्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण तिसंगी येथे झाले आहे. तर महाविद्यालयीन शिक्षण पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात झालेले आहे. अजय हा स्पोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया डायरेक्टर भोपाळ येथे नोकरी करीत आहे. नोकरी सांभाळुन अभ्यास करून त्याने हे यश मिळवल्याबद्दल सांगोल्याचे आमदार बाबासाहेब देशमुख, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा परिषदेच्या सदस्या शोभा वाघमोडे व ग्रामस्थांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

**पंढरीच्या शिरपेचात मानाचा तुरा**

अक्षिशित आई तर नववी शिकलेले वडील, लोकांच्या शेतात मोलमजुरी करून मुलाला शिकविले. अन् मुलाने त्यांच्या कष्टाचे पांग फेडले. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पंढरपूर तालुक्यातील तिसंगी गावचे सुपुत्र अजय नामदेव सरवदे देशात ८५८ क्रमांकाने उत्तीर्ण झाले. अजय यांच्या यशाने देशात तिसंगीची व महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली असल्याचे तिसंगी ग्रामस्थांकडून अभिमानाने सांगितले जात आहे.

# हिंदू धर्माचे संस्कार भावी पिढींना द्या

**● राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प.संदीपबुवा मांडके : धर्मसंकिर्तन महोत्सवात निरूपण**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ एप्रिल-**

आपला सनातन हिंदू धर्म हा जगातील सर्वश्रेष्ठ धर्म आहे. त्यामुळे धर्माचे संरक्षण व पालन करण्याचे संस्कार आपण आपल्या भावी पिढींना देण्याचे कार्य देशातील तमाम हिंदूंनी करावे असे भावनिक आवाहन पुण्यातील राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प.संदीपबुवा मांडके यांनी केले.



येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान येथे श्री स्वामी समर्थांच्या १४७ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त आयोजित धर्मसंकीर्तन महोत्सवात त्यांनी ११ वे पुष्प गुंफले. प्रारंभी मंदिर समितीच्या वतीने चेअरमन महेश इंगळे यांनी कीर्तनकार ह.भ.प.संदीप बुवा व सहवादकांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. ह.भ.प.संदीप बुवा मांडके यांनी संत तुकाराम महाराजांच्या धर्माचे पालन करणे पाखंड खंडन या अभंगावर निरूपण केले. 'भीमाचे गदा युद्ध' या आख्यानातून देह हे काळाचे धन कुबेराचे, देह शुद्ध करुनी भजनी भजावे अशा अभंगाचे गायन केले. या कीर्तन सेवेत आर्या, साकी या सारख्या काव्य प्रकारांचा समावेश होता. या कीर्तन सेवेसाठी तबल्यावर रविंद्र क्षीरसागर, हार्मोनियमवर प्रशांत देशपांडे, ऑर्गनवर ओंकार पाठक, पखवाजवर ज्ञानेश्वर दुधाणे, टाळावर अक्षय सरदेशमुख यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ओंकार पाठक यांनी केले. यावेळी देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, प्रथमेश इंगळे, मंदार महाराज पुजारी, श्रीमुख जगदाळे प्रा.नागनाथ जेऊरे, विजयकुमार कडगंची, मनोहर देगांवकर, मयुर स्वामी, अक्षय सरदेशमुख, ओंकार पाठक, बाळासाहेब एकबोटे, अंकूश केत, सैदप्पा इंगळे, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, आदीत्य गवंडी, प्रकाश कासेगांवकर, शिवपुत्र हळगोदे, ज्ञानेश्वर भोसले, विपूल जाधव, अविनाश क्षीरसागर, स्वामीनाथ लोणारी, सागर गोंडाळ, प्रा.शिवशरण अचलेर, दिपक जरिपटके, प्रसाद पाटील, श्रीशैल गवंडी, महेश मस्कले, मोहन जाधव, प्रसाद सोनार, मोहन शिंदे, बंडेराव घाटगे, नरसिंग क्षीरसागर, संजय बडवे, चंद्रकांत गवंडी, सुनिल कटारे, संतोष जमगे, खाजप्पा झंपले, महेश मस्कले आदींसह भक्तांनी उपस्थित राहून या कीर्तन श्रवण सेवेचा आनंद लुटला.

# वैष्णवीचे कथ्थकनृत्य अन केळकरांच्या गायनाने भरला रंग

**धर्मसंकीर्तन महोत्सवात गुंफले १० वे पुष्प**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि २४ एप्रिल-**

पुण्यातील सुप्रसिध्द गायिका वैष्णवी पवळे यांच्या कथ्थक नृत्याविष्काराने व केदार केळकर यांच्या शास्त्रीय गायनाने धर्मसंकीर्तन महोत्सवात भक्तीचा रंग भरला.



येथे श्री.स्वामी समर्थांच्या १४७ व्या पुण्यतिथी निमीत्त आयोजीत धर्मसंकीर्तन महोत्सवाचे १० वे पुष्प श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात वैष्णवी पवळे व केदार केळकर यांनी गुंफले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मंदीर समितीच्या वतीने चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते वैष्णवी पवळे व केदार केळकर यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून सन्मान करण्यात आला. या भक्तीसंगीत सेवेत शास्त्रीय गायनाने केदार केळकर यांनी कार्यक्रमाची सुरूवात राग श्री ने केली. यानंतर सुप्रसिद्ध नाट्यपद जय गंगे भागीरथी जय जय हरी, पंढरीचा सुख पाहता डोळा इत्यादी नाट्यपदांवर शास्त्रीय गायन सेवेने स्वामी दरबार मंत्रमुग्ध केला. भैरवीने या भक्ती संगीत सेवेची सांगता झाली. तत्पूर्वी नृत्याविष्काराच्या विविध भक्तीमय ताल व ठेक्यांवर वैष्णवी पवळे यांनी रामवंदना, रास ताल, द्रौपदी वस्त्रहरण आदी विषयांवर कथ्थक नृत्याविष्कारातील सर्वोत्कृष्ट अदाकारी समर्थांच्या चरणी अर्पण केली. या कार्यक्रमांत त्यांना संवादिनी साथ अमेय बिच्छू, तबला साथ प्रसाद कुलकर्णी यांनी केली. प्रास्ताविक ओंकार पाठक यांनी केले. यावेळी सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, प्रथमेश इंगळे, मंदार महाराज पुजारी, प्रा.नागनाथ जेऊरे, विजयकुमार कडगंची, मनोहर देगांवकर, मयुर स्वामी, अक्षय सरदेशमुख, ओंकार पाठक, बाळासाहेब एकबोटे, अंकूश केत, सैदप्पा इंगळे, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, आदीत्य गवंडी, प्रकाश कासेगांवकर, ज्ञानेश्वर भोसले, विपूल जाधव, अविनाश क्षीरसागर, स्वामीनाथ लोणारी, सागर गोंडाळ, प्रा.शिवशरण अचलेर, दिपक जरिपटके, प्रसाद पाटील, श्रीशैल गवंडी, महेश मस्कले, मोहन जाधव, प्रसाद सोनार, मोहन शिंदे, बंडेराव घाटगे, नरसिंग क्षीरसागर, संजय बडवे, चंद्रकांत गवंडी, सुनिल कटारे, संतोष जमगे, खाजप्पा झंपले, महेश मस्कले आदी उपस्थित होते.

# फुले-आंबेडकरांमुळे समाज उच्चशिक्षित : पोलीस उपायुक्त काळे

## अक्कलकोटमध्ये फुले, डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि.२४ एप्रिल-**

महापुरुषांचे विचार पुढे नेण्यासाठी शिक्षण महत्वाचे आहे. आम्ही जे पोलीस अधिकारी, डॉक्टर, शिक्षक, पोलीस कर्मचारी झालो हे केवळ भाग्य नाही तर शिक्षणामुळे झालो आहोत. हे शिक्षण देण्याचे काम विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी केले आहे. भावी पिढीला अधिकारी बनायचे असेल मोठे व्हायचे असेल तर अभ्यास करा, असे प्रतिपादन सोलापूर पोलीस उपायुक्त दिपाली काळे



यांनी केले. अक्कलकोट तालुक्यातील हालचिंचोळी येथे विश्वरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची संयुक्त जयंती दि.२३ एप्रिल रोजी सायंकाळी साजरी करण्यात आली. यावेळी पंचशील समाजसेवा मंडळ हालचिंचोळीकडून विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सोलापूर पोलीस उपायुक्त दिपाली काळे बोलत होत्या.

कार्यक्रमास सोलापूर सिव्हिल रुग्णालयाचे सर्जन डॉक्टर औदुंबर मस्के, शाखा अभियंता राजेश जगताप, वळसंग पोलीस ठाण्याचे पीएसआय विद्यासागर सोनकांबळे पत्रकार राजेश जगताप, पत्रकार स्वामीराव गायकवाड, माजी मुख्याध्यापक विश्रांत गायकवाड, विपिन सुरवसे, रणजीत भोसले, ग्रामपंचायत सदस्य शालू बनसोडे, माजी मुख्याध्यापक राजकुमार बनसोडे, बँक ऑफ इंडिया वळसंग कॅशियर नंदकुमार पुटगे, आंबेडकरी चळवळीतील नेते तुकाराम दुपारगुडे, माजी सरपंच मानव कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी सिद्धाराम बनसोडे, मुस्तीचे तंटामुक्त समिती अध्यक्ष गौतम चौधरी, सिद्धार्थ बोराडे, माजी सैनिक दयानंद कांबळे, बक्षीहिपरगे येथील माजी मुख्याध्यापक सुहास गायकवाड आदींसह उपस्थित मान्यवरांचा सन्मान पोलीस उपायुक्त दिपाली काळे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच पोलीस उपायुक्त दिपाली काळे यांना महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगातर्फे बालस्नेही राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल पंचशील समाजसेवा मंडळ हालचिंचोळी तर्फे मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच समाजातील जेष्ठ नागरिक श्रीशैल माशाळे, सदाशिव सोनवणे, धानप्पा गायकवाड, बलभीम जैनजांगडे लक्ष्मण इंगळे आदींचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन तुकाराम दुपारगुडे यांनी केले तर आभार कुमार वाघमारे यांनी मानले.

## महत्वाचे...



### वाटंबरे, मांजरी ग्रामपंचायतीस हैदराबाद येथील प्रशांत मून यांची भेट

**सांगोला, दि. २४ एप्रिल-**

सांगोला तालुक्यातील ग्रामपंचायत वाटंबरे, मांजरी येथे एनआयआरडीपीआर हैदराबाद येथील प्रशांत मून व सांगोला गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी यांनी भेट दिली. सांगोला तालुक्यातील अकांक्षीत तालुका कार्यक्रम व ग्रामपंचायतमधील स्थानिक प्रशासन आणि विकासातील उपक्रमांचे मूल्यांकन करण्यासाठी सदर ग्रामपंचायत व आरोग्य केंद्र येथे भेटी दिल्या. यावेळी पंधरा वित्त आयोग, दलित वस्ती, पशुसंवर्धन बांधकाम, घरकुल, आरोग्य ऊपकेंद्र येथे भेटी दिल्या. यावेळी सहा. गटविकास अधिकारी वसंत फुले, पंचायत विस्तार अधिकारी देवराज पुकळे, अमोल तोडकरी, आरोग्य विस्तार अधिकारी मिलिंद सावंत, वाटंबरे येथे ग्रामपंचायत अधिकारी शंकर मेटकरी, उपकेंद्र आरोग्य सेविका दिपाली ढावरे, हनुमंत निकम, आप्पासो गेजगे, दिनेश धनवडे, धीरज पवार, धनाजी पवार, रामचंद्र पवार तसेच मांजरी येथे ग्रामपंचायत अधिकारी मंगेश पोरे, उपकेंद्र समुदाय आरोग्य अधिकारी सना सय्यद, सरपंच नसीमा मुजावर, पोलीस पाटील किशोर जगताप, ग्रामपंचायत लिपिक नेताजी जाधव, सुरज उबाळे उपस्थित होते.



### काश्मीर येथील हल्ल्यातील दहशतवाद्यांना फाशी देण्याची मागणी

**सांगोला, दि. २४ एप्रिल-**

काश्मीर येथील हल्ल्यातील दहशतवाद्यांना पकडून तात्काळ फाशी द्या तसेच भारतीय राज्यघटनेतील मूल्यांप्रमाणे प्रत्येक नागरिकाला समानता, व्यक्ती स्वातंत्र्य आणि धार्मिक स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार आहे परंतु आज पश्चिम बंगाल राज्यांमध्ये ही घटनात्मक मूल्ये पायदळी तुडवली जात असून तेथील कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडले आहे. विशेषतः हिंदू समाजावर पद्धतशीर नियोजित व हिंसक स्वरूपाचे अत्याचार होत आहेत. पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी सरकार तेथील नियोजित हिंसाचार रोखण्यात पूर्णपणे अपयशी आणि कुचकामी ठरली आहे. यासाठी पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करा, अशा मागणीचे निवेदन सांगोल्यातील शहीद अशोक कामटे संघटना आणि हिंदु जनजागृती समितीच्या वतीने सांगोला येथे राष्ट्रपती, पंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्री भारत सरकार यांच्या नावे तहसीलदार यांना देण्यात आले. निवेदन देतेवेळी नीलकंठ शिंदे, रवींद्र कुलकर्णी, अरविंद केदार, श्रीकांत देशपांडे, सुखानंद हळीसागर, श्रीकांत चव्हाण, विकास गावडे, गणपत पटेल, गोरख माने, मयूर ढोले, मुकुंद हजारे, मकरंद पाटील, अजय तेली, श्रेयस तोडकरी, संतोष पाटणे, प्रद्युम्न कांबळे, नवनाथ कावळे, गजानन खडतरे, सोमनाथ सुरवसे, प्रा.प्रसाद खडतरे उपस्थित होते.



### सांगोला रोटरी क्लबतर्फे जि. प. शाळेत पुस्तक वाटप

**सांगोला, दि. २४ एप्रिल-**

आजकाल मोबाईलच्या जमान्यात वाचन संस्कृती लोप पावत चालली असुन तरुण पिढी साहित्या पासून दूर चालली आहे. दि.३ मे नंतर शालेय विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टी लागत आहे. या सुट्टीचा चांगला उपयोग व्हावा व मुलांना वाचनाची गोडी लागावी या उद्देशाने सांगोला रोटरी क्लबने वाढेगाव केंद्रांतर्गत जि.प.प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना बोधपर गोष्टींच्या पुस्तकांचे वाटप केले. प्रथम वाढेगाव जवळील इंगवले-बाबणे मळा येथील शाळेतील विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप केले. मुख्याध्यापक गुलाबराव बाबर यांनी सर्वांचे स्वागत केले. रोटरी क्लबचे अध्यक्ष इंजि.विकास देशपांडे यांनी प्रास्ताविकात रोटरी क्लब घेत असलेल्या उपक्रमाची व शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाची माहिती दिली. यावेळी सदस्य अरविंद डोंबे गुरुजी यांनी गाणे गात मुलांना ऊर्जा दिली. यावेळी शिक्षिका शेख, शाळा समितीचे प्रमुख संजय इंगवले, चेअरमन इंगवले, प्रा.राजेंद्र ठोंबरे उपस्थित होते. त्याचप्रमाणे वाढेगाव येथीलच संजयनगर जि.प.प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना देखिल पुस्तकाचे वाटप केले. यावेळी मुख्याध्यापक संजय पाटील यानी प्रास्ताविक केले. शिक्षिका कुंभार यांनी आभार मानले.

### बार्शीत आज आक्रोश मोर्चा

**बार्शी, दि. २४ एप्रिल-**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ बार्शीत आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. काल उत्तरेश्वर मंदिरात हिंदू समाज बांधवांची बैठक होऊन पहलगाम येथे झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ आज शुक्रवार दि. २५ रोजी सकाळी १० वाजता बार्शी नगरपालिकेसमोरुन हा मोर्चा निघणार असून तो तहसील कार्यालयावर जाणार आहे, तरी सर्व हिंदू बांधवांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन सकल हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

### अंजनाबाई नारायणकर यांचे निधन

**वळसंग, दि. २४ एप्रिल-**



मंत्री चंडक, सम्राट चौक सोलापूर येथील अंजनाबाई आनंदराव नारायणकर (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. सेवानिवृत्त उपनिरीक्षक बळवंत नारायणकर यांच्या त्या मातोश्री होत.


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.









सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# दुचाकी घसरून झालेल्या अपघातात पतीचा मृत्यू; पत्नी जखमी

## कुत्रा आडवा आल्याने घडला अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

सोलापूर ते विजापूर महामार्गावरी १३ महील येथे कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरून झालेल्या अपघातात जखमी होऊन पतीचा मृत्यू झाला. तर पत्नी गंभीर जखमी झाली आहे. हा अपघात गुरुवारी पहाटे ५.४५ च्या सुमारास घडला.कैलास रामचंद्र कटप (वय ४९ रा लक्ष्मी नगर, आकाशवाणी परिसर सोलापूर) असे अपघातात जखमी होऊन मृत झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर विजयाबाई कैलास कटप( वय ३८) असे जखमी झालेल्या पत्नीचे नाव आहे. गुरुवारी पहाटे पाच पंचेचाळीस सुमारास कैलास हे पत्नीसह सोलापूरहून विजापूरच्या दिशेने दुचाकी चालवीत जात होते.

दरम्यान तेरामैल येथील वैष्णवी पेट्रोल पंपा समोरील रस्त्यावर अचानक कुत्रा दुचाकीच्या आडवा आला. यामुळे दुचाकी घसरून झालेल्या अपघातात कैलास हे गंभीर जखमी झाले. जखमी अवस्थेत रुग्णवाहिकेतून सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात सकाळी ६.४५ च्उया सुमारास उपचारास दाखल करण्यात आले. परंतु उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या अपघातात कैलास यांच्या पत्नी विजयाबाई या जखमी झाल्या आहेत त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

## ▶▶ महत्वाचे...

### सिव्हील हॉस्पीटलमधून रिक्षातील बॅटरी चोरीस

**सोलापूर, दि.२४ एप्रिल-**

सिव्हील हॉस्पीटलमधून रिक्षातील ५ हजार ५०० रुपये किंमतीची बॅटरी चोरट्याने चोरून नेली. याबाबत विकास कल्लप्पा चव्हाण (वय २७, रा. घोडा तांडा, कुमठे, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ एप्रिल रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास विकास चव्हाण हा त्याची रिक्षा घेऊन सिव्हील हॉस्पीटलमध्ये पार्क करून ॲडमिट असलेले त्याचे मामा रवि राठोड यांना भेटण्यासाठी गेला होता. त्यावेळी कोणीतरी चोरट्याने चव्हाण याच्या रिक्षातील ५ हजार ५०० रुपये किंमतीची बॅटरी चोरून नेली. अशी नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार पापडे पुढील तपास करीत आहेत.

### पोखरापुरात अज्ञात कारणातून तरुणाने प्राशन केले तणनाशक

**सोलापूर, दि.२४ एप्रिल-**

मोहोळ तालुक्यातील पोखरापूर गावातील तरुणाने अज्ञात कारणातून पिकावर मारण्याची कीटकनाशक प्राशन केले. गुरुवारी दुपारी दोन वाजता हा प्रकार राहत्या घरी घडला. सचिन सुखदेव लेंगरे (वय ३७ रा पोखरापूर ता मोहोळ) असे कीटकनाशक प्राशन केलेल्या तरुणाचे नाव आहे. गुरुवारी दुपारी सचिन हा पोखरापूर येथील त्याच्या राहत्या घरी होता. त्यावेळी त्याने घरात असलेले कीटकनाशक अज्ञात कारणातून प्राशन केले. यात त्याला त्रास होऊ लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून भाऊ तानाजी लेंगरे याने दुपारी ४.३० च्या सुमारास शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केले. नोंद सिव्हल पोलीस चौकीत झाली आहे.

### पाणी समजून तरुणीने प्राशन केले फवारणीचे औषध

**सोलापूर, दि.२४ एप्रिल-**

गुरुवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास तरुणीने राहत्या घरात पाणी समजून फवारणीचे औषध प्राशन केले. हा प्रकार मोहोळ तालुक्यातील भूक बाभूळगाव येथे घडला. सायली महादेव धोत्रे (वय ३० ढोकबाभुळगाव या. मोहोळ) असे औषध प्राशन केलेल्या तरुणीचे नाव आहे. गुरुवारी सकाळी झोपेतून उठल्यानंतर सायली हिने पाणी समजून घरातील पिकावर फवारणीचे औषध प्राशन केले. यामध्ये तिला त्रास होऊ लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करण्यात आले. यानंतर तेथील डॉक्टरांच्या सल्ल्याने सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात सकाळी दहा वाजता भाचा मानव भालशंकर याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

### श्वास घेण्यास त्रास होऊन तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि.२४ एप्रिल-**

श्वास घेण्यास त्रास होऊन अठरा वर्षाच्या तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे. किसन बाळू ससाने (वय १८ रा. व्हरकोटे या. मोहोळ) असे मृत पावलेल्या तरुणाचे नाव आहे. गुरुवारी सकाळी साडे सातच्या सुमारास झोपेतून उठल्यानंतर किसन यास श्वास घेण्याचा त्रास होऊ लागला. त्याला मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात दाखल केले होते. तेथे उपचार करून सोलापूर येथे शासकीय रुग्णालयात सकाळी ९. ४५ च्या सुमारास पुतण्या सुरज याने दाखल केले. परंतु उपचारा पूर्वीच किसन मृत पावल्याचे डॉक्टरांनी तपासणीनंतर घोषित केले.

### अज्ञात कारणातून महिलेला पाच जणांकडून मारहाण

**सोलापूर, दि.२४ एप्रिल-**

अज्ञात कारणातून महिलेला पाच जणांकडून मारहाण करण्यात आली. हा प्रकार मोहोळ शहरातील अण्णाभाऊ साठे नगरात गुरुवारी सकाळी ७.३० वाजता घडला. अश्विनी संजय मोळे (वय ४० रा. अण्णाभाऊ साठे नगर म ोहोळ असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. गुरुवारी सकाळी साडे सातच्या सुमारास अश्विनी या त्यांच्या राहत्या घराजवळ थांबल्या होत्या. त्यावेळी तेथे आलेल्या अनिता तरंगे व इतर पाच जणांनी अज्ञात कारणातून अश्विनी यांना लाथा शबुक्क्यांनी मारहाण केली. या म ारहाणीत अश्विनी यांच्या डाव्या हाताला जखम झाली आहे. तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने मोहोळ येथील शासकीय रुग्णालयात उपचार करून सकाळी १०:४५ च्या सुमारास सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात उपचाराकरिता त्या स्वतः दाखल झाल्या.

# बाजार समिती मतदान प्रक्रिया; १४० कर्मचाऱ्यांची नियुक्ती

## ● अनुचित प्रकार रोखण्यासाठी ग्रामीण व शहरी भागात पोलिस बंदोबस्त : निवडणूक निर्णय अधिकारी गायकवाड यांची माहिती




### शनिवारी सकाळी थंडावणार बाजार समितीच्या प्रचार तोफा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ एप्रिल-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरु आहे. सत्ताधारी व विरोधी अशा दोन्ही पॅनलमधील नेते मतदारांची थेट भेट घेत जोरदार प्रचार करत आहेत. सकाळी ६:०० वाजल्यापासून रात्री १०:०० वाजेपर्यंत मतदारांच्या गाठीभेटी सुरू आहेत. नेतेमंडळींनी बाजार समितीची निवडणूक प्रतिष्ठेची बनवली आहे. त्यामुळे नेते उमेदवार आणि कार्यकर्ते पायाला भिंगरी लावून फिरत आहेत.

बाजार समितीच्या प्रचाराच्या तोफा शनिवारी (दि.२६) सकाळी (८:००) वाजता बंद होणार आहेत. त्यानंतर रविवारी मतदान तर सोमवार (दि.२८) एप्रिल रोजी मतमोजणी श्रीसिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या सभागृहात सकाळी (८:००) वाजता सुरू होणार आहे.

| निवडणूक प्रक्रियेसाठी कर्मचाऱ्यांचे नियोजन | |
|---|---|
| **जिल्हा उपनिबंधक कार्यालय येथील कर्मचारी** | |
| स्त्री व पुरुष | १२५ कर्मचारी |
| स्त्री व पुरुष | १५ राखीव |
| एकूण | १४० कर्मचारी |
| **ग्रामीण भागातील प्रत्येक मतदान केंद्रासह बुथवर पोलिस संख्या** | |
| पुरुष | १ |
| महिला | १ |
| **श्री सिद्धेश्वर प्रशाला मतदान केंद्र पोलीस बंदोबस्त** | |
| पोलिस अधिकारी | १ |
| पोलिस कर्मचारी | |
| पुरुष | २ |
| महिला | २ |

दरम्यान, या सर्व निवडणूक प्रक्रियेसाठी जिल्हा उपनिबंधक कार्यालय तथा बाजार समिती निवडणूक निर्णयाधिकारी कार्यालय यांच्यावतीने कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. यासंबंधी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आज संपन्न झाले आहे. त्यानुसार प्रत्येक केंद्रावर केंद्रप्रमुख तसेच सहाय्यक नेमण्यात आले आहेत. त्याच पद्धतीने मतदान केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक मतदान केंद्रावर एक स्त्री एक पुरुष पोलीस असणार आहे. तर शहरी मतदान केंद्र श्री सिद्धेश्वर प्रशाला येथे एक पोलीस अधिकारी तसेच महिला व स्त्री पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी असणार आहेत.दरम्यान, सोलापूर बाजार समितीच्या निवडणुकीत सहकारी संस्थेचे सदस्या, ग्रामपंचायत सदस्य, व्यापारी आणि हमालाचे सदस्य व तोलारांना मतदानाचा हक्क आहे. त्यामुळे श्री सिद्धेश्वर शेतकरी विकास पॅनल, श्री सिद्धेश्वर बाजार समिती परिवर्तन पॅनल आणि अपक्ष उमेदवारांकडून थेट मतदारांची भेट घेऊन मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे. त्यामुळे बाजार समितीची निवडणूक रंगतदार होत चालली आहे.

प्रचाराला अवघे दोन दिवस आणि एक रात्र शिल्लक असल्याने श्री सिद्धेश्वर शेतकरी विकास पॅनलचे मार्गदर्शक आ. सचिन कल्याणशेट्टी, उमेदवार दिलीप माने, सुरेश हसापुरे,राजशेखर शिवदारे, श्रीशैल नरोळे तर विरोधी पॅनलकडून आ. सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, माजी आ. सिद्धाराम म्हेत्रे, बळीराम साठे, बाळासाहेब शेळके आदी नेते मतदारांची भेट घेऊन यंदाच्या निवडणुकीत परिवर्तन करण्याचे आवाहन करत आहेत.

**लक्ष्मीदर्शनाकडे मतदारांचे लक्ष**

बाजार समिती निवडणुकीच्या प्रचाराला दोन दिवस शिल्लक आहेत. तर मतदान चौथ्या दिवशी म्हणजेच रविवारी (दि. २७) होणार आहे. दोन्ही पॅनलकडून पाच हजारांपासून ५० हजारांपर्यंत लक्ष्मीदर्शन होण्याची आशा आहे. अद्यापही लक्ष्मीदर्शन न झाल्याची चर्चा मतदारांमध्ये होत आहे.

**मतदान व मतमोजणीसाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती**

बाजार समितीचे मतदान रविवारी (दि. २७) होणार आहे. मतदानाच्या २४ तास आदी म्हणजेच शनिवारी (दि. २६) सकाळी आठ वाजेपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येणार आहे. त्यानंतर प्रचार केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्याच पद्धतीने प्रचार संपन्न झाल्यानंतर मतदान व मतमोजणीच्या प्रक्रियेसाठी सोलापूर जिल्हा उपनिबंधक कार्यालय तथा सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूक कार्यालय यांच्यावतीने कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच पोलीस बंदोबस्त देखील मागवण्यात आला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी या नात्याने मतदान व मतमोजणीची तयारी करण्यात आलेली आहे.

**- किरण गायकवाड, निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सोलापूर**

# वृध्दास मारहाण; तिघांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.२४ एप्रिल-**

वृध्दास मारहाण करून जखमी करणाऱ्या तिघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत फारूख गफुर सय्यद (वय ७२, रा. टंगसाल नगर, होटगी रोड,) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मोहसीन डांगे, तौफिक डांगे व एक अनोळखी व्यक्ती यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ एप्रिल रोजी दुपारी फारूख सय्यद हे त्यांच्या घराशेजारी राहणारे मोहसीन डांगे हा त्याच्या घरासमोर उभा राहून रोडवर पाणी मारत होता.

त्यावेळी फारूख सय्यद यांनी त्यास रस्त्यावर चिखल करू नको असे म्हणून समजावून सांगत असताना मोहसीन डांगे याने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यावेळी सय्यद यांचा मुलगा तन्वीर हा घराबाहेर आला असता त्याला व फारूख सय्यद या दोघांना मोहसीन, तौफिक डांगे व इतर एकाने हाताने मारहाण केली. तसेच मोहसीन डांगे याने कशानेतरी सय्यद यांच्या डोक्यात मारले, त्यामुळे डोक्यातून रक्त येऊ लागले. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात तौफिक डांगे व अनोळखी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मणुरे पुढील तपास करीत आहेत.

### टीव्ही केबल वायर तुटल्याच्या कारणावरून मारहाण

**सोलापूर :** टीव्ही केबल वायर तुटल्याच्या कारणावरून तरूणास मारहाण करून छोटा हत्ती वाहनाची काच फोडून नुकसान करणाऱ्या तिघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सिध्देश्वर परशुराम भिसे (वय २७, रा. न्यु शिवाजी नगर, गोंधळी वस्ती, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विशाल पाचंगे, अनिल पाचंगे, शंकर भिसे (रा. गोंधळे वस्ती, न्यु शिवाजी नगर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.२२ एप्रिल रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास गोंधळे वस्ती येथे विशाल पाचंगे यांचे टीव्ही केबल वायर तुटल्याच्या कारणावरून सिध्देश्वर भिसे यास पाचंगे यांनी मिळून शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. विशाल पाचंगे याने कोयत्याने सिध्देश्वर भिसे व त्याच्या आत्याचा मुलगा मयुर वाघमोडे यास डोक्यात मारून जखमी केले. तसेच शंकर भिसे याने छोटा हत्ती वाहन क्र. एम एच १३ एएन ७६९१ याच्या पुढील काचेवर दगड मारून वाहनाचे नुकसान केले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार कटके पुढील तपास करीत आहेत.

# सोलापूरचा गारमेंट उद्योगही स्थलांतराच्या तयारीत

## ● गिरण्या बंद, मिळेना गती; रोजगाराचा प्रश्न ही ऐरणीवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ एप्रिल-**

एकेकाळी रोजगार देणारी नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोलापूरच्या औद्योगिक वाटचालीवर आता मोठे संकट कोसळले आहे. यशवंत, लक्ष्मी-विष्णू व सोलापूर सुत मिल अशा मोठ्या गिरण्या बंद पडल्या आणि हजारो मजुर बेरोजगार झाले. त्यानंतर सोलापूरच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जाणारा विडी उद्योगही हळूहळू आटू लागला आहे. विडया बनवणाऱ्यांना तंबाकूमुळे कर्करोग (कॅन्सर) होतो. पण गारमेंट उद्योगामुळे कोणतेही आजार किंवा रोग होत नसताना तोही आता स्थलांतराच्या वाटेवर आहे. त्यामुळे रोजगाराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



या पार्श्वभूमीवर सध्या अनेक गारमेंट उद्योजक सोलापूरमध्ये नव्याने गुंतवणूक करण्यास, उद्योग सुरू करून स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यास उत्सुक आहेत. पण काही लोकांचा अत्याधिक हस्तक्षेप, अवास्तव म ागणी आणि अडथळे निर्माण करणे यामुळे सोलापूरमधील औद्योगिक वातावरण पुन्हा अस्थिर होऊ लागले आहे. परिणामी, अनेक गारमेंट उद्योजक सोलापूर बाहेर अन्य औद्योगिक क्षेत्र जसे की कर्नाटक आणि आंध्र प्रदेशमध्ये स्थलांतर करण्याच्या तयारीत आहेत. नवीन उद्योजकही सोलापूरमध्ये गुंतवणूक करण्यास तयार नाहीत. अशा ह्या लोकांच्या दडपशाहीमुळे व सततच्या अडथळ्यांमुळे उद्योजक त्रस्त झाले आहेत. परिणामी बरेच उद्योग चालू होऊ शकत नाहीत. हे असेच सुरू राहिले, तर सोलापूरमध्ये रोजगाराची संधी कशी निर्माण होणार? उद्योगच राहिले नाहीत, तर हजारोंच्या संख्येने तरुणांना नोकऱ्या कुठून मिळणार? यामुळे आज हजारो युवक, कष्टकरी वर्ग, गोरगरिब सोलापूरकर अन्य राज्यांत स्थलांतरित होत आहेत. सोलापूरच्या विकासाचे स्वप्न हे स्वप्नच राहील असे दिसत आहे. हा चिंतेचा विषय असून, या परिस्थितीकडे तातडीने लक्ष न दिल्यास सोलापूरच्या औद्योगिक प्रगतीला कायमची खीळ बसेल. प्रशासनाने या गंभीर परिस्थितीकडे लक्ष देऊन तातडीने उपाययोजना केली पाहिजे. अन्यथा 'औद्योगिक सिटी' म्हणून ओळखले जाणारे सोलापूर उद्या ओसाड होण्याच्या मार्गावर असेल. सोलापूरचे भवितव्य वाचवायचे असेल तर अशा लोकांचे हस्तक्षेपमुक्त, उद्योगपूरक वातावरण निर्माण करणे अवश्यक आहे. लोकप्रतिनिधींनी याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.





# सोलापुरात सकल जैन समाजाचा आक्रोश मोर्चा

### मुंबई विलेपार्ले येथील जैन मंदिर उध्वस्त केल्याच्या निषेधार्थ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ एप्रिल-**

विलेपार्ले मुंबई येथील जैन मंदिर बुधवार (दि.१६) एप्रिल रोजी बीएमसी प्रशासनाद्वारे पोलीस बंदोबस्तात पूजाअर्चा अभिषेक चालू असताना सर्व भक्तांना सक्तीने बाहेर काढून जेसीबी मशीन द्वारे उध्वस्त करण्यात आले. याच घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी सोलापूर सकल जैन समाजाच्या वतीने हा प्रश्न मोर्चा काढण्यात आला. शहरातील बाळीवेस येथील गांधी नाथा रंगजी जैन बोर्डिंग येथून मोर्चा काढण्यात आला मोर्च्यामध्ये सोलापूर शहर व जिल्ह्यातील जैन बांधवांनी सहभागी होऊन हातामध्ये फलक घेत विविध घोषणा देत घटनेचा निषेध नोंदवला.

मार्चा पूनम गेटवर आल्यानंतर सकल जैन समाजाच्या वतीने सुनील गांधी, पद्मजी राका, कैलास कोठारी, सुजाता मेहता यांनी मनोगत व्यक्त केले. णमोकार महामंत्राच्या पठणानंतर मोर्चाचे विसर्जन करण्यात आले. वास्तविक हे श्री १००८ दिगंबर जैन मंदिर २६ वर्षे जुने असून, मंदिरात दररोज हजारो भाविक भक्त दर्शनास व पूजापाठ करण्यात येत असतात. मुळातच हा वाद न्यायप्रविष्ट असताना हे जैन मंदिर अनधिकृतरीत्या उध्वस्त करण्यात आले. या कृत्याचा देशभरात जैन बांधवामध्ये आक्रोश निर्माण झाला असून, गावा गावात मोर्चे,धरणे, निवेदने अशी आंदोलने होत आहेत. यासह या मोर्चाच्या माध्यमातून जैन मुनी, साधू, साध्वी जी हे पायी विहार करीत असताना त्यांच्या वर हल्ले होतात,अनेक वेळा अपघातात मृत्यूमुखी पडतात, त्यांना पोलीस संरक्षण मिळावे, अनेक जैन मंदिरावर आणि तिर्थक्षेत्रावर अतिक्रमण होत आहेत. ते बंद व्हावेत प्रमुख मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना देण्यात आले.

**आक्रोश मोर्चातील घोषणा**

डर के नही, डट के खडा है पुरा जैन समाज..
मंदिर वही बनायेंगे,आस्था को नही मिटायेंगे..
हम सब एक है, तभी तो जैन धर्म सेफ है..
मंदिर हमारी आस्था है, इसे नही मिटने देंगे..
जैन समाज छोटा है, ताकत उसकी बडी है..
रुकेगे ना झुकेंगे, मंदिर वही बनायेंगे..
जैनपर हमला, देशपर हमला..
हम शांत है, कमजोर नही..
शांती आमचा स्वभाव आहे, कमजोरी नाही..
मंदिरावरील हल्ले थांबलेच पाहिजे..
साधू संतावर हल्ले थांबलेच पाहिजे..
तीर्थरक्षा, धर्म रक्षा..
पाडलेले मंदिर बांधून दिलेच पाहिजे..
साधू सुरक्षित, समाज सुरक्षित...

**निवेदन देणाऱ्यांना आरटीओचा दणका, हेलमेट नसल्याचे कारण**

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना सकल जैन समाजातर्फे आक्रोश मोर्च्या नंतर निवेदन देताना केतन शहा, सुनील गांधी, कल्पेश मालू, कैलास कोठारी, सुहास शहा,अभिनंदन विभूते, संतोष बंब, पल्लवी मेहता, पदम राका आदींसह सकल जैन समाज बांधव उपस्थित होते. तत्पूर्वी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात येत असताना त्या आवारातच आरटीओने निवेदन देणाऱ्याच्याया गाड्या पकडल्या व हेल्मेट नसल्याने प्रत्येकी ५०० रुपये दंड आकारला.

# चंद्रकाली प्रसाद माताजी यांच्या प्रवचनास प्रारंभ

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

पूर्वभागातील भावनात्रषी पेठ येथील पंचमुखी हनुमान देवस्थानच्या वतीने स्व.व्यंकटेश व्यंकय्या सिंगम याच्या स्मरणार्थ आंध्र प्रदेशातील नंबुरु येथील श्री कालीवनाश्रमच्या पिठाधिपती पूज्ययोगिनी श्री चंद्रकाली प्रसाद माताजी यांचे सद्गुरु वैभवम् या विषयावर प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, २३ एप्रिल रोजी या प्रवचनास प्रारंभ करण्यात आला.



रविवार, २७ एप्रिल पर्यंत दररोज सायंकाळी ७ ते ९ यावेळेत जुना वालचंद कॉलेजसमोरील श्री भावनाऋषी पटांगण येथे हे प्रवचन होत आहे. तसेच त्यांचे परमशिष्य श्री श्रीनिवास रामानुजदास यांचे श्री हनुमत वैभवम् या विषयावर प्रवचन देतआहेत. दररोज सायंकाळी ६ ते ७ यावेळेत सनातन वेदांत सभा व भजन कार्यक्रम होत आहे. या प्रवचनास तेलुगुभाषिक श्रोत्यांची मोठी गर्दी होत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०९७

**येउनि नरदेहासी वाचें उच्चारी ज्ञानेश्वर ।**
**तयाचा संसार सुफल झाला गे माये ।।**

ज्या समाजाने अतोनात छळ केला, त्या समाजाला जीवन उध्दाराच्या मार्ग दाखवण्यात तसूभरही उणीव राहू दिली नाही. ज्या समाजाने कोरान्न भिक्षेच्या झोळया फाडल्या, त्या समाजाची झोळी ज्ञानाने भरून दिली. गुरूपरंपरेने चालत आलेले ज्ञानाचे भांडार सदगुरूच्या परवानगीने सर्व समाजासाठी खुले केले. कमी वयात आणि अती कठीण परिस्थितीत ज्ञानदेवांनी अत्युच्च टोकाचे अतिउत्कृष्ट कार्य केले. असे हे ज्ञानदेव सर्व संतांचे हृदयस्थान झाले. वारकरी सांप्रदायाचा पाया ज्ञानदेवांनी रचला. श्रीमदभगवदगीतेचे मराठी भाषेत सुंदर प्रकारे विवेचन करून श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ समाजापुढे ठेवला. श्री ज्ञानेश्वरी अंती सर्व विश्वासाठी सुख, सम ाधान, शांतीचा वर मागीतला. अशा प्रचंड ज्ञानी, नम्र, त्यागी असणा-या ज्ञानदेवांचे नांव जर संसारात अडकलेला जीव घेऊ लागला तर त्याचे जीवन, त्याचा संसार ख-या अर्थाने सफल झाला, असे सेनाजी, येउनि नरदेहासी वाचें उच्चारी ज्ञानेश्वर ।



तयाचा संसार सुफल झाला गे माये ।।, या शब्दांत म्हणतात. मानवी जीवनाचे जीवनगीत असणारी किंवा विश्वशांतीचा संदेश देणारी श्री ज्ञानदेवांची श्री ज्ञानेश्वरी संसार सुफल करण्याचे सामर्थ्य ठेवते. हे सामर्थ्य जाणायचे असेल तर ज्ञानेश्वरीचा अनुभव घ्यावा लागेल.

एखादा महात्मा इतका सर्वश्रेष्ठ असतो की, त्याचे गुणगान करण्यासाठी सांसारिक जीवाकडे शब्द नसतात. अर्थात, अशा महात्म्याची महती सांगण्यात या जीवाला मर्यादा पडतात. असा महात्मा भगवंताचा जीव की प्राण असतो. सांसारिक जीव अशा महात्म्याची महती जाणूही शकत नाही आणि इतरांना सांगूही शकत नाही, हे भगवंताला माहिती असते. म्हणून भगवंत स्वत:च अशा महात्म्याची महती सांगतात. अशा महात्म्याची महती सांगण्यात भगवंताला आनंद वाटतो. ज्ञानियाचा राजा, नम्रतेचा मुकुट, आदर्शत्वाचा शिरोमणी असणारे ज्ञानदेव पांडुरंगाचे जीव की प्राण होते. यांच्या विव्दतेची महती सामान्य जीवाला सांगता येणे शक्य नाही. श्री ज्ञानेश्वरी, चांगदेव पासष्टी, स्फुट अभंग, हरिपाठ आदि ज्ञानदेवांच्या रचना डोळयासमोर आणल्या म्हणजे ज्ञानदेव हे खरोखर ज्ञानियांचे राजे असल्याचे आपल्या लक्षात येते. मानवाला शांती, समता, सुख, समाधान आणि कर्तव्याचा मार्ग दाखवणा-या या ज्ञानराजाचे जो कोणी मन:पूर्वक स्मरण करेल त्याच्यातील पापीवृत्ती निश्चितच नष्ट होईल. स्वत: भगवंत, तयाचिया स्मरणें जळती पातकें । सांगत पंढरीनाथ सेना म्हणे ।।, असे सांगत असल्याचे सेनाजी म्हणतात. माऊलींच्या बाबतीत बोलतांना, तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर । मुखी म्हणता चुकती फेर ।।, असे म्हणतात. यावरुन ज्ञानोबारायांची महती लक्षात येते. जय जय राम कृष्ण हरी ।

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | करण - गरज (२२.१०) |
| दि. २५ एप्रिल २०२५ | दिनविशेष - चांगला दिवस, |
| विक्रम संवत् २०८१ | ....राहू काल.... |
| शके - १९४७ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| मास - चैत्र | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| कृ. द्वादशी (११.४५) | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| ऋतु - ग्रीष्म | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| नक्षत्र - पू.भाद्रपदा (०८.५३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| योग - ऐंद्र (१२.३०) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हम खास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफिकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या :** लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीम ध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. मानसिक संतोष निर्माण होईल.

# आता बदल्यानंतरच अनुकंपा भरती

**▸ जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

जिल्हा परिषदेंतर्गत विविध संवर्गातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्यानंतरच अनुकंपाची भरती करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

सध्या अनुकंपाच्या जागा रिक्त आहेत. त्या भरण्यात याव्यात, अशी मागणी होत आहे. मात्र, जिल्हांतर्गत बदल्या, तसेच सेवानिवृत्तीनंतर अनेक जागा रिक्त होणार आहेत. त्या जागेवर अनुकंपातून नियुक्ती




देऊन जागा भरल्या जाणार आहेत. जागा रिक्त झाल्यानंतर जास्तीत जास्त अनुकंपातून जागा भरण्यात येणार आहेत. त्यामुळे अनुकंपाची भरती ही जून महिन्यात केली जाणार असल्याचेही सीईओ जंगम यांनी सांगितले. मार्च व एप्रिल महिन्यात समुपदेशनाने पदोन्नती देण्यात आल्याने अनेक जागा रिक्त आहेत. तसेच मे महिन्यात शिक्षण विभागातील शिक्षकांसह अधिकारी व कर्मचार्यांच्या बदल्या होणार आहेत. तसेच अनेक अधिकारी व कर्मचारी ३१ मे रोजी निवृत्त होणार आहेत. त्यामुळे रिक्त जागा व बदल्या व निवृत्त होऊन असणाऱ्या रिक्त जागा याठिकाणी अनुकंपाने जागा भरण्यात येणार आहे.

सध्या बदली प्रक्रियेची फाईल तयार असून बदलीस पात्र अधिकारी, शिक्षक व कर्मचार्यांची नावे निश्चित आहेत. सध्या शाळांमध्ये वार्षिक परीक्षा व १ मे ला शाळांचे निकाल असल्याने मे महिना संपल्यानंतर बदली प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यामुळे जूनमध्ये अनुकंपावर कर्मचार्यांची भरती करण्यात येणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सांगितले.



## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नृत्य गायनातून अभिवादन

**भा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

उत्तम सोशल फाऊंडेशन आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने नृत्य-गायन कलेच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन प्रवास सादरीकरण करण्यात आले.

सदर चा कार्यक्रम स्थळ डॉ. निर्मलकुमार फडकुले संकुलात पार पडला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सुधीर खरटमल, सरपंच ज्योती कुलकर्णी, अभियंता अरविंद माने, सिद्राम ओहळ मधुकर आठवले, डॉ. अरुंधती हराळकर, प्रा. एस. डी. शेख आदी उपस्थित होते.

प्रस्ताविक संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. महेंद्र गायकवाड यांनी केले. राष्ट्र उन्नतीसाठी सामाजिक सेवा या ब्रीद वाक्याच्या आधारे उत्तम सोशल फाउंडेशन गेल्या तीन वर्षापासून राज्य व सोलापूर जिल्हा स्तरावर काम करत आहे. समाजातील प्रत्येक वर्गाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन संघर्ष पाहता आपली वाटचाल करावी तसेच आपले योगदान या समाजासाठी वा देशाचा उन्नतीसाठी असावी असे मत गायकवाड यांनी व्यक्त केले. आभार प्रा. डॉ. प्रदीप गायकवाड व विद्या कदम यांनी मानले.

## बसवेश्वर मंडळातर्फे शेळगी येथे विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२४ एप्रिल-**

शेळगी येथील श्री बसवेश्वर जन्मोत्सव बहुउद्देशीय मंडळाच्या वतीने जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त यंदा सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती गंगाधर झुरळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शनिवार दि. २६ एप्रिल रोजी श्रींची मूर्ती स्थापना करुन महाआरती करण्यात येणार आहे. सायंकाळी अक्कमहादेवी यांचे नाटक दाखवण्यात येणार आहे. २४ एप्रिल रोजी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून डॉ. सूर्यप्रकाश कोठे हे काविळ, यकृत कार्य चाचणी, ई.सी.जी, मधुमेह, नेत्र तपासणी यासंदर्भात आरोग्य तपासणी करणार आहेत. सायंकाळी ६ वाजता व्याख्याते गणेश शिंदे हे जीवन सुंदर आहे या विषयावर व्याख्यान देणार आहेत. दि.२८ रोजी सायंकाळी ६ वाजता रुद्रसेना महिला मंडळाच्यावतीने रुपा स्वामी यांचे सामूहिक रुद्रपठण होणार आहे. त्यानंतर महिलांसाठी होम मिनिस्टर हा खेळ घेण्यात येणार आहे. दि. २९ एप्रिल रोजी विशेष सत्कार ठेवण्यात येणार असून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ३० एप्रिल रोजी अक्षयतृतीयानिमित्त शेळगी ब्रिजपासून सवाद्य मि रवणूक काढण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस युवराज यलशेट्टी, सुयोग पाटील, पिनू करपे, महादेव यलशेट्टी, शिवयोगी पाटील, शिवराज धप्पाधुळे आदी उपस्थित होते.

## सेवासदन प्रशालेत देवेंद्र अयाचित यांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२४ एप्रिल-**

येथील सेवासदन प्रशालेतील देवेंद्र अयाचित या शिक्षकाचे निधन झाले. त्याबद्दल त्यांना सेवासदन संस्था आणि प्रशालेच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. सोलापूरच्या ताल क्षेत्रात शास्त्रीय पद्धतीने पखवाज वादन करणारे देवेंद्र आयाचित हे एकमेव अष्टपैलू कलावंत होते.



सेवासदन प्रशालेचे शिक्षक देवेंद्र अयाचित त्यांनी सेवासदन प्रशालेत १८ वर्ष सेवा बजावली रस्ता सुरक्षा पथक म्हणजेच आरएसपीचे शिक्षक, क्रीडाशिक्षक, संस्कारभारती रांगोळी प्रशिक्षक, विविध नाटके, गाणी यांना तबला साथ संगत देणारे म्हणून त्यांनी कार्य केले. देवेंद्र आयाचित यांच्या निधनाबद्दल उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई यांनी न भरून येणारी पोकळी निर्माण झाली असून सर्वगुणसंपन्न शिक्षक आज दुरावला आहे अशी भावना व्यक्त केली तर क्रीडाप्रमुख ज्ञानेश्वर काळे यांनी त्यांच्या बद्दलचे मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा शीला मिस्त्री, सचिव वीणा पतकी, कार्यकारिणी सदस्य पद्माकर कुलकर्णी, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी, मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे, पर्यवेक्षिका स्वाती पोतदार उपस्थित होते.



## जुनी पोलिस लाईन मंदिरात स्वामी समर्थ उत्सव सुरु

**सारामृताचे वाचनाने प्रारंभ; उद्या प्रवचन व महाआरती**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल -**

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या १४७ व्या पुण्यतिथीनिमित्त मुरारजी पेठेतील जुनी पोलिस लाईन येथील श्री स्वामी समर्थ समाजसेवी न्यास मंदीरात प्रवचन, आरती व महाप्रसाद यांसारख्या विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याचा शुभारंभ बुधवारी सकाळी सारामृत वाचनाने करण्यात आला.

शनिवार, दि. २६ एप्रिलपर्यंत मंदीरात विविध कार्यक्रम होणार असून बुधवारपासून सकाळी सात ते नऊ सारामृत वाचनास सुरुवात झाली असून सायंकाळी पाच ते सात या वेळेत हभप संतोष म हाराज माळवदकर यांचे श्री स्वामी समर्थ भावकथा चरित्रपर प्रवचन झाले. त्यानंतर साडेसात वाजता महाराजांची महाआरती करण्यात आली.२६ एप्रिल रोजी सकाळी साडेसात वाजता अभिषेक, त्यानंतर पालखी मिरवणूक काढण्यात येईल. दुपारी बारा वाजता स्वामी महाराजांची आरती करण्यात येईल. सायंकाळी चार ते पाच या वेळेत यशश्री भजनी मंडळ यांची भजनसेवा होईल. सायंकाळी पाच ते सात या वेळेत बालकीर्तनकार हभप शंभू महाराज गुंड यांचे कीर्तन होईल. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख गणेश वानकर, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, माजी उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तरी या धार्मिक कार्यक्रमांना जास्तीत जास्त जणांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री स्वामी समर्थ समाजसेवी न्यासाच्यावतीने करण्यात आले आहे.

## वचन साहित्य शरणानी दिलेली अमोल ठेवा आहे : तेली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

म. बसवेश्वर व तत्कालीन शरणानी वचन साहित्याची अमोल ठेवा आपल्याला दिले आहेत. त्याचे नित्य वाचन केले पाहिजे. संस्थेने वचनगीत स्पर्धा आयोजित केल्यामुळेच आज आपण येथे मोठ्या संख्येने उपस्थित आहात हे कौतुकास्पद आहे, असे विचार बसव सेंटर संस्थेने म. बसवेश्वर जयंती महोत्सवातनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या समारंभात प्रमुख अतिथी परिक्षक महादेवी तेली यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी डॉ. गीता डिगे या होते.

म. बसवेश्वरांच्या प्रतिमेची पुजा करुन अतिथीनी पुष्पहार अर्पण केले. पौर्णिमा तोटद यांनी प्रास्ताविक केले. प्रारंभी संस्थाध्यक्ष राजेंद्र मायनाळ यानी उपस्थितांचे स्वागत करून संस्थेच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध



उपक्रमाची माहिती दिली. यानंतर स्पर्धकानी शिवयोगी सिद्धारामांचे वचन सादर केले स्पर्धेत वीसहून अधिक महिला सहभागी झाले होते. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे : प्रथम क्रमांक मैत्रा केलूर द्वितीय प्रतिभा कत्ते तृतीय रत्ना संती उत्तेजनार्थ शांताबाई लंबी, प्रभावती बुट्टे. यशस्वी स्पर्धकाचे उपाध्यक्ष निलकंप्पा कोनापूरे सचिव प्रा मल्लिनाथ पाटील शांतादेवी दुलंगे, मुख्याध्यापिका उकंरडे, रमा कनाळे यांनी अभिनंदन केले पारितोषिक वितरण समारंभ चार मे रोजी आयोजित करण्यात आल्याचे पौर्णिमा तोटद यानी सांगितले.

## वीरशैव व्हिजनतर्फे ‘एक बाटली पाणी झाडासाठी’ पत्रक वाटप

**● जागतिक वसुंधरा दिन व बसव जयंती निमित्त उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ एप्रिल-**

जागतिक वसुंधरा दिन व बसव जयंतीनिमित्त वीरशैव व्हिजनतर्फे दररोज सकाळी व्यायामाला जाणाऱ्या नागरिकांनी एक बाटली पाणी आपल्या सोबत आणून आपण व्यायाम करीत असलेल्या परिसरातील झाडांना घालून वृक्ष संवर्धन करावे अशा आशयाचे १ हजार पत्रक वाटप करण्याचा शुभारंभ करण्यात आला.

मंगळवारी दयानंद म हाविद्यालयातील मैदानावर सकाळी व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांना लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष दीनानाथ धुळम यांच्या हस्ते व दयानंद मॉर्निंग क्लब अध्यक्ष



भारत पवार यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ अजित दुलंगे, डॉ संजय कळके, डॉ. सुनिल कबाडे, डॉ. विजयकुमार स्वामी, डॉ. विनोद लाड, आडत व्यापारी सिद्रामप्पा हुलसुरे, श्रीशैल शेरीकर, बंडप्पा फुलझळके, केदार चाकोते, वीरशैव व्हिजन उत्सव समितीचे अध्यक्ष विजयकुमार बिराजदार यांच्या प्रमुख उपस्थितीत पत्रक वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. प्रास्ताविक वीरशैव व्हिजन उत्सव समितीचे अध्यक्ष विजयकुमार बिराजदार यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गंगाधर झुरळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सोमनाथ चौधरी, मनोज पाटील, गंगाधर झुरळे, अमित कलशेट्टी यांनी परिश्रम घेतले.

## एल्ग्रीस सोलरला आयएसओ प्रमाणपत्र

**असे प्रमाणपत्र मिळवणारी महाराष्ट्रातील पहिलीच कंपनी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

सौर ऊर्जा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणारी सोलापूरची एल्ग्रीस सोलार पॉवर सिस्टीम या क्षेत्रात भरीव योगदान देत असून एल्ग्रीस सोलारच्या दर्जे दार सिस्टिम्स आणि सर्व्हिसेसमुळे अनेक ग्राहकांचे लाईट बिल शून्यावर आले आहे. हे केवळ १-२ महिन्यासाठी नाही तर बहुतांश ग्राहकांना चक्क १०० महिन्यापासून शून्य बिल येत आहे. या कामगिरीमुळे ग्राहक एल्ग्रीस सोलर वर कमालीचे खुश असून इतर लोकांना ही एल्ग्रीस सोलर सिस्टीम बुक करण्याचा सल्ला देत आहेत.

नुकतेच एल्ग्रीस सोलरला जर्मनीच्या टीयूव्ही कंपनीतर्फे आयएसओ ९००१ प्रमाणपत्र मिळाले आहे. प्रमाणन हा विश्वास दर्शवणारा एक ट्रेडमार्क आहे. जो खात्री देतो की उत्पादन, सेवा किंवा प्रक्रिया सुरक्षितता, गुणवत्ता आणि टिकाऊपणासाठी पूर्णपणे तपासली गेली आहे. या चाचण्यांमध्ये आंतरराष्ट्रीय, प्रादेशिक आणि राष्ट्रीय नियम किंवा मानकांशी सुसंगतता समाविष्ट आहे. टीयूव्ही आयएसओ ९००१ प्रमाणपत्र, गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली प्रमाणपत्र आहे. जे ग्राहकांच्या अपेक्षा सातत्याने पूर्ण करण्याची आणि ओलांडण्याची संस्थेची क्षमता प्रदर्शित करते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सूर्यघर रूफटॉप योजना जाहीर केली असून या योजनेतंर्गत देशभरात पुढील ३ वर्षात १ कोटी घरांवर सोलर रूफटॉप सिस्टम बसवले जाणार आहेत. या योजनेतंर्गत प्रत्येक कुटुंबाला ७८ हजार रुपयांपर्यंतचे अनुदान मिळणार आहे आणि यासाठी सरकार ७५ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करणार आहे. ही योजना सुरू झाल्यापासून सुमारे एका महिन्यातच १ कोटीहून अधिक कुटुंबांनी नोंदणी केली आहे. ज्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही त्यांनीही लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले आहे.तरी इच्छुक ग्राहकांनी एल्ग्रीस सोलारशी ०२० ७१५३ ००२७ वर संपर्क साधावा.

## गुरुविद्या प्रतिष्ठानचे मानद पुरस्कार जाहीर; रविवारी वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमि त्त येथील गुरूविद्या प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणाऱ्या मानद पुरस्कारासाठी विविध क्षेत्रातील अकरा जणांची निवड करण्यात आली असून २५ एप्रिल पासून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्रतिष्ठानचे बसव उत्सव समिती अध्यक्ष सातलिंग शटगार यांनी दिली.

या पुरस्काराचे वितरण रविवार २७ एप्रिल रोजी सायंकाळी ४.३० वाजता सिध्देश्वर पेठेतील हॉटेल समृद्ध येथे होणार आहे. माजी कुलगुरू ईरश स्वामी यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे. यावेळी बसव उत्सव समिती, तथा



श्री.शटगार | श्री व सौ.न्हावकर | श्री व सौ. वैद्य | श्री.मोरे | श्रीमती.देशपांडे
श्री.सोलापूरे | श्री.हिरेमठ | सौ.शटगार | सौ.मोरे

गुरूविद्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष सातलिंग शटगार, संस्थापक सोमशेखर भोगडे, उपाध्यक्षा राजश्री तडकासे, माजी अध्यक्ष प्रा प्रभाकर नागणसूरे, सदस्य विजयकुमार भोगडे, नमिता थिटे कार्याध्यक्षा, सल्लागार मोहन भुमकर, सचिवा श्रीदेवी यळमेली, सहसचिवा रेणुका हब्बु यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच बुधवार ३० एप्रिल रोजी बसव जयंतीनिमित्त सकाळी ८.३० वाजता कौतम चौक येथे बसवेश्वरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्तात्रय जामदार, मंजूर शेख, प्रतिक्षा खंडाळकर, शिवलीला भोगडे, नेहा भोगडे, नितीन भोगडे परिश्रम घेत आहेत. तरी बसव भक्तांनी सर्व कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन सचिवा श्रीदेवी यळमेली यांनी केले.

**हे आहेत गुरुविद्या पुरस्काराचे मानकरी**

- बसवरत्न पुरस्कार : डॉ. मनोहर मोरे (अक्कलकोट).
- बसव माता पुरस्कार : वैशाली विलास देशपांडे.
- बसव भुषण पुरस्कार : अनिता सुंदरलाल मोरे
- शरण दांपत्य पुरस्कार:विठ्ठलराव नारायणराव न्हावकर व छबुबाई विठ्ठलराव न्हावकर
- बसव भक्त पुरस्कार : चनबसवेश्वर सिद्राम सोलापुरे
- बसव श्री पुरस्कार : शिवानंद हिरेमठ
- बसव शरणी पुरस्कार : सुनिता शटगार
- बसव दांपत्य : मानसी मोहन वैद्य व मोहन नरसिंह वैद्य.

**तायक्कॉदो स्पोर्टस् प्रशिक्षण शिबिर आजपासून**

तसेच शुक्रवार २५ एप्रिल ते मंगळवार २९ पर्यंत विजापूर रोड भागात तायक्कॉदो स्पोर्टस् प्रशिक्षण शिबिर आयोजित केले आहे. या प्रशिक्षणाचे उद्घाटन माजी तालुका क्रिडा अधिकारी सत्येन जाधव, सोलापूर जिल्हा स्पोर्ट्स कॉन्सिलचे अध्यक्ष मोहन भुमकर, सचिव मंजूर शेख, प्रतिक्षा खंडाळकर यांच्या उपस्थितीत होणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### पुस्तकांतून जीवनाचे तरंग अतरंग उमटतात : प्रा.डॉ. राहुल पालके

**बार्शी, दि. २३ एप्रिल-**

पुस्तके ही शिक्षण, विज्ञान, संस्कृती आणि माहिती यांचा प्रसार, प्रचार व प्रवेश मिळवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची माध्यमे आहेत. पुस्तके आपल्याला माहिती देतात, मनोरंजन करतात आणि अधिक चांगल्या प्रकारे विचार करण्यास सक्षम करतात असे प्रतिपादन डॉ. राहुल पालके यांनी केले. येथील श्री शिवाजी महाविद्यालयात जागतिक पुस्तक दिन व इंग्लिश लँग्वेज डे या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. शेख, कला विद्याशाखा समन्वयक प्रा. डॉ. बी. डी. पारसे, ग्रंथपाल प्रा. माधव टिपरसे, प्रा. भरतकुमार जसाभाटी, लिपीक उज्वला शेळवणे हे उपस्थित होते. प्रास्ताविक व सुत्रसंचालन प्रा.माधव टिपरसे यांनी केले. प्रा. भरतकुमार जसाभाटी यांनी आभार मानले.



### तालुक्यात महावितरणची अणदूर शाखा ठरली सर्वोत्कृष्ठ

**अणदूर, दि. २४ एप्रिल-**

महावितरणतर्फे मार्च २०२४-२५ साठीचा सर्वोत्कृष्ठ शाखा पुरस्कार अणदूर (ता.तुळजापूर) शाखेस देण्यात आला. महावितरणच्या तुळजापूर विभाग कार्यालयात कर्तव्यदक्ष कर्मचारी गुणगौरव सोहळा नुकताच पार पडला. यावेळी कार्यकारी अभियंता नंदकुमार काळे यांच्या हस्ते शाखा कार्यालय अणदूर यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरी, ग्राहक सेवा व थकीत वीज बिल वसुलीबद्दल उत्तम सर्वगुण काम केल्यामुळे गौरविण्यात आले. शाखा अभियंता प्रतीक खापरे यांच्यासहित सर्व कर्मचारी यांचा सत्कार करून प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून धाराशिव मंडळ कार्यालयाचे अधीक्षक अभियंता संजय आडे व इतर अधिकारी तसेच शाखा कार्यालयामध्ये कार्यरत असणारे प्रिंसिपल टेक्निशियन साळुंखे, बोरमाने, वरिष्ठ तंत्रज्ञ वाहुळकर, कोळी, जेटीथोर, दुधाळकर, रूपेश जाधव, राहुल पाटील, स्वामी, सय्यद, सिनियर ऑपरेटर वैभव दळवी उपस्थित होते. शाखा कार्यालय अणदूरमध्ये अत्यंत चांगली कामगिरी केल्याबद्दल वरिष्ठ तंत्रज्ञ प्रशांत शिवाजी वाहुळकर यांना उत्कृष्ट ऊर्जामित्र हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.



### बार्शी शाखेतर्फे सांगली बँकेचे अध्यक्ष गणेशराव गाडगीळ यांचा सत्कार

**बार्शी, दि. २४ एप्रिल-**

सांगली अर्बन को-ऑप. बँकेने नुकताच दोन हजार कोटी रूपयांच्या व्यवसायाचा टप्पा पार केला तसेच आर्थिक वर्ष २०२४-२५ यामध्ये बँकेस रुपये १५ कोटी इतका नफा झाला. यानिमित्त उद्योजक आणि सांगली अर्बन बँकेचे कुर्डूवाडी शाखा सल्लागार राजकुमार धोका व सीए मयूर धोका यांचे हस्ते बँकेचे प्रधान कार्यालय सांगली येथे बँकेचे अध्यक्ष गणेशराव गाडगीळ, उपाध्यक्ष सीए श्रीपाद खिरे, मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना श्री. राजकुमार धोका यांनी सर्व संचालक मंडळ, अधिकारी, वसुली विभाग, कर्मचारी यांचेही अभिनंदन केले. यावेळी संचालक सी.ए.अनंत मानवी, श्री.एच.वाय. पाटील, श्रीकांत देशपांडे, शैलेंद्र तेलंग, सागर घोंगडे, संजय पाटील, कालिदास हरिदास, स्वाती करंदीकर, रवींद्र भाकरे, मनोज कोरडे आदी उपस्थित होते.



### साक्षी बनसोडेचा सन्मान

**अकलूज, दि.२४ एप्रिल-**

खटाव तालुक्यातील सिद्धेश्वर कुरोली येथील आंतरराष्ट्रीय पॅरा ज्युदो खेळाडू साक्षी हरिदास बनसोडे हिला सन २०२३-२०२४ चा प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार मा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी तिच्या निवासस्थानी जाऊन सत्कार केला. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी साक्षीच्या परिश्रमाचे कौतुक करत भविष्यकालीन यशासाठी शुभेच्छा दिल्या. साक्षीसारख्या खेळाडूंमुळे ग्रामीण भागातील युवक-युवतींना प्रेरणा मिळते असे ते यावेळी म्हणाले. यावेळी मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते.

### भगवंत अभियांत्रिकीमध्ये बीसीए प्रवेश परीक्षा कार्यशाळेचे आयोजन

**बार्शी, दि. २४ एप्रिल-**

येथील भगवंत अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये बीसीए प्रवेश परीक्षा २०२५ करिता येथील बी सी ए विभागामार्फत दि २६ एप्रिल रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. विद्यार्थ्यांना कार्यशाळेत सहभागी होण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. रणजित शिराळ व संकुल प्रमुख ऋतुराज सावंत यांनी केले आहे. विद्यार्थांनी नाव नोंदणी व अधिक माहितीकरिता मो. नं. ९६६५८७८५२५ / ९०४९०८६७८१ या क्रमांकावर संपर्क करावा.

# दर्शन रांगेत हिरकणीकक्ष अन् पाण्यासह सावलीची सोय

## अक्कलकोटमध्ये उद्या पुण्यतिथी उत्सव; आढावा बैठकीतील निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ एप्रिल-**

यंदाचा श्री स्वामी समर्थ महाराजांचा पुण्यतिथी उत्सव दि.२६ एप्रिल रोजी येथील वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिरात होत आहे. त्यासाठी राज्यासह अन्य भागातून येणाऱ्या भाविकांसाठी नगरपालिका, महसुल व पोलीस प्रशासनातर्फे मंदिर परिसरात संयुक्त नियंत्रण कक्ष असणार आहे. मंदिरा बाहेर दर्शन रांगेत कापडी छत, पिण्याचे पाण्याची सोय केली जाणार आहे. त्याचबरोबर हिरकणी कक्ष, प्राथमिक उपचार केंद्र, अग्निशमन वाहन, रुग्णवाहिका याची सज्जता ठेवण्यात येणार असल्याची माहिती तहसिलदार विनायक मगर यांनी दिली.



श्रीदत्त गुरुचे अवतार श्री स्वामी समर्थ महाराज यांचा पुण्यतिथी उत्सव वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिर येथे २६ एप्रिल रोजी नगरप्रदक्षिणा पालखी सोहळा, मिरवणुक, विविध धार्मीक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. यानिमित्त येणाऱ्या स्वामी भक्तांना सुलभ दर्शन, आवश्यक सोयी-सुविधा मिळाव्यात यादृष्टीने आढावा घेण्यासाठी बुधवारी बैठक झाली. महसुल प्रशासन, नगरपालिका, मंदिर समिती, पोलीस प्रशासनासह संबंधित सर्व विभाग यादृष्टीने योग्य ती सर्व खबरदारी घेत असुन याची जय्यत तयारी चालू असल्याची माहिती तहसिलदार मगर यांनी दिली. आढावा बैठकीस संबंधित सर्व विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिरात दर्शन मंडप अंतर्गत व्यवस्था सज्ज ठवण्यात आली आहे. मंदिर समिती आवश्यक सर्व खबरदारी घेत असल्याची माहिती वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी दिली.

नगरपालिका, महसुल प्रशासन, पोलीस प्रशासन यांचे संयुक्त नियंत्रण कक्ष मंदिर परिसरात असणार आहे. या नियंत्रण कक्षातुन भाविकांना, वाहन धारकांना ध्वनिवर्धकाद्वारे सूचना दिल्या जातील. भाविकांची गर्दी लक्षात घेता मंदिराबाहेरही दर्शन रांगेत कापडी छत, पिण्याचे पाणी सोय केली जाणार आहे. हिरकणी कक्ष, प्राथमिक उपचार केंद्र, अग्निशमन वाहन, रुग्णवाहिका याची सज्जता ठेवण्यात येणार आहे. वटवृक्ष स्वामी मंदिर, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, बुधवार पेठ समाधी मंदिर, स्टेशन रस्ता राजेराय मठ, राम गल्ली गुरु मंदिर येथे विविध धार्मीक कार्यक्रम होणार आहेत. भाविकांची गर्दी गृहीत धरून सर्व संबंधित विभाग प्रमुख, प्रशासन यंत्रणा, मंदिर समिती आवश्यक सर्व खबरदारी घेत आहे. या बैठकीत वटवृक्ष देवस्थान, अन्नछत्र मंडळ व समाधी मठाचे व्यवस्थापक, विभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरिक्षक उत्तर पोलीस ठाणे, मुख्याधिकारी रमाकांत डाके आदीसह अन्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

> **६० पोलिस, १० अधिकारी तैनात**
>
> योग्य ती खबरदारी घेण्याकरिता वाहने पार्किंग साठी हत्ती तलावा समोरील मोकळी जागा व गाणगापुर रस्त्यावर भक्त निवास समोरील रुग्णालय येथे वाहने पार्किंगचे नियोजन केले आहे. ६० पोलीस कर्मचारी १० अधिकारी वर्ग पोलीस निरिक्षक तैनात असणार आहेत अशी माहिती विभागीय पोलीस अधिकारी विलास यामवार यांनी दिली.

## काळभैरवानाथाचं चांगभलंच्या गजरात गुलालाची उधळण

### काळभैरवनाथाच्या मिरवणुकीने भांबुर्डी यात्रेची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि.२४ एप्रिल-**

काळभैरवनाथाची भव्य रथातून मिरवणुक ... गुलाल खोबऱ्याची मुक्त उधळण .... बँड, डॉल्बीसह पारंपारीक वाद्याचा अविष्कार..... पावलो पावली होणारी फटाक्यांची आतषबाजी... वाद्यांच्या तालावर थिरकणारी तरूणाई... गजी नृत्यात दंग झालेली गजी मंडळ... खमंग खाऊने फुललेल्या बाजारपेठा... यातच काळभैरवानाथाचं चांगभलं... घोड्यावरच्या देवाचं चांगभल! च्या जयघोषात भांबुर्डी (ता. माळशिरस) येथील काळभैरवनाथ यात्रेची सांगता झाली.



यात्रेच्या तिसऱ्या दिवशी सकाळी नाथाचे मुखवटे रथात बसवण्यात आले. पुढे काळभैरव व जोगेश्वरी मातेची घोड्यावर बसलेला मुर्ती ठेवण्यात आली होती. सकाळी ७ पुर्वी रथाचे मार्गक्रमण सुरु झाले. पुढे बँड पथक, पारंपारीक सनईचा सुर, तसेच डॉल्बीचा गजर करत मिरवणुकीला सुरवात झाली. रथाला बांधलेल्या दोराच्या सहाय्याने भाविक रथ ओढत होते. रथ पुढे पुढे जाईल तशी भावीकांची गर्दी वाढत होती. भावीक रथावर गुलाल व खोबरे याची उधळण करत होते. त्यामुळे येणारे सर्व भावीक गुलालाच्या रंगात रंगुन गेले होते. अनेक भावीकांनी आपल्या मनोकामना पुर्ण झाल्या म्हणूण तर कोणी पूर्ण व्हाव्यात म्हणून रथाला नोटांच्या माळा व नारळाचे तोरण बांधत होते. रथ मारूती मंदिरासमोर येताच दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

> **अशी पार पडली यात्रा**
>
> अनेक वर्षाची परंपरा असलेली भांबुर्डी काळभैरवनाथाची यात्रा तीन दिवस सुरू होती. पहिल्या दिवशी अभिषेक, नैवेद्य, गजी ढोल नृत्याने देवाची भाकणूक व सायंकाळी जोगेश्वरी व काळभैरवनाथाचा विवाह सोहळा पार पडला. दुसऱ्या दिवशी विविध स्पर्धा, नैवेद्य, मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले होते. तर तिसऱ्या दिवशी देवाची रथातून मिरवणूक काडुत गुलालाची उधळण करीत यात्रेची सांगता झाली.

## येथे स्मशानभूमीलाही सोसाव्या लागतात मरणकळा

### पिलीवमधील विदारक वास्तव; काहींच्या आडमूठेपणाचा ग्रामस्थांना त्रास

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २४ एप्रिल-**

पिलीव (ता.माळशिरस) येथे अनेक दिवसापासून रखडलेल्या हिंन्दु स्मशानभूमीसाठी माजी आमदार राम सातपूते यांनी १५ लाख रूपयांचा निधी मंजूर करत कामही सुरू केले. मात्र गावातील काहींच्या आडमूठेपणामुळे हे काम पुन्हा रखडल्याने येथील स्मशानभूमीलाही मरणकळा सोसाव्या लागत असल्याचे विदारक वास्तव आहे.

येथील स्मशानभूमीसाठी हिंदूसाठी स्मशानभूमी नाही. त्यामुळे आठमोरीजवळ उघडयावरच अंत्यविधी करावा लागतो. पावसाळयात व ओढयाला पाणी आल्यावर अंत्यविधी कुठे करायचा असा प्रश्न नेहमीच असतो. त्यामुळे माजी आमदार रामभाऊ सातपुते यांनी पिलीवकरांच्या मागणीला दाद देत तब्बल १५ लाख रुपयाचा निधी मंजुर केला. यासाठी ग्रामपंचायतीच्या मालकीच्या गट नं २०/२ मध्ये सदरच्या स्मशानभूमी चे काम मंजुर झाले. त्याची वर्कऑर्डर सुद्धा झाली. कामही सुरू झाले. परंतू काही लोकांनी काहीच कारण नसताना जागा ग्रामपंचायतीच्या मालकीची असताना सदरचे काम अडविले आहे. त्यामुळे पुन्हा या स्मशानभूमीला मरणकळा भोगाव्या लागत आहेत. मुख्य बाजारपेठेचे व लोकसंख्येने मोठ्या असणाऱ्या गावात स्मशानभूमी नसणे ही खरेतर शोकांतिकाच आहे. मरणानंतर सुद्धा भोगाव्या लागतात प्रेताला मरण यातना अशी परिस्थिती येथे आहे. गावात स्मशानभूमी नसणे ही खरेतर गावाची शोकांतिका आहे. निधी उपलब्ध करुन कामाची वर्कआर्डर झाली असताना काम अडविणे किती योग्य आहे. याबाबत आता प्रशासन काय भुमीका घेते. अडवणुक करणाऱ्यावर प्रशासन कायदेशीर कारवाई करुन स्मशानभूमीचा प्रश्न मार्गी लावणार का याकडे पिलीवकरांचे लक्ष लागले आहे. पिलीवकरांच्या मरणानंतरच्या यातना आता तरी संपणार का? असा प्रश्न आहे.

> पिलीव येथे स्मशानभूमी नव्हती याबाबत माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्याकडे निधीची मागणी केली असता त्यांनी १५ लाख रुपयांचा निधी ताबडतोब उपलब्ध करून दिला.कामाची वर्क आर्डर झाली आहे. याठिकाणी सुसज्ज सर्व सोयी सुविधा युक्त स्मशानभूमी होईल
>
> **- नितीन मोहीते, माजी सरपंच**

### माळशिरस नगरपंचायतीच्या मुख्याधिकारीपदी सुमित जाधव

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. २४ एप्रिल-**

माळशिरस नगरपंचायतीच्या मुख्याधिकारीपदी सुमित जाधव यांची नियुक्ती झाली.



मुख्याधिकारी कल्याण हुलगे यांची बदली झाल्यानंतर त्यांच्या जागेवर जळगाव महानगरपालिकीचे सहायक आयुक्त सुमित जाधव यांची नियुक्ती झाली असून त्यांनी आज माळशिरस नगरपंचायत कार्यालयास भेट दिली. यावेळी त्यांचा कर्मचाऱ्यांच्यावतीने सन्मान करण्यात आला. यावेळी नगरपंचायतमधील सदस्यांशी संवाद साधत माळशिरसच्या विकासकामासाठी कटीबद्ध राहणार असल्याचे सांगितले.

## उजनी जलाशयातील बेकायदेशीर मासेमारी थांबणार कधी?

### अधिकृत मच्छिमारांचा आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२४ एप्रिल-**

उजनी जलाशयातील मत्स्यबीजांचे सरंक्षण करण्यासाठी आणि बेकायदेशीर मासेमारीला लगाम लावण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निवडण्यात आलेल्या समितीचे काही अधिकारी चिरीमिरीपुढे बेलगाम झाल्यामुळे उजनीतील बेकायदेशीर मासेमारीला उत आला आहे. त्यामुळे संतापलेल्या मच्छिमारांनी आता आक्रमक पवित्रा घेत तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

गेल्या २८ वर्षापासून उजनी जलाशयात मत्स्यबीज सोडले नव्हते. तसेच बेकायदेशीर मासेमारीमुळे उजनी जलाशयातील मासेमारी व्यवसाय पूर्णतः रसातळाला गेला होता. विविध प्रकारचे गावरान व शासकीय मासे नामशेष झाले होते. उजनी जलाशयात मत्स्यबीज सोडावे म्हणून येथील मच्छिमारांनी सातत्याने मागणीसह पाठपुरावा केल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार, इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे व करमाळ्याचे माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या माध्यमातून येथे कोट्यवधी रुपयांचे मत्स्यबीज सोडण्यात आले. या माश्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी प्रशासन व मच्छिमारांची



असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून समिती नेमण्यात आली. त्यामध्ये अध्यक्षपदी कार्यकारी अभियंता उजनी धरण व्यवस्थापक भिमानगर, सदस्य म्हणून सहाय्यक मत्स्य व्यवसाय आयुक्त पुणे, सोलापूर, अहिल्यानगर तहसीलदार अशा सहा महत्वाच्या खात्याची त्या त्या तालुक्यानुसार नियुक्ती करून कारवाईसाठी तयार केली होती. परंतू ही समिती कागदावरच राहिली असून कारवाईचा फार्स केला जात आहे. परराज्यातील मच्छिमार व बेकायदेशीर मासेमारी करण्याऱ्यानाच आतल्या हाताने ताकद देत आहेत. काही अधिकारी आमचे काही नाही परंतू त्या मच्छिमारांचा फोन येत असल्यामुळे आम्ही कारवाई करत असल्याचे भासवून येथील मच्छिमारांची नावे जाणीवपूर्वक त्या परप्रांतिय मच्छिमारांना व त्यांना आणणाऱ्या गावगुंडाना सांगून स्थानिक लेव्हलला वादावादी घडवण्याचा प्रयत्न करीत आहेत.

> **रक्षकच बनले भक्षक**
>
> उजनीतील बेकायदेशीर मासेमारीला लगाम लावण्यासाठी नेमलेले रक्षकच आज भक्षक बनल्याचे दिसून आल्याने येथील मच्छिमार व मच्छिमार प्रतिनिधी कमालीचे संतप्त झाले असून कोणत्याही क्षणी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी मच्छिमार प्रतिनिधी अनिल नगरे, बलभीम चबरे, युवराज नगरे, पोपट नगरे यांनी यावेळी दिला.

## आनंदनगर येथे ज्योतिबा मूर्ती प्राणप्रतिष्ठापना अन् कळसारोहण

**अकलूज दि.२४ एप्रिल-**

आनंदनगर (ता.माळशिरस) येथे श्री ज्योतिबा मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना व कळसारोहण समारंभ उत्साहात संपन्न झाला. यावेळी देवस्थानच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील हजारो भक्तांनी लाभ घेतला.



श्री ज्योतिबा मूर्तीची ग्राम प्रदक्षिणा काटकर वस्तीपासून हनुमान मंदिर ते आनंदनगर पर्यंत काढण्यात आली. यामध्ये हालगी, ढोल-ताशा, सनई या पारंपरिक वाद्यांसह महादेव काटकर यांचा अश्व सहभागी झाला होता. या मिरवणूक मार्गातील सुवासिनी महिलांनी अश्वाची व रथातील श्री ज्योतिबा मुर्तिची मनोभावे पूजा केली. या कार्यक्रमाचा धार्मिक विधी व होमहवन वेदशास्त्र संपन्न सुनिल मुदगल शास्त्री यांनी केले तर ज्योतिबा मुर्तीची महापुजा श्रीक्षेत्र ज्योतिबा (जि.कोल्हापूर) येथील पुजारी बाबुराव मिटके यांनी केली. कळसारोहणाचा कार्यक्रम हभप सुरेशमहाराज सुळ यांच्या हस्ते करण्यात आला. सकाळी १० वाजता ह.भ.प. बापूसाहेब महाराज मोरे यांचे किर्तन झाले. त्यानंतर आरती होऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमानंतर माहेरवाशीण महिलांना कमेटीकडून माहेरची साडी देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमासाठी स.म.शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते- पाटील, युवा नेते सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक वसंतराव जाधव, रामभाऊ गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रवि काटकर, जालिंदर काटकर, राजेंद्र काटकर, वेताळ काटकर, ज्ञानेश्वर काटकर,मारूती काटकर, सोमनाथ घाडगे, पांडुरंग पवार, महादेव चव्हाण, चांगदेव भांगे, शरद कांबळे, रघुनाथ काटकर, रामभाऊ काटकर, सरपंच राजेंद्र लोंढे,उपसरपंच बाळू काटकर, राजेंद्र जाधव, बबन काटकर, बापू चिकणे, हेमंत चव्हाण, गंगाधर चव्हाण, विठ्ठल शेळमकर, लक्ष्मण काटकर, भिमराव भांगे, संतोष घाडगे, नाना काटकर, नवनाथ काटकर, शिवाजी सावंत, बबन चव्हाण, अशोक शेळमकर, दादा जाधव, शिवाजी पवार, प्रभाकर चव्हाण, कृषी अधिकारी ढगे यांनी परिश्रम घेतले.

## राजेराय मठातून उद्या निघणार पालखी मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२४ एप्रिल-**

श्री स्वामी समर्थ महाराजांचा १४७ वा पुण्यतिथी उत्सवनिमित्त २६ एप्रिल रोजी श्री स्वामी समर्थांच्या सद्गुरू बेलानाथ महाराजांच्या राजेराय मठातून श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानपर्यंत सायंकाळी पाच वाजता श्रींची भव्य पालखी सोहळा आयोजीत केला असल्याची माहिती सचिव किसन झिपरे यांनी दिली आहे.

ही पालखी सोहळा ए वन चौक, विजय कामगार चौक, खासबाग, समाधी मठ, मेन रोड, सेंट्रल चौक, फत्तेसिंह चौक, भारत गल्ली, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान, पागाचाळ मार्गे परत मठात येईल. या उत्सवाची सांगता रविवार दि.२७ एप्रिल रोजी बेला समर्थ महिला भजनी मंडळाच्या भक्ती संगीताच्या कार्यक्रमानंतर गोपाळकाल्याने होईल. या उपक्रमामध्ये भक्तांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मठाचे अध्यक्ष ॲड. शरद फुटाणे उपाध्यक्ष विकास दोडके सचिव किसन झिपरे,विश्वस्त ॲड. अनिल मंगरुळे दत्तात्रय मोरे, भुवनेश वर्दे, बिल्वराज नाबर, विजयकुमार गाजूल, राजकुमार रामण यांनी केले आहे.




सध्या मठात श्री स्वामी समर्थांच्या प्रकट दिनापासून अखंड नाम वीणा सप्ताह चालू आहे. ज्योती झिपरे यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज सकाळी ८ ते १२ दरम्यान जवळपास १०० महिलाची श्री गुरु लीलामृत या ग्रंथाचे पारायण सुरु आहे. दि. १३ व १४ एप्रिल रोजी शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांकरता सुंदर हस्ताक्षर स्पर्धा व निबंध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १७५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवीला. सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. दि.१८ एप्रिल रोजी केतकी नकाते संचलित श्री गणेश कथक नृत्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध गाण्यावर आधारित कथक नृत्य सादर केले. दि. १५ एप्रिल पासून झालेल्या भक्ती संगीतात श्री विना महिला भजनी मंडळ पानमंगरूळ, श्री स्वामी समर्थ महिला भजनी मंडळ अक्कलकोट, सुकुळसाळी महिला भजनी मंडळ अक्कलकोट,श्री राम कृष्ण हरी महिला भजनी मंडळ समर्थ नगर, श्री चैतन्य महिला भजनी मंडळ सोलापूर, सत्संग महिला भजनी मंडळ अक्कलकोट, श्री गुरु माई महिला भजनी मंडळ सोलापूर, श्री ज्ञानई महिला भजनी मंडळ सोलापूर यांचे भक्ती संगीत सादर झाले असून यानंतर श्री सरस्वती महिला भजनी मंडळ सोलापूर, दुर्गामाता महिला भजनी मंडळ अक्कलकोट यांचे भक्ती संगीत होणे सुरू आहे. दि. २६ एप्रिल रोजी श्रींचा मुख्य पुण्यतिथी उत्सव असून या दिवशी पहाटे दोन वाजता काकड आरती होईल व त्यानंतर श्रींची महापूजा संपन्न होईल. सकाळी ठीक दहा वाजता श्री स्वामी समर्थांच्या पादुकांवर व सदगुरू बाबांच्या समाधीवर उपस्थित भक्तांच्या हस्ते सामुदायिक अभिषेकाचे आयोजन करण्यात आले आहे. यानंतर दुपारी बारा वाजता महाआरती संपन्न होईल. यानंतर सायंकाळी चारपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## युगदर्शक आयकॉन पुरस्कार जाहीर; उद्या वितरण

**बार्शी, दि. २४ एप्रिल-**

युगदर्शक प्रतिष्ठानच्या वतीने समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना युगदर्शक बार्शी आयकॉन व इतर पुरस्कार जाहीर करण्यात आले. पुरस्कार सोहळ्यासाठी डॉ. शिवरत्न शेटे हे प्रमुख पाहुणे आहेत तर आरोग्यदूत मंगेश चिवटे यांचीही उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती विश्वस्त नितीन भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा कार्यक्रम २६ एप्रिल रोजी सायं. ६ वा. यशवंतराव चव्हाण सभागृहात होणार आहे. यावेळी विश्वास बारबोले, मकरंद निंबाळकर, नागेश अक्कलकोटे, युवराज काटे, श्रीमंत थोरात, संतोष सूर्यवंशी, नाना वाणी, राजेंद्र मोहोळकर, अशोक घोडे, अण्णासाहेब पेठकर, बप्पा कसबे, अॅड. विकास जाधव, रवी माळी, महेश यादव यांची उपस्थिती असणार आहे. यावेळी संजय बारबोले, विशाल नवले, अजित बोरकर, गुरु साखरे, उदय पोतदार, नरेश ठाकूर, श्रीकृष्ण उपळकर, नितीन जाधवर, सचिन गायकवाड, सुरज मुल्ला, सुरज हुंबे, सोमेश भुजबळ, सुकेश पेठकर, गणेश शिंदे, अण्णासाहेब वाघमारे उपस्थित होते.

**यांना मिळाला पुरस्कार**

घनश्याम आडसूळ (राज्यस्तरीय महसूल आयकॉन), दिलीप ढेरे (राज्यस्तरीय पोलीस आयकॉन), शुभांगी कातुरे-पाटील (महिला आयकॉन), सचिन मांजरे-पाटील (वैद्यकीय आयकॉन), नितीन आवटे (उद्योजक आयकॉन), धैर्यशील पाटील (पत्रकार आयकॉन), त्रिशुल लटके (कला आयकॉन), जुबेर बागवान (सामाजिक आयकॉन), ज्ञानेश्वरी कॉम्प्युटर इन्स्टीट्युट (शिक्षण आयकॉन), विवेक गजशिव (युवा आयकॉन), अजय भानवसे (गोरक्ष आयकॉन), प्रमोद गोसावी (कृषी आयकॉन).



**महत्वाचे...**



## आदर्श नागरिक बनून विद्यार्थ्यांनी शाळेचा नावलौकीक करावा : राम गोसावी

**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

जिल्हा परीषद शाळेत शिक्षकांकडून संस्काराची शिदोरी देण्यात येते. समाजात आदर्श व सुसंस्कार नागरिक बनविण्यात जिल्हा परीषद शाळा अग्रेसर आहेत. स्पर्धेच्या युगातही येथील शिक्षकांकडून नवनवीन माहीतीच्या आधारे आधुनिक शिक्षण देण्याचे उल्लेखनीय काम होत आहे. देशाला विकासित राष्ट्र बनविण्यात जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांचा सिंहाचा वाटा असणार आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी शिक्षण क्षेत्रात उत्तुंग प्रगती करून आई वडीलांसह शाळेचे नावलौकीक करण्याचे आवाहन मंद्रुप येथील जिल्हा परीषद मराठी मुलांच्या शाळेचे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष राम गोसावी यांनी केले. ते चौथी वर्गाच्या निरोप व शुभेच्छा समारंभ कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख कलप्पा हेळवी होते. यावेळी केंद्रीय मुख्याध्यापक प्रकाश कुंभार, शालेय व्यवस्थापन समितीचे मलकारसिध्द शेंडगे, ग्रामपंचायत सदस्य सुरेश टेळे, नितीन खराडे, रेखा कोळी, दै. तरुण भारतचे पत्रकार अमोगसिध्द मुंजे यांच्यासह पालक उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रात यश संपादन केलेले विद्यार्थी व शाळेच्या उतुंग कामगिरीचे अहवाल प्रकाशित करण्यात आले. यावेळी मलकारसिध्द शेंडगे यांनी समाजात वावरताना शिक्षक व शाळेचे नाव उज्वल करण्याचे आवाहन केले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी शाळा व शिक्षकांबद्दल ऋण व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय राजमाने यांनी केला, तर संगिता स्वामी यांनी आभार मानले.



## जैन मंदिर पाडणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा; जैन समाजाची मागणी

**सदाशिवनगर, दि. २४ एप्रिल-**

विलेपार्ले येथील जैन मंदिर पाडणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व मंदिर पुनर्निर्माण करावे या मागणीसाठी माळशिरस तालुक्यातील विविध गावात जैन समाजाच्या वतीने मूक मोर्चा काढला व आपल्या मागण्याचे निवेदन तहसीलदार सुरेश शेजुळ यांना दिले. दि.१६ एप्रिल रोजी मुंबई महानगरपालिकाद्वारे विलेपार्ले पूर्व कांबलवाडी परिसरामध्ये असलेल्या २६ वर्षांपूर्वीचे श्री १००८ भगवान पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर हे पोलीस बळाचा वापर करून अचानकपणे उध्वस्त करून टाकले. त्यामुळे जैन समाजात एक आक्रोश व संताप जनक वातावरणात निर्माण झाले आहे. हे मंदिर उध्वस्त करून जैन धर्मियांच्या श्रद्धेचा अंत करून त्यांच्या भावना दुखावल्या आहेत. याचा निषेध म्हणून संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करून हे मंदिर पुन्हा राज्य शासनाच्या आर्थिक नियोजनातून उभा करावे असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी वैभव शहा, अनंतलाल दोशी, अमित गांधी, प्रकाश अंबुडकर, अभिजीत दोभाडा, अनिल दोशी, अभिनंदन देशमाने, वीरकुमार दोशी, राहुल दोशी, प्रमोद दोशी, अभिजीत दोशी, प्रज्योत दोशी, वैभव मोडासे, डॉ. अनुप दोशी, विनोद दोशी, गोमटेश दोशी, सुरज दोशी उपस्थित होते.



## सैन्यदलात दाखल झालेल्या विनोद निमगिरे यांचा जिव्हाळा ग्रुपच्या वतीने सन्मान

**करमाळा, दि. २४ एप्रिल-**

प्रतिकूल परिस्थितीतून जिद्द, कष्ट आणि चिकाटीच्या जोरावर जेऊरवाडी (ता. करमाळा) येथील विनोद निमगिरे यांने भारतीय सेनेत दाखल होण्याचे स्वप्न केले पूर्ण आहे. त्यांच्या सेनेतील निवडीबद्दल शेटफळ येथील जिव्हाळा ग्रुपच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. करमाळा तालुक्यातील जेऊरवाडी हे दीड हजार लोकवस्तीचं छोटंसं गाव येथील दरी निमगिरे या शेतमजुराच्या मुलाने प्रयत्न करून अहिल्यानगर येथे झालेल्या सैन्य भरतीमध्ये यश संपादन केले आहे त्याचे बारावीपर्यंत शिक्षण जेऊर येथील भारत हायस्कूल मध्ये पूर्ण झाल्यानंतर करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात प्रवेश घेऊन एनसीसी मध्ये दाखल झाला होता. दररोज व्यायाम व रनिंग करून चांगला सराव केला काही दिवस सैन्य भरतीपूर्व अॅकॅडमीमध्ये जाऊन मार्गदर्शन घेतले. परंतु सुरवातीला यश काही मिळाले नाही. पुन्हा घरची परिस्थिती डोळ्यासमोर ठेवून ठेवून जोरदार अभ्यास व सराव सुरू केला अखेर अहिल्यानगर येथे झालेल्या सैन्य भरती मध्ये चांगल्या गुणांनी त्याचे जनरल ड्युटी सैनिक म्हणून निवड झाली. जेऊरवाडी शेजारी असलेल्या शेटफळ व दहीगाव गावातील लोकांकडून त्यांचे कौतुक म्हणून त्याचा सन्मान करण्यात आला येथील जिव्हाळा ग्रुपच्या वतीने या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते यावेळी दहिगाव विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन हरिश्चंद्र शेळके जिव्हाळा ग्रुपचे वैभव पोळ, विजय लबडे, प्रशांत नाईकनवरे, गजेंद्र पोळ, विष्णू पोळ, नवनाथ पोळ, लक्ष्मण पाटील, सुनील वळेकर, हानुमंत जाधव, महादेव पोळ, विलास धेंडे उपस्थित होते.

# अक्कलकोट 'मॉडेल तीर्थक्षेत्र' कधी बनणार

### मंदिर परिसरातील रस्त्यांचे रुंदीकरण गरजेचे

**तभा वृत्तसेवा । नंदकुमार जगदाळे**

**अक्कलकोट, दि.२४ एप्रिल-**

अक्कलकोट हे 'मॉडेल तीर्थक्षेत्र' बनवण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीवेळी जाहीर सभेत दिले होते. त्याची पुर्तता कधी होणार याची प्रतिक्षा स्वामिभक्तांसह अक्कलकोटकरांना आहे. मुलभुत सुविधा, मोठे रस्ते, भुमिगत वीजवहन तारा तसेच बहुमजली वाहन पार्कींग इमारत तातडीने होणे आवश्यक बाब आहे. मंदिर परिसरातील रस्त्यांचे रूंदीकरणही काळाची गरज बनली आहे.




आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अत्यंत कमी कालावधीत कोट्यवधी रुपयांची अनेक विक्रमी विकास कामे मंजुर करून घेतली आहेत. येथे सध्या नविन बसस्थानक अत्यंत गतीने होत आहे. मल्लीकार्जुन मंदिर जिर्णोध्दाराचे काम होत आहे. अक्कलकोट झपट्याने बदलत आहे विकसीत अक्कलकोटच्या दिशेने वाटचाल चालू आहे. मात्र मुख्य मंदिर परिसरातील रस्ते अरुंदच आहेत. हे रस्ते कधी रुंद होतील याची प्रतिक्षा यात्री पर्यटकासह स्वामीभक्ताना आहे. येथील अशिया खंडातील सर्वात मोठे शस्त्र संग्रहालय, ऐतिहासिक नवीन जुना राजवाडा, 'शिवपुरी ' यज्ञस्तंभ, अग्निहोत्र प्रसार प्रचार, अन्नछत्र मंडळातील शिवस्मारक, गडकिल्ले, बालोद्यान, अजरामर धातुशिल्प, शिवसृष्टी दालन पाहण्याकरिता सहली पर्यटक वाढले आहेत. एवढा मोठा ओघ वाढूनही तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिर, गुरुमंदिर, समाधी मठ मंदिर परिसरातील एकाही रस्त्याचे रुंदीकरण झालेले नाही. उत्सवकाळात पालखी मिरवणुक काळात एकाही रस्त्यावरून दोन वाहने परस्पर विरोधी दिशेने जाऊ शकत नाहीत. वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिर, दक्षिण द्वार मुरलीधर मंदिर, फत्तेसिंह चौक, तुप चौक, कारंजा चौक, एखंडे दवाखाना, विजय कामगार चौक, बसस्थानक रस्ता, छत्रपती शिवाजी राजे चौक हा प्रमुख अत्यंत रहदारीचा व पालखी मिरवणुक मार्ग समाधी मठ, कारंजा चौक, दावल बॅन्ड, सुभाष गल्ली, भारत गल्ली, देशमुख गल्ली पालखी मार्ग तातडीने रुंदीकरण होणे गरजेचे आहे.

> अक्कलकोट तीर्थक्षेत्र घोषणा १९९५ मध्ये युती शासनाने केली. तेव्हापासून आतापर्यंत येणाऱ्या भाविकांच्या संख्येत प्रचंड वाढ झालेली आहे. मंदिर परिसरातील मार्गावरून दोन मोठी वाहने परस्पर विरोधी दिशेने जातील एवढा मोठा रस्ताही सध्या नाही.

## पंढरपुरात सकल जैन समाजाच्या वतीने मूकमोर्चा

### तहसिलदार सचिन लंगुटे यांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ एप्रिल-**

जैन धर्म आणि समाजावर होणाऱ्या अन्याय व अत्याचारा बाबत आणि पहेलगाम येथे अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध करण्यासाठी पंढरपूर शहर आणि तालुका सकल जैन समाजाच्यावतीने गुरुवारी निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.



विलेपार्ले, मुंबई येथील जैन मंदिर दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी चुकीच्या पद्धतीने व बेकायदेशीर पद्धतीने आणि सर्व बाबी समजून न घेता अत्यंत क्रूर पद्धतीने बीएमसी (बृहन्मुंबई महानगरपालिका) द्वारा जेसीबीच्या सहाय्याने उध्वस्त करण्यात आले. मंदिर पाडताना तेथील धार्मिक ग्रंथ,पूजा साहित्याची विटंबना करण्यात आली तसेच मंदिरातील प्रतिष्ठित मूर्ती भंग करण्यात (तोडण्यात) आली. प्रशासनाच्या या जुलमी कार्यामुळे देशातील समस्त जैन धर्मीय व सर्व शांतताप्रिय नागरिक अत्यंत आक्रोशीत झाले आहेत. सदरच्या झालेल्या घटनेस जे जे अधिकारी जबाबदार असतील त्यांची चौकशी होऊन त्यांना तात्काळ निलंबित करून त्यांच्यावर कठोर कारवाई व्हावी आणि सदर उध्वस्त केलेल्या मंदिराचे त्याच जागेवर पुनर्निर्माण करण्यात यावे. तसेच गेल्या अनेक वर्षा पासून जैन धर्माच्या तीर्थ स्थळावर अतिक्रमण करणे ,यात्रेकरूंवर हल्ला करणे, जैन मुनी साध्वीं वर हल्ला करणे व जाणिवपूर्वक त्रास देणे असे प्रकार सुरु आहेत.या मागे कुणाचा कुटिल हेतू आहे त्याचा शोध घेणे आवश्यक आहे.

जैन समाज हा अल्पसंख्यांक असून अहिंसावादी व शांतताप्रिय असतांना सुद्धा काही राजकीय पक्षाचे प्रतिनीधी जैन धर्माबद्दल निंदनीय,आक्षेपार्ह भाषा वारंवार वापरतात त्यावर कठोर कार्यवाही करावी. तसेच पहेलगाम जम्मू काश्मिर येथे अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्लयात मृत्युमुखी पडलेल्या आणि जखमी झालेल्या निरपराध नागरिकांना न्याय देण्यासाठी शासनाच्यावतीने पावलं उचलली आहेतच तरीही अतिरेक्यांवर कडक कारवाई करावी अशी मागणी सकल जैन समाजाच्या वतीने करण्यात आली. या मागण्यांचे निवेदन पंढरपूर तहसिलदार सचिन लंगुटे यांना सकल जैन समाजाच्या वतीने देण्यात आले.या मूक मोर्चासाठी पंढरपूर पोलिस प्रशासनाच्यावतीने सहकार्य लाभले.



## पहलगाम येथील हल्ल्याचा हिंदू समाजाकडून निषेध

**मोडनिंब, दि. २४ एप्रिल-**

जम्मू-काश्मीर मधील पहलगाम येथे पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्लूयाच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने मोडनिंब (ता.माढा) येथे जोरदार निदर्शने करण्यात आली. तसेच पाकिस्तान विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. मंगळवारी पहलगाम येथे पर्यटकांवर अतिरेक्यांनी हल्ला केला.यामध्ये महाराष्ट्रातील पर्यटकांसह २२ पर्यटकांचा बळी गेला. या दहशतवादी कृत्यात अनेक निष्पाप जीवांचा बळी गेला. संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली. या घटनेच्या निषेधार्थ युवकांनी मोडनिंब स्टॅंड परिसरात जोरदार निषेध व्यक्त केला. भारत माता की जय, पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणा देत युवकांनी आपला रोष व्यक्त केला.

## सात जणांच्या हल्ल्यात दोन शेतकरी जखमी

### घराशेजारील गंजीला आग

**बार्शी, दि.२४ एप्रिल-**

घरासमोर उभा राहू नको, एवढ्या कारणावरून अलीपूर रोड, बार्शी येथे एका शेतकऱ्यावर सात जणांनी एकत्र येत प्राणघातक हल्ला केला. लोखंडी गज व लाकडी दांडक्यांनी केलेल्या मारहाणीत शेतकरी व त्याचे वडील गंभीर जखमी झाले असून, घराजवळील कडब्याच्या गंजीसही आग लावून अंदाजे २५ हजार रुपयांचे नुकसान करण्यात आले. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात सात जणांविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे.

ही घटना २० एप्रिल रोजी दुपारी दोनच्या सुमारास घडली. हर्षल दिलीप गव्हाणे (वय ३३) यांनी घरासमोर संशयास्पदरीत्या पाहत उभ्या असलेल्या रोहीत सपाटे याला तेथून जाण्यास सांगितल्यावर काही वेळात रोहीत सपाटे व त्याचे सहकारी सोमनाथ सपाटे , करण सपाटे , अनिल सपाटे , संतोष सपाटे , प्रतीक सपाटे ( रा.अलिपुर रोड नेटके प्लॉट बार्शी ) आणि असिफ (पूर्ण नाव माहीत नाही) हे दोन रिक्षा आणि एक कार घेऊन घरात घुसले. यावेळी त्यांनी गोंधळ घालून गव्हाणे व त्यांच्या वडिलांवर हल्ला चढवला. सोमनाथ सपाटे याने लोखंडी गजने हातावर, तर रोहीत व करण यांनी लाकडी दांडक्यांनी पाठीत मारले. अनिल सपाटेने वडिलांवर हल्ला केला. त्यानंतर सर्वांनी गव्हाणे यांचा मोबाईल हिसकावून जीवे मारण्याची धमकी दिली.हल्लेखोरांनी कडब्याच्या गंजास आग लावल्यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले. याप्रकरणी गव्हाणे यांच्या फिर्यादीवरून सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस अधिक तपास करत आहेत.

## 'सहकार महर्षि'चे यंदा ९ लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट



### चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील ऊस तोडणी वाहतूक कराराचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२४ एप्रिल-**

येथील सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याने गळीत हंगाम २०२५-२६ करीता ९ लाख मे.टन ऊस गाळपाचे उदिष्ट ठेवले असुन बैलगाडी, बजाट, ट्रक, ट्रॅक्टर व ऊस तोडणी यंत्राचे मालक व ठेकेदार यांनी जास्तीत जास्त तोडणी वाहतूकीचे करार करून गाळप हंगाम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांनी केले.

गळीत हंगाम २०२५-२६ करीता बैलगाडी, बजाट, ट्रक, ट्रॅक्टर व ऊस तोडणी यंत्र यांचे तोडणी वाहतूक करारांचा शुभारंभ कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या हस्ते कारखाना कार्यस्थळावर करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांचे नेतृत्वाखाली कारखाना प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे. सहकार महर्षि कारखान्याकडे गतहंगाम २०२४-२०२५ मध्ये ऊस तोडणी वाहतूकीचे काम केलेल्या वाहन मालक यांची ऊस तोडणी वाहतूकीची संपुर्ण बिले अदा करण्यात आली असल्याची माहिती कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांनी दिली. सदर प्रसंगी व्हा. चेअरमन शंकरराव माने-देशमुख, संचालक सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, विराज निंबाळकर, रावसाहेब पराडे, अमरदिप काळकुटे, सुभाष कटके, कार्यलक्षी संचालक रणजित रणनवरे व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक-पांडूरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख, धनंजय सावंत व विजयराज वाहतूक संघाचे चेअरमन केशव ताटे, राजेंद्र शिंदे, रमेश मिसाळ, कल्याणराव दुपडे, रामदास बेलदर, आगतराव शिंदे व सर्वसेवा संघाचे वसंत जाधव, विजय माने-देशमुख तसेच कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले तसेच बैलगाडी, बजाट, ट्रक, ट्रॅक्टर व ऊस तोडणी यंत्राचे मालक व ठेकेदार आणि खातेप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिलीव परीसरात वाळूअभावी घरकुलाची कामे रखडली

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २४ एप्रिल-**

केंद्र व राज्य शासनाने सर्वसामान्य नागरिकांना पक्के घर देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत सध्या प्रत्येक गावात घरकुले मंजूर आहेत. सध्या वाढत्या महागाईचा विचार करता घरकुलासाठी जवळपास दोन लाख नऊ हजार रुपये एवढी रक्कम देण्याचे जाहीर केले आहे. यामधील पंधरा हजार घरावर सोलर पॅनल बसविण्यासाठी कपात करण्यात येणार आहेत. यामुळे घरकुल लाभार्थीना एक लाख ९६ हजार रुपये मिळणार आहेत. शासनाने या मंजूर घरकुलासाठी शासकीय अत्यल्प दरात वाळू देण्याचे जाहीर केले. त्याची अद्यापही अमंलबजावणी झाली नसल्याने घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्यांना वाळू मिळत नाही. त्यामुळे ओढयाची निकृष्ट वाळू वापरावी लागत आहे. त्यामुळे बांधकाम दर्जाहीन होत आहे. शासनाने नदीकाठी असणाऱ्या ठेक्यावरील वाळु स्वस्त दरात देण्याची मागणी घरकुल लाभार्थीनमधुन होत आहे. बाहेरुन वाळु घेणे सर्व सामान्यांना न झेपणारे आहे. कारण बाहेरुन वाळु घेणयासाठी प्रचंड मोठी न परवडणारी रक्कम मोजावी लागत आहे. शासनाने जाहीर केल्या प्रमाणे प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेतील लाभार्थीना ताबडतोब वाळु उपलब्ध करुन देणयाची मागणी लाभार्थी मधुन होत आहे. यामुळे पिलीवसह ,सुळेवाडी, कुसमोड, बचेरी, शिंगोर्णी ,काळमवाडी, चांदापुरी व इतर गावातील घरकुलाची कामे खोळंबली आहेत.

## जन्मेजयराजे भोसले यांची राजकोट किल्ल्यातील शिवपुतळ्यास भेट

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ एप्रिल-**

श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांनी मंगळवारी मालवण (जि.रत्नागिरी) येथील राजकोट किल्ल्यात उभारण्यात येत असलेल्या शिवपुतळ्याच्या कामास भेट देऊन पुतळ्याची पाहणी केली व मूर्तीकार अनिल सुतार यांचा सन्मान केला.

या मूर्तीचे काम शिल्पकार राम सुतार यांच्या नेतृत्वाखालील राम सुतार आर्ट क्रियेशनने हाती घेतले आहे. यावेळी त्यांनी प्रसिद्ध मूर्तिकार राम सुतार यांचे चिरंजीव अनिल सुतार यांची भेट घेऊन यासंदर्भात सविस्तर माहिती जाणून घेतली. प्रारंभी अनिल सुतार यांनी जन्मेजयराजे भोसले महाराज व त्यांच्या टीमचे स्वागत केले. त्यानंतर श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्यावतीनेही सुतार यांचा सन्मान करण्यात आला. या भव्य दिव्य कामाबद्दल भोसले महाराज यांनी समाधान व्यक्त करत सुतार यांच्या कला कौशल्याचे मुक्तकंठाने प्रशंसा केली आणि अक्कलकोट भेटीचे निमंत्रण देत शुभेच्छा दिल्या. दरम्यान या पुतळ्याचे लोकार्पण १ मे रोजी महाराष्ट्र दिनी करण्याच्या हालचाली सुरू आहेत. हा शिवपुतळा जमिनीपासून ९३ फूट उंचीचा तर चबुतरा १० मीटर उंचीचा बनविण्यात आला आहे. त्यावर ६० फूट उंचीचा शिवपुतळा आणि शिवपुतळ्याच्या हातातील तलवार तब्बल २३ फूट उंचीची असणार आहे असे मूर्तिकार सुतार यांनी सांगितले. या पुतळयाच्या निर्मितीसाठी नितीन जाधव, भुलेश्वर विश्वकर्मा, तेजस हांडे प्रयत्नशील आहेत. यावेळी अन्नछत्र मंडळाचे पालखी संयोजक संतोष भोसले, प्रशांत साठे, संतोष माने, महांतेश्वर स्वामी आदी उपस्थित होते.

> **पुतळ्याचे काम सुरेख**
>
> राजकोट किल्लूयावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळल्यानंतर शिवप्रेमीच्या भावना संतप्त होत्या. पण तितक्याच तत्परतेने सरकारने हे काम हाती घेतले आणि आज पुतळ्याचे काम अंतिम टप्प्यात पोचले ही बाब खरोखर समाधानाची आहे. पुतळ्याचे काम अतिशय सुरेख झाले आहे.
>
> **- जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले, संस्थापक अध्यक्ष, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट.**

